



रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ११ फेब्रुवारी २०२४


# पुतण्या जिंकला, काका हरले!

आधुनिक केसरी

**केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील दोन राजकीय पक्षाच्या वारसा हक्काबाबत महत्वपूर्ण निकाल दिला आहे.यात शिवसेनेवर उध्दव ठाकरे कुटुंबाने तर राष्ट्रवादी काँग्रेसवर शरद पवार कुटुंबाने "पक्ष आमचा' असा दावा केला होता. पण आयोगाने दोन्ही कुटुबांला पक्ष मालकीचा हक्क  दिला नाही. या निकालाचा परिणाम देशातील घराणेशाहीच्या पक्षांनी धसका घेतला आहे. आपल्या पक्षाचे काय होईल  ? आपले काय होईल ? याची चिंता लागली आहे.वास्तविक लोकशाहीत पक्षात एका कुटुंबाची मालकी असूच शकत नाही. महाराष्ट्रात काकाच्या (शरद पवार) पक्षाला पुतण्याने (अजितपवार) आव्हान दिले. यात पुतण्या जिंकला, तर काका हरले आहेत. या निकालामुळे  घराणेशाही पक्षाला लगाम लागतो काय, हे पहावे लागेल.**


निर्सगाचा नियम आहे की,'जे पेरले ते उगवते' देशाच्या राजकारणात अनूभवी धूर्त, चाणाक्ष नेते नेते शरद पवार म्हणून ओळख आहे. यांचा पींड काँग्रेस पक्षाचा आहे.महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व काँग्रसचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी पवारांचे तरुण वयात त्यांचे भाषण ऐकले! चव्हाणांनी पवारांना राजकारणात आणलं. नव्हत. त्यांनी काँग्रेसची ध्येय, धोरण, विचारसरणीचा अभ्यास करूनकाँग्रेस पक्षात आले असावेत! ते महत्वाकांक्षी, स्वतंत्र वृत्तीचे नेते आहेत.देशात अनेक नेत्यांना पक्षाच्या विचारसरणीपेक्षा स्वार्थ महत्वाचा वाटतो, अशी मंडळी उमेदवारी व  पदाकरिता निवडणूक आली की त्या पक्षातून त्या पक्षात बेडूक उड्या मारत असतात! १९७८ मध्ये पवारांनी काँग्रेस पक्षाचे आमदार फोडून तत्कालिन वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडले.केवळ मुख्यमंत्रीहोण्याचे लालसनेच!त्यावेळी दादांनी पवारांना पाठीत खंजीर  खूपणारा नेता म्हंटले!राजकारणात पवारांवर इतर नेते विश्वास ठेवत नाहीत.कारण ते काय निर्णय घेतील,हेच सांगता येत नाही,त्यांनी लावलेला कलंक चुकीचा आहे काय?पक्ष फोडणाऱ्याला 'गद्दार' शब्द वापरला जातो!मग पवारांनी काँग्रेस पक्षाशी गद्दारी केली की नाही? देशातील परिस्थितीनुसार नेते राजकीय निर्णय घेतले जातात! काँग्रेस पक्षाचे १९६९ व १९७८ मध्ये विभाजन झाले.१९७८ मध्ये स्व.यशवंतराव चव्हाण हे श्रीमती इंदिरा गांधीपासून दूर राहिले,तेंव्हा स्व.चव्हाण हे काँग्रेस उर्स गटात होते.श्रीमती गांधीपासून दूर जाण्याचा निर्णयामुळे त्यांच्या राजकीय कारकिर्दीला धक्का बसला.मात्र १९८१ मध्ये निवडून आल्यानंतर महिन्याच्या प्रतीक्षेनंतर काँग्रेस आयमध्ये गेले.नंतर मात्र स्व. चव्हाण शेवटच्या श्वासापर्यंत ते काँग्रेस पक्षात राहिले. पण पवारांनी च पक्ष फोडला व चव्हाणांना 'गुरू दक्षिणा दिली. पवार काँग्रेस पक्षात दोन आले व गेले! काँग्रसने पवारांना मान, सन्मान दिला,केंद्रात व महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद दिले! पण ते पक्षात स्थीर राहिले नाहीत.पवार नेहमी म्हणतात,समविचार





कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


पक्षाने एकत्र आले पाहिजे,काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचाराची नाळ एकच आहे.तर मग पक्षाची वेगळी चूल कशाकरिता मांडली?त्यांनी आजपर्यत आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केलेला नाही?मराठवाड्यातील काँग्रेसचे नेते स्व शंकरराव चव्हाण यांनी पक्षात मतभेद झाले म्हणून महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला.या पक्षाने निवडणूक लढविली होती,पण त्यांनी आपला चूक सुधारली व पक्षच काँग्रेस पक्षात विलीन केला.त्यांनी काँग्रेस विचाराशी फारकत घेतलेली नाही.तेही शेवटपर्यत काँग्रेसमध्ये राहिले. अनेक काँग्रेस नेत्यांनी पक्षातुन बाहेर पडून स्वतःचा पक्ष स्थापन केला.यात पं. बंगालच्या ममता बनर्जी काँग्रेस पक्षातून बाहेर पडलेल्या नेत्या आहेत. त्यांनी राज्यात स्वतःच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेस पक्ष उभा केला आहे.या राज्यात त्यांच्या नेतृत्वाला काँग्रेस,कम्युनिस्ट भाजपा पक्षाची शह देतांना दमछाक होत आहे.पवारांनी महाराष्ट्रात नवीनपक्ष काढला पण पण ममताप्रमाणे पक्ष वाढविता आलेला नाही.मग वेगळा पक्षाचा आटापीटा कशाकरिता केला  ? त्यात पवारांना 'काँग्रेस' नावाचे फार प्रेम आहे.आज नवीन पक्षाच्यात काँग्रेस हे जोडले आहे. त्यांनी श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाच्या विरोधात बंड केले होते. आता तर त्यांचे सोबत छबी काढण्यासाठी रांगेत उभे राहत आहेत इतका लाचार नेता राज्यात झालेला नाही.मग पवारांचा स्वाभिमान कोठे गेला? महाराष्ट्रात पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ना काँग्रेसला !ना भाजपा! ना शिवसेनेला आव्हान देता आले नाही.ते महाराष्ट्रात  स्वतः च्या पक्षाच्या बळावर सरकार स्थापन करू शकले नाहीत!त्यांना राजकारणात आपण  'किंग मेकर' होणेच आवडते! महाराष्ट्रात पवार मराठा समाजाचे मोठे नेते, त्यांनी समाजाचा केवळ "व्होटबँक" म्हणून वापर केला.ते या समाजाला आरक्षण देऊ शकले नाहीत! आता कन्या खा. सुप्रिया सुळे  समाजाला  भाजपाने सरकार द्यावे,अशी मागणी करत आहेत!मग यांना ५५ वर्षे कोणी अडविले होते? इतकेच नव्हे,पवारांनी राज्यात दोन समाजात तेढ निर्माण करणे, दुसऱ्या समाजाबाबत व्देषमूलक भावनाने टीका करणे, त्या समाजातील सन्मानीय व्यक्तींचे अवमान त्यांनी केलेला आहे. पवारांच्या पक्षात कन्येला,पुतण्या,भाचा आदींना यांना विधानसभा व लोकसभेची उमेदवारी सहज मिळते,ते नेते होतात!ते सर्व  कर्तृत्वाने नेते झाले असे सांगितले जाते!तरीही पक्ष परिवारवादी नाही, याचे नवल वाटते!पवारांचा लोकशाहीवर अतिविश्वास आहे,पण स्वतः च्या पक्षात अधिक निवडणूक पध्दत अवलंबली गेली नाही.कारण 'साहेब' हेंच सर्वेसर्वा मानले गेले.पक्षात निर्णय सर्व समंतीने घ्यावयाचे असतात.जर पक्षाचे अधिकार एका नेत्याकडे दिले.पक्षात एकाधिकार शाही सुरु होते.यातून पक्ष धोक्यात येतो.काँग्रेसचा इतिहासात पहा! श्रीमती इंदिरा गांधी यांचेकडे पक्षाचे नेतृत्व आल्यानंतर त्या पक्षाचे सर्व निर्णय स्वतः च घेवू लागल्या.त्यांनी आपले निर्णय इतर नेत्यावर लादले.त्यामुळे काँग्रेस पक्षातील लोकशाही लोप झाली आणि पक्षात एकाधिकारशाही सुरु झाली श्रीमती गांधी यांचा पक्षात इतका दरारा होता की, त्यांच्या विरोधात बोलण्याचे धाडस बड्या नेत्यांतही नव्हते! पक्षात 'मॅडम' चा आदेश शिरसावंध मानला जाऊ लागला,पण शेवटी त्याचा उद्रेक झाला. पक्षाचे दोन वेळा विभाजन झाले. .पण श्रीमती गांधी यांनी पुन्हा पक्ष उभारला.आजही काँग्रेस पक्षाची सूत्रे गांधी परिवाराकडे आहेत. ज्येष्ठ व आदरणीय नेते शरद पवारांनी महाराष्ट्रातील राजकारणात  तेच केले आहे.राज्यातील पहिले राजकीय बंडखोर नेते म्हणून पवार यांची नोंद झाली.पण त्यांच्या पक्ष संघटन चातूर्य कौतूक केले पाहिजे.ते प्रत्येक जिल्ह्यातील नेते व सामान्य कार्यकर्त्यांना नावाने ओळखतात. पवारांची काँग्रेसने पक्षातून हकालपट्टी केली गेली.त्यानंतरच १० जून १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.पण त्यांनी पक्षाचे नेतृत्व व अधिकार स्वतः कडे ठेवले.यात पक्षाचा मी नेता व निर्णय माझ्याशिवाय इतर कोणालाही घेण्याचे अधिकार नाहीत,असे नियम केले गेले.देशात परिवारांनी पक्षावर आपल्या हक्क कायम असावा याची तरतूद पक्षाच्या घटनेत केली आहे! हे लोकशाही तत्वाच्या विरोधात आहे.यात "मी तळे बांधले तेंव्हा मी व माझाच परिवार पाणी पिणार! याप्रमाणे पक्षाचे काम चालू आहे.पण.यामुळे राज्यात पक्षाला २५ वर्षात विधानसभा  ७५ जागेची संख्याही गाठता आलेली नाही.देशात २०१४  व २०१९ मध्ये देशातील राजकारण बदलेले व केंद्रात भाजपा सरकार आले.महाराष्ट्रात भाजपा व सेनेची सत्ता होती.२०१९ च्या निवडणुकी- नंतर महाराष्ट्राचा सत्तेचा खेळ सुरु झाला.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेनंतर उध्दव ठाकरे यांनी पक्षाचे वंशपरागत आपण पक्षाचे सर्वेसर्वा वाटत होते.माझ्या बापाने पक्ष स्थापन केला,माझा बाप व पक्ष चोरला असे ठाकरे नेहमी शिंदे टोचून बोलताना म्हणतात! मग शिंदे केवळ पक्षात  सतरंज्या उचलण्यासाठी होते काय? राज्यात सामान्य कार्यकर्त्यांनी रक्त सांडले म्हणून शिवसेना उभी राहिली! बाळासाहेबांनी  सामान्य कार्यकर्त्यांना मुख्यमंत्री,नेते,आमदार,खासदार केले.त्यांनी स्वतः साठी व परिवारांसाठी काहीच मागितले नाही.उध्दवजी,आपण मुख्यमंत्री झालात! मुलाला कॅबीनेट मंत्री केले! मुलांचे पक्षात काय योगदान आहे? पण सत्तेसाठी निष्ठावंत चाळीस आमदार शिवसेना सोडून नव्हे,वेगळा विचार केला म्हणून त्यांना अपमानीत केले गेले, त्यांना खोके, गद्दार!म्हंटले गेले, ते कितपत योग्य आहे.उध्दवजी,आपण गोहाटीला गेला असता त्यांची बोलला असता!त्यांनाबाजू समजून घेतली असती पक्ष फुटलाच नसता,तुम्ही आमदाराना,खासदाराना कचरा फेकून दिले ते पवारांचा सल्ला माननतात,याचेच आश्चर्य वाटते! शे.का पक्षाचे ज्येष्ठ नेते व स्व.भाई केशवराव धोंडगे यांनी पवारांच्या तोंडावर "बिन चिपळ्याचा नारद'उगाच म्हंटले नाही!पवारांनी ठाकरेंच्या कानात जो सत्तेचा गुरुमंत्र दिला! तो पक्षाचा घात करणारा होता! हेच कळाले नाही.हे शेंबड्या पोरांना पवारांचे राजकारण कळलय! !याच पवारांनी  फडणवीस यांच्यात सत्ता स्थापनेबाबत गुप्त बैठक घेतली होती,यांची कबूली दिलेली आहे.पवार हे धूर्त नेते आहेत याचा भांडाफोड फणडवीस यांनी केला.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बहुतांशी आमदारांनी भाजपाला पाठिंबा देण्याचे पत्र तयार केले होते.या दरम्यान पवार दिल्लीत मोदींना भेटले व महाराष्ट्रात भाजपाला पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली. पण त्यांनी तीन अटी ठेवल्या,त्यात कन्या सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रीपद, राज्यसभेत पक्षाला दोन जागा आणि तिसरी अट म्हणजे भाजपाने फडणवीस यांना मुख्यमंत्री करू नये,कारण ते कठोर निर्णय घेतात! त्यांना राजकारणात 'अडजेस्ट' करता येत नाही.त्यात ते ब्राह्मण आहेत. फडणवीस मुख्यमत्री असताना राष्ट्रवादी काँग्रेसला पक्षाला संकटात आणणरे निर्णय आणले व बदलले आहेत! हे पवार उघडपणे सांगू शकणार नाहीत.भाजपाने मुख्यमंत्रीबाबतचा निर्णय अधिकार पक्षाचा असल्याने ती अट फेटाळली! पवार नाराज झाले! त्यांना स्वाभिमानाला भाजपा ठेच पोहचवली!ही घटनेची दोन्ही पक्षाने याची वाच्यता केलेली नाही.त्यामुळे राज्यात भाजपा सत्तेत येवू द्यावयाची नाही,याची मनात गाठ बांधली! दरम्यान फडणवीस व अजित पवार यांचा सकाळी सत्तेचा शपथविधी झाला.पवारांनी नवीन खेळी खेळली!राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा एकत्र आल्याची बातमी पसरली. ॉपवार एकटे नव्हते त्यांचे सोबत होते!पवारांनी अचानकपणे निर्णय फिरविला.राष्ट्रवादी काँग्रेस भाजपासोबत जाणार नाही?भाजपा जाण्याचा निर्णय पक्षाचा नाही, अजितदादांनी अंधारात ठेवल असे म्हंटले गेले.वास्तविक शरद पवारांमुळे तो शपथविधी झाला होता! तेंव्हा मात्र पवारांनी शहाणपणा दाखविला! त्यांनी अजित पवार व आमदारावर शिस्तभंगाची कारवाई न करता पक्षात घेतले व पक्ष वाचविला! पवार व आमदाराविरोधात कारवाईची भूमिका घेतली नाही. अन्यथा पक्ष तेंव्हांच फुटला असता.पण घटनेत दादांनी पक्षात बंड केले,हा बदनामीचा संदेश गेला.यात दादाना तोंडघाशी पाडले गेले.यात त्यांची नामुश्की झाली.पवारांना कट्टर हिंदुत्वादी पक्षाची चीड आहे.तरी त्यांनि खा. राऊत यांचे मध्यस्थीने शिवसेनेचे नेते उध्दव ठाकरे यांचेशी सत्तेचा सौदा केला. त्यासाठी ठाकरे यांना मुख्यमंत्री होण्याठी जी सुप्त इच्छा होती ती पूर्ण केली.कारण उध्दजींना काय पाहिजे,हे आधुनिक बिभीषण राऊत यांना माहीत होते पवार शिवसेनेला पाठिंबा देऊ शकतात मग भाजपाला का नाही?याचे उत्तर पवाराकडे  नाही. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्याचा डाव पवार व राऊत यांनी रचला होता.यातून सांगून सोनिया गांधी व काँग्रेसचि संमती मिळविली. यात ठाकरे व शरद पवार यांनी हा निर्णय पक्ष पातळीवर चर्चा अथवा संमती घेवून घेतला नाही. आम्ही पक्षाचे सर्वेसर्वा आहोत, या अंहकारातून या नेत्यांनी घेतला होता,तो पक्षाला घातक ठरला!त्यामुळे शिवसनेत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व प्रफूल पटेल व अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली बहुसंख्य आमदारांनी भाजपासोबत जाण्याचा निर्णय घेतला!मग बहुमताने शिंदे दांदानी पक्षाचा निर्णय चुकीचा कसा काय असू शकतो?या दोन्ही नेत्यांनी आणि आमदारांनी पक्षाची पक्ष सोडला नाही.ते पक्ष सोडून दूसरा पक्षात गेले असते म्हणजे भाजपात गेले असते तर गद्दार  ठरले असते.नेते पवार व ठाकरे यांनी जो निर्णय घेतला तो योग्य व बहुसंख्य आमदार,नेते कार्यकर्त्यांनी भाजपाला पाठिंबा दिला ते अयोग्य कसे? लोकशाहीत बहुमताचा व  विचाराचा आदर केला पाहिजे,हे तत्व पवार व ठाकरेनी पाळलेच  नाही! प्रथम शिवसेनेत व नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली.त्यामुळे या नेत्यांना पक्ष व चिन्ह गमवले आहे.यात पक्षातील बहुमताच्या आधारे निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष व धनुष्यबाण चिन्ह दिले.तसेच अजित पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व घड्याळ चिन्ह देण्याचा निर्णय दिलेला आहे.तो योग्यच असाच आहे.चंदीगडमध्ये महापौर निवडीवरुन देशातच लोकशाहीची हत्या'असे म्हंटले गेले.मग शिंदे व दादांच्या विरोधात निर्णय झाला असता तर लोकक्षाही हत्या ठरली नसती काय?राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे भवितव्य पुढे काय?.पक्षाला राज्यात स्वतः बळावर सत्ता स्थापन करता आली नाही.हे दुःख दादांनी सांगितले होते. त्याकडे पक्षच्या नेत्याने दुर्लक्ष केले गेले. राष्ट्रवादीच्या पक्ष मताच्या टक्केवारीत घट झाल्याने आयोगाने पक्षाची राष्ट्रीय मान्यता रद्द केली.खर तर! पवारांनी निवृत्त होवून पक्षाची सूत्रे नवीन पिढीकडे द्यायला काय हरकत होती.! पवारांनी पक्षात आता भाकरीफिरविण्याची वेळ आली,असे वक्तव्य केले.त्यांनी पक्षातील नेत्यांशी चर्चा न करता अचानकपणे निवृत्तीचा घोषणा केली. पवारांना  निवृत्तीचे हे नाटक का केले? पक्षात बहुतांनी नेत्यांचा कौल आपल्या बाजूने आहे!याची खात्री करण्यासाठी? पवारांनी पक्षाची सर्व सूत्रे कन्या खा.सुप्रिया सुळे यांना द्यावयाची होती.यातून पुन्हा त्यांनी अचानकपणे कार्याध्यक्षपदी  सुप्रिया सुळे व प्रफूल पटेल यांची निवड केली .सुळे यांच्याकडे महाराष्ट्र, पंजाब आणि हरियाना राज्याची.तर गुजरात,मध्यप्रदेश, आणि गोवा राज्यात पक्षाचे अस्तित्व ती जबाबदारी कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांना दिली.म्हणजे सुळे यांचे आदेश दादांनी मानले पाहिजेत! राष्ट्रवादी काँग्रेसने ज्येष्ठ,अनुभव हे निकषालामहत्व  नाही काय?.दादांना खड्यासारखे पक्षाच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न होता.त्यातून त्याचा स्फोट झालेला आहे.दादांना डावले जात गेले ते नाराज दिसतच होते,केवळ दादा नव्हेत पक्षाच्या स्थापनेपासून असलेले विश्वासू नेते प्रफूल पटेल,अजित पवार,छगन भुजबळ, सुनील तटकरे आदी ४१ आमदारांनी भाजपासोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला.यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कोणते नुकसान झाले? पक्ष जीवंत आहे ना! पवारांनी पक्षात फूट पडली नसल्याचे म्हंटले.यात साहेब'काही तर चमत्कार करतील,असे पवार गटाला वाटत होते.प्रफूल पटेल व दादा हे 'साहेबांना' नेते मानतात,त्यांनी आम्हाला आशीर्वाद द्यावा,अशी भेट विनंती करत होते.म्हणतात कुटुंबातील  वडीलधारी माणसाने मनात राग धरुन बसायचे नसेत. लहानांनी चूक केली असेल तर माफ करुन घर टिकवायचे असते! पक्ष हा परिवार मानला जातो.ठाकरे यांचेत नेतत्वाचे कौशल्य नाही,असा टोमणा खुद्द पवारांनी मारला होता.मग पवार साहेब आपले कौशल्यपणा पक्षासाठी का लावले ना? पक्ष फुटू का दिला? याला त्यांची केवळ हट्टवादी भूमिका व अंहकार कारणीभूत आहे.पक्ष बुडाला तर चालेल पण मी व माझा परिवार त्यात कायम असला पाहि, ही संकुचित स्वार्थवृत्ती लोकशाहीत पक्षासाठी घातक ठरते.त्यात सुप्रिया सुळे ह्या वडिलांचे (पवारांचे) मतपरिवर्तन शकल्या असत्या तसे त्यांनी प्रयत्न केले नाहीत.एक हिंदीत म्हण आहे,'बोया पेड बबूल का आम कहांसे खावोगे ' पक्षाचे शरद पवार  व शिवसेना नेता उध्दव ठाकरे यांचे असे झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दाव्याबाबतत आयोगाकडे दोन्ही बाजूची सुनावली झाली.आयोगाने मंगळवार दि.६ फेब्रवारी रोजी सध्याकाळी ७.१८ वा.  दिला.यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पक्षाचे घड्याळ हे चिन्ह अजितदादा गटाला दिल्याचा निर्णय दिला,आयोगाचा निकाल हासुमारे १४१ पानाचा आहे.या निकाल मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त अनुप चंद्रा व अरुण गोयल या तिघांनी दिला आहे. पक्षाची घटना व ध्येय बहुमत आधारावर निकाल दिला,असे म्हंटले.पण निकालात पक्षांर्तगत निवडणूक झाली नसल्याचा ठपका ठेवला आहे. आयोगाच्या निर्णयावर या निर्णयावर पवार गटाचे जयंत पाटील,सुप्रिया सुळे,अनिल देशमुख जितेंद्र आव्हाड,काँग्रेसचे नाना पोटोले यां नेत्यांनी संवैधानिक निवडणूक आयोगावर आगपाखड केली. हा निकाल म्हणजे लोकशाही हत्या.तो दिल्लीत लिहिला गेला.तोच आयोगाने निकाल  दिला. या निकालामागे अदृश्य व्यक्तीचा हात आहे,असेही म्हंटले गेले. यात दोन्ही पक्षातील मतभेद,व नाराजी व नेतृत्वाची चूक असताना खापर मात्र भाजपावर फोडले गेले.आता शरद पवार गटाला नवीन पक्षाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार असे, नाव मिळाले आहे. यात या नवजात पक्षाचे बारसे कधी करणार? याची उत्सुकता आहे.या राजकीय घडामोडीमुळे महाराष्ट्रातील राजकारण मनोरंजक बनले आहे.यात शिवसेनेचा शिदे गट भाजपाच्या बाजूने व दुसरा गट काँग्रेसचा समर्थक तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचा दादा गट मोदी समर्थक तर पवार गट काँग्रेसचा पाठिराखा आहे.महाराष्ट्रात या राजकीय घडामोडी घडल्या असल्या तरी अगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत भाजपाला धोका नाही.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मुलांचं आयुष्य उजळावं म्हणून ते कणाकणानं झिजत असतात. कष्ट, त्रास आनंदानं सहन करतात. स्नेहाचं, प्रेमाचं तेल त्यांनी त्या दिव्यात घातलेलं असतं. जोपर्यंत ते आहेत, तोपर्यंत ते हे स्नेहाचं, प्रेमाचं तेल कमी पडू देत नाहीत. स्नेहाचं तेल आणि वाती असतात म्हणूनच ज्योत प्रकाशमान होते, हे ज्योतीनं कधी विसरू नये. आता त्या ज्योतीसमोर एकच लक्ष्य असतं. तिच्या भोवती जो अंधःकार असतो, त्याला नाहीसं करणं. तेच तिचं जीवनकार्य असतं. लहानपणी वाचलेली घरभर प्रकाश ही गोष्ट आठवते का ? एक वडील आपल्या मुलांना प्रत्येकी दहा रुपये देतात आणि त्या दहा रुपयात घर भरेल अशी वस्तू आणायला सांगतात. त्या मुलातील एक मुलगा मोठ्या हुशारीने आपले डोके चालवून चार पणत्या घेऊन येतो आणि संध्याकाळच्या वेळी त्या घरात लावतो. संपूर्ण घर प्रकाशाने उजळून जाते, अंधःकार नाहीसा होतो. तेच काम दिव्याचे असते.

या प्रकाशमान ज्योतीवर आणखी एक जबाबदारी नकळत येते. ती म्हणजे दिव्याने दिवा पेटवणं. आपल्या आयुष्यात जेवढे दीप आपल्याला प्रज्वलित करता येतील, तेवढे करायचे असतात. तरच दिव्याचा जन्म सार्थकी लागतो. ज्ञानेश्वर माउली म्हणतात
**जैसी दिपकळिका धाकुटी । परी बहू तेजाते प्रगटी ।तैसी सद्‌बुद्धी हे थेंकुटी । म्हणो नये ।।**
दिव्याची ज्योत जरी छोटी किंवा लहान असली तरी तिचे तेज पुष्कळ असते. त्या तेजात अंधार दूर करण्याचे सामर्थ्य असते. तसेच माणसाजवळ थोडी जरी सद्‌बुद्धी असेल, तर ती त्याचा जन्म सार्थकी लावण्यास पुरेशी असते. ती त्याची जन्ममृत्युपासून सुटका करते. या ज्योतीने एक काळजी मात्र घ्यायची असते. ती म्हणजे ' अहंकाराचा वारा ।न लागो राजसा । माझिया विष्णुदासा । भाविकांसी ।। संत नामदेव महाराज म्हणतात अहंकाराचा वारा लागू देऊ नका. त्यामुळे भल्याभल्यांचा नाश झाला आहे. नम्रता हा फार मोठा गुण आहे. ' महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती असे आपण म्हणतो ते खरे आहे.



# आनंदी पहाट

## विचारवंतांचे वैचारिक धन आपल्या मनासाठी उपयुक्त

आधुनिक केसरी

अगदी प्राचीन काळापासूनच आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसं विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरतं निमित्तच ठरत असतं. आयुष्याच्या प्रवासांत सोबत हवी असते, ती विचारांचीच. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतंच असं नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचंच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचं दिसून येत असतं. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे? असा विचार कधी येतो का हो आपल्या मनांत? विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसं मिळेल ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणं महत्वाचं ठरतं. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक आणि मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा आणि आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झालं, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचं दर्शन होतंच राहतं. संपूर्ण जग सुंदर आहे, फक्त तसं पहायला हवं; प्रत्येक नातं जवळचं आहे, फक्त ते उमजायला हवं; प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, फक्त तसं समजायला हवं. ते समाध आणि आनंद आपल्याला मिळत राहायला हव्यात म्हणून सकारात्मक विचार, आचार आणि संस्कार ह्याचं महत्व आपल्याला कळणं आणि अवगत होणं आवश्यक असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# वेदना...

आधुनिक केसरी

"वेदनेच शेवटचं टोक म्हणजे मौन". याचा अर्थ असा की खूप भयंकर वेदना होतात तेव्हा माणूस रडूही शकत नाही आणि बोलूही शकत नाही .त्याचं मौन म्हणजेच त्याला झालेल्या तीव्र वेदना. ठेच लागली तर माणूस वेदनेने आई म्हणून विव्हळतो तरी. ज्याप्रमाणे प्रसूती वेदना या सुद्धा खूप असह्य असतात. सहनशील स्त्रीच फक्त या वेदना सहन करू शकते. दुःखापेक्षा कितीतरी महाभयंकर या वेदना यातना देतात. काही जखमा शरीरावर होऊन माणूस रक्तबंबाळ होतो. पण हृदयाला जेव्हा वेदना होतात तेव्हा ते हृदय फक्त रक्त बंबाळच होत नाही तर त्याचे हजारो तुकडे होतात. आणि मग ते लवकर जोडणं फार अवघड असतं. म्हणून शक्यतो आपल्याला मिळालेला हा पवित्र मानव जन्म सात्विक कर्म करून उजळून काढू या." हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा. अशी सात्विक भक्ती आपल्यात असावी .दुसऱ्यांच्या वेदना या आपल्या हृदयापर्यंत पोहोचल्या पाहिजेत." आपले सुख इतरांचे व्हावे, इतरांचे दुःख आपले व्हावे". अशी भगवंत वृत्ती असावी." तुझे चरणी माझा देह ठेवावा, त्रैलोकी तू तो स्वैर उधळावा. मी आज माणूस म्हणून जगतोच. पण यात माझं काही नाही हे सगळं तुझंच आहे. सुखदुःख, आनंद, समाधान, धनदौलत, बुद्धी सर्व तुझंच आहे. मी एक पुतळा आहे. तुझ्या इशाऱ्यावर चालणारा. अशा उदात्त भावनेने जर आपण वागत राहिलो तर कदाचित आपल्या काही वेदना कमी होतील. दुसऱ्यांना पण आपण त्रास देऊ नये. जेणेकरून इतरांना वेदना होतील .माणूस म्हणून जन्माला आलो आहोत तर माणसासारखं वागू. बुद्धिवान प्राणी आहे माणूस. जिभेवर सरस्वती आहे आपल्या. तिचा सन्मान करू.वाणी स्वच्छ, सुंदर ,शुद्ध ठेवू. म्हणजेच सरस्वतीचा अपमान होणार नाही. मी,अहंकार यांना समुद्रात तर्पण देऊ. म्हणजे कोणालाच वेदना होणार नाही....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.35

# उपकार

आधुनिक केसरी

एका गावात एक निर्धन मनुष्य राहत होता. परिस्थिती गरीबीची असूनही तो मनाने उदार होता. आपल्या घासातील घास देण्यासही तो कमी पडत नसे. एकदा एका शेठजीकडे तो जेवावयास गेला असताना त्या शेठजीने त्याला पंचपक्वान्नाचे ताट वाढून दिले. ती भरगच्च पदार्थांनी भरलेली थाळी बघून त्या गरीबाला वाटले की यातून किमान तीन माणसांची भूक भागू शकेल. त्याने शेठजीची परवानगी मागितली व त्यातील अन्न त्याने बरोबर घेतले व घराकडे जाण्यास निघाला. रस्त्यात त्याला एक भिकारी भेटला त्याला त्याने खायला दिले. त्यातून उरलेले अन्न घेऊन तो घरी आला, तो जेवायला बसणार इतक्यात एक भिक्षुक या माणसाच्या घरी आला व त्याने त्याला अन्नदान करण्याची विनंती केली. गरीबाने त्याच्यासमोरील ताट त्या भिक्षुकाच्या स्वाधीन केले. त्यानंतर अजून एक अपंग व्यक्ती दाराशी आली त्यानेही या गरीबाकडे अन्न मागितले त्यालाही याने आपल्या थाळीतील अन्न खायला दिले. आता याच्याकडे देण्यासारखे काहीच शिल्लक राहिले नाही तेव्हा याने स्वतःची भूक भागविण्यासाठी एक भांडेभर पाणी घेतले तर समोरून एक वृद्ध व्यक्ती आली व तिने ते पाणी पिण्यासाठी मागितले. याला आता खाण्यापिण्यासारखे काहीच उरले नाही तरीही ही व्यक्ती समाधानात होती आजचा दिवस आपल्यामुळे किमान चार लोकांना तरी खाण्यापिण्यास मिळाले. तो ह्याच विचारात असताना तेथे देव प्रगटले व म्हणाले,'मी तुझी परीक्षा घेण्यासाठीच भिकारी, भिक्षुक, अपंग आणि वृद्ध व्यक्तिचे रूप घेतले होते व तुझ्याकडून काही ना काही मिळते का नाही हे पाहिले आणि तु स्वतःचा विचार न करता दुस-याचा जीव जाणून घेतलास व देत राहिलास. आता या पुढे तुला काहीच कमी पडणार नाही असा मी तुला वर देतो." इतके बोलून देव अंतर्धान पावले. तात्पर्य : देण्यातच खरे सुख लपलेले आहे. कुणाचाही घास हिरावून घेण्यापेक्षा कुणाला तरी एखादा घास देता कसा येईल याचा विचार करणे यातच खरे सुख लपलेले आहे.


# निरुपण

आधुनिक केसरी

देहामधून जें आलें ।इंद्रियें प्राणें दुःख जालें ।
तें आध्यात्मिक बोलिलें ।तापत्रईं ॥१४॥
देहामधून काये आलें ।प्राणें कोण दुःख जालें ।
आतां हें विशद केलें ।पाहिजे कीं ॥१५॥
खरुज खवडे पुळिया नारु ।नखरुडें मांजर्या देवि गोवरु ।
देहामधील विकारु ।या नांव आध्यात्मिक ॥१६॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ज्ञान इन्द्रिये पाँच मिल,
बुद्धि चित्त संग होय ।
कोश बने विज्ञान मय, सर्व अच्छादित
होय ।।४९।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/४९
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
पाच ज्ञानेंद्रिये, बुद्धि आणि चित्तासह
विज्ञानमय कोश बनतो, ज्यामुळे सर्व
देह संघाताची शक्ती आच्छादली जाते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# जाणपणनिरूपण

आधुनिक केसरी

त्याला चांगल्या व खरे खोट्याची पारख असते. धर्म कोणता व अधर्म कोणता ह्याची जाण त्याला असते. तो सतत सारासार विचार करून निर्णय घेतो. प्रसंगानुरूप कसे वागावे हे त्याला समजते काळ वेळ बघून जाणता वागतो. पण अडाणी चुकीचे कर्म करतो. व्यवहारात कसे वागावे हे त्याला समजत नाही. अधर्मी सतत दुसऱ्या चा अपमान करतो. प्रसंगी जीवही घेतो. अशा अडाणी माणसामूळे आजूबाजूच्या सर्वांना त्रास होतो. म्हणून अज्ञान वाईट आहे. अज्ञानी स्वभाव सोडून जो आत्मानात्मक विवेकाने वागतो तो मोक्ष पदाला पोहचतो. ज्ञानी होण्यासाठी सतत जागृत असावे. ज्ञानाचे मोठेपण सर्वांना मान्य आहे. कोणतेही कार्य असले तरी ते ज्ञानाशिवाय कसे करावे हे कळणार नाही. समर्थ ज्ञान प्रधान कर्मावर भर देतात. म्हणून सतत सत्कर्म करत रहावे. भक्ति असो वा कर्म असो तिथे ज्ञान हे आवश्यकच आहे.ज्ञान हे स्मरणरूप आहे तर अज्ञान हे विस्मरण रूप आहे. "मी आत्माच आहे"हे स्मरण अखंड रहाणे हे ज्ञानाचे लक्षण आहे. तर "मी देह आहे "हे दृष्याचे स्मरण अखंड रहाणे हे अज्ञानाचे लक्षण आहे. अज्ञानामुळे स्वस्वरूपाचे विस्मरण असते. समासाच्या शेवटाकडे जाताना मी एवढेच म्हणेन की भक्तिमार्गाची पताका खांद्यावर घेतली आहे. चांगले वाईट भलेबुरे यांच्या पलीकडे जाऊन स्वस्वरूपाशी एकरूप होऊन परब्रम्हास लीन व्हावे तिथे भाषा बंद पडते. रहाते ते केवळ आणि केवळ नामजिथे अत्यंत प्रतिभावान माणुसकी लाभते व ब्रम्हपदाशी एकरूप होऊन जातो तो खरा ज्ञानी होय.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# प्रपंचात स्त्रीने कसे वागावे ?

आधुनिक केसरी

पतिसेवा हाच आपला धर्म । प्रपंचाचे कर्तव्य हेच आपले सत्कर्म। अंतरी समाधान हेच आपले साधन ॥ सर्वांनी राहावे सुखी । रामनाम नित्य घ्यावे मुखी ॥ सर्व सुखाचा लाभ । घरबसल्या मिळतो देव ॥ कर्तव्यी असावे तत्पर । मुखी नाम निरंतर ॥ देहाने करावी सेवा । याहून दुजा लाभाचा नाही ठेवा ॥ परमात्म्याने जे जे दिले । ते ते त्याचे म्हणून सांभाळणे भले ॥ त्या लोभात न गुंतवावे चित्त । हाच परमार्थ सत्य ॥ नसावे कशाचे ज्ञान । वाटावे सदा घ्यावे रामनाम । प्रपंची राहावे समाधान । हेच भक्ताचे मुख्य लक्षण जाण ॥ पतिव्रता साध्वी थोर थोर। त्यांचे करावे स्मरण । जे करील पुण्यवान ॥ न बोलावी पतीस दुरुत्तरे । समाधान राखोनि अंतरे। जे सज्जनांस आवडेल खरे ॥ पतीपरते न मानावे दुजे दैवत । घरात राखावे नेहमी समाधान ॥ तुमच्या पतिसार'यांची संगति । हीच भाग्याची खरी प्राप्ति ॥ त्यांच्या आज्ञेने वागावे । त्यांच्या सुखात आपले सुख पाहावे ॥ राम धरिता चित्ती । प्रपंचाची काळजी त्याचे हाती ॥
प्रपंची असावे खबरदार ॥ परी लोभात न गुंतावे



अंतर । धन संग्रही राखावे । सर्वच खर्चून न टाकावे । ही प्रपंचाची रीत । सर्व जगात आहे चालत ॥ जगाची रीत लोभात असणे । हे मात्र आपणास न आवडावे ॥ देहाने करावी पतिसेवा । ध्यानी धरावा रामराया । त्याचा संसार उत्तम झाला । हाच आशीर्वाद माझा भला ॥ प्रपंचाची संगति । काळजीची उत्पत्ति । तेथे धरिता नामाची संगति । काळजीविरहित आनंद देई ॥ मुलीच्या लग्नाची काळजी करू नये । प्रयत्नाला सोडू नये। प्रयत्नाअंती परमेश्वर । हे सज्जनांचे बोल । मनी ठसवावे खोल ॥ आरंभी ज्याने स्मरला राम । त्यालाच प्रयत्नाअंती राम । हा ठेवावा विश्वास । सुखे साधावे संसारास ॥ मिष्ट भाषण वरिवरी। विष आहे अंतरी । असल्याची संगत नसावी बरी ॥ मी तुम्हास सांगतो हित । दृश्यांत न ठेवावे चित्त । राम सेवेकरता प्राण । म्हणून करणे आहे जतन ॥ मान अपमान जगतात । ते मूळ कारण झाले घातास ॥ कोणतेही काम करीत असता । राखावी मनाची शांतता । अगदी व्यवहारबुद्धीने कामे करावी सर्वथा ॥ आप्तइष्ट सखेसज्जन । यांचे राखावे समाधान । परी न व्हावे त्यांचे अधीन ॥ सर्वांशी राहावे प्रेमाने । चित्त दुश्चित्त न व्हावे कशाने ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे ॥ अगदी व्यवहाराच्या मार्गाने जावे । त्यात रामाचे अधिष्ठान राखावे ॥
**७०. रामावर ठेवावा विश्वास ।सुखाने करावा संसार ॥**

# संत एकनाथ

आधुनिक केसरी

एकनाथ आणि गिरिजाबाई यांना गोदावरी व गंगा या दोन मुली व हरी नावाचा मुलगा झाला. त्यांचा हा मुलगा हरिपंडीत त्याने नाथांचे शिष्यत्व पत्करले. एकनाथांनी समाधी घेतल्यानंतर हरिपंडितांनी दरवर्षी नाथांच्या पादुका आषाढीवारीसाठी पंढरपुरास नेण्यास सुरुवात केली. हरीला प्रल्हाद, मेघश्याम व राघोबा अशी तीन अपत्ये झाली. पैकी केवळ मेघश्याम या मधल्या मुलाचा मूळ वंश सद्य स्थितीत पैठण येथे अस्तित्वात आहे. कवी मुक्तेश्वर हे नाथांचे मुलीकडून नातू होत. ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे २५० वर्षांनी एकनाथांचा जन्म झाला.

रविवार, ११ फेब्रुवारी २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १७४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 11 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-173 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-05

# देश १७ व्या लोकसभेला नक्कीच लक्षात ठेवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : १७ व्या लोकसभेच्या पाच वर्षांत आपण आपला वेळ राष्ट्रासाठी समर्पित केला. त्यामुळे पुन्हा एकदा आपल्या संकल्पांना राष्ट्राच्या चरणांत समर्पित करण्याची ही वेळ आहे. या पाच वर्षांत देशात रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म पाहिले. रिफॉर्मपासून परफॉर्म आणि परफॉर्मपासून ट्रान्सफर्म पाहता येणे हे खूप दुर्मिळ आहे. एक नवा विश्वास तयार होत आहे. हे सर्व १७ व्या लोकसभेपासून आज देश अनुभव करत आहे आणि मला पूर्ण खात्री आहे की देश १७ व्या लोकसभेला नक्कीच लक्षात ठेवेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना व्यक्त केला.**



पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी केंद्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राम मंदिराच्या प्रस्तावावर भाषण केले. १७ व्या लोकसभेचे हे १५ वे अधिवेशन आहे. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन अंतरिम असून १७ वी लोकसभा लवकरच विसर्जित करण्यात येणार आहे. दरम्यान या १७ व्या लोकसभेच्या शेवटच्या अधिवेशनात मोदी यांनी संवाद साधला. यावेळी त्यांनी सर्व खासदार आणि लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांचे आभार मानले.

या सर्व प्रक्रियांमध्ये सदनच्या सर्व माननीय सदस्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. त्यामुळे मी गृहनेता आणि तुमचा सहकारी म्हणून तुमचे अभिनंदन करतो. तसेच या सभागृहाची उत्पादकता जवळपास ९० टक्के होती. मी अध्यक्षांप्रतीही हृदयपूर्वक आभार व्यक्त करतो, असे म्हणत लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांचे आभार मानले. ओम बिर्ला सतत हसतमुख चेहऱ्याने सामोरे गेले. सभागृहात काहीही झाले तर त्यांचा चेहरा सतत हसतमुख असत. प्रत्येक परिस्थिती संतुलित राहून त्यांनी निष्पक्षपणे नेतृत्त्व केले, असेही ते म्हणाले. नव्या संसदेबाबत सर्वांनी याआधी खूपवेळा चर्चा केली. पण कोणीच नवे संसद तयार केले नाही. पण तुमच्या नेतृत्त्वाने निर्णय दिला आणि निर्णयाला पुढे पाठवले आणि परिणामी देशाला नवे संसद भवन प्राप्त झाले आहे, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्या संसदेचंही श्रेय लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिले.




# सामाजिक बांधिलकी; डॉ. अंकुश देवसरकर यांनी स्वखर्चाने बनवला रस्ता

आधुनिक केसरी न्यूज

**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** आपलं समाजाप्रती काहीतरी देणं लागतं या भावनेतून डॉ.अंकुश देवसरकर, यांनी , बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेला हरडप ते देवसरी हा रस्ता स्वखर्चाने बनवून सामाजिक बांधिलकी जपत, जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. मराठवाडा व विदर्भाला जोडणारा दुवा या जाणिवेतून जवळपास पंधरा वर्षांपूर्वी हरडप गावाजवळून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवर महत्वकांक्षी बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्यातील जलसाठ्याचा उपयोग नदीकाठच्या बहुतांश शेतकऱ्यांना होत आहे.





याबरोबरच पेनगंगा नदीच्या पल्याड असलेल्या, विदर्भातील, देवसरी, खरूस, कारखेड, चालगणी, विडूळ, ब्राह्मणगाव, चातारी, बोरी, आधी गावाकडे जाण्यासाठी, खूप जवळचा व पर्यायी मार्ग बनला आहे., शिवाय, देवसरी येथील भगवती मातेचे जागृत देवस्थान असल्याने, दसरा नवरात्री उत्सवात या ठिकाणी मोठी गर्दी होते. दूरवरून येणाऱ्या भाविकांसाठी हा रस्ता सोयीचा बनला आहे.

परंतु, हरडप गावाजवळून सदर बंधाऱ्याकडे जाणारा रस्ता अरुंद पाऊलवाट असल्याने, वाहनधारकांना वाहन चालवताना कोंडी होत असे. हा रस्ता कायमस्वरूपी व्हावा या जाणिवेतून, देवसरी येथील डॉ .अंकुशराव देवसरकर या उच्चशिक्षित डॉक्टर कुटुंबीयानी असून, या रस्त्याचा झालेला जटिल प्रश्न मार्गी लावण्यासाठी, पुढाकार घेत, स्नेहभाव जपत, रस्ता सुधारण्याचे सामाजिक कार्य हाती घेतले. हरडप ते धोत्रा या रस्त्यापासून अर्धा किलोमीटर 25 फूट बाय पाचशे मीटर जमीन शेतकरी अशोक सूर्यवंशी यांच्याकडून अठरा लाख रुपये किमतीत विकत घेऊन स्वखर्चाने रस्ता बनवून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

समाजात अनेक घटक आहेत. जे आपले कर्तव्य करत असताना अप्रत्यक्षपणे आपली सेवा करत असतात. याचा प्रत्यय डॉक्टर अंकुश देवसरकर यांच्या सामाजिक योगदानातून दिसू आला आहे. याबरोबरच, शेतकरी अशोक सूर्यवंशी यांचा सुद्धा या कामी खारीचा वाटा आहे. यामुळेच, हा रस्ता पूर्वपदावर आल्याबद्दल पंजाबराव पाटील कदम हरडपकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, जगदेवराव पवार पाथरडकर, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अभ्यासक, सिताराम पाटील फळीकर,सरपंच, वंदनाबाई वाठोरे (सरपंच हरडफ), बालाजी सूर्यवंशी (तंटामुक्ती अध्यक्ष), सुनिल पाटील, भीमराव मोरे, ज्ञानेश्वर मोरे, शरद कदम, मारोतराव सूर्यवंशी, अशोक सूर्यवंशी, नागोराव सुर्यवंशी, विक्रांत वाठोरे,शिवाजी जाधव, पवन मोरे कृष्णा गिरामकर,कपिल वायवळ, संदिप सुर्यवंशी, राजु पाटील मोरे, देवराव वाठोरे, बापुराव वाठोरे, गौतम वाठोरे, सिद्धार्थ वाठोरे, समाधान व्यक्त केले आहे.

# भगवंताचे नामस्मरण केल्यास मनुष्यजीवनात विरक्ती

## ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

श्रीक्षेत्र राजुरः जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात संसार हे एक व्यसन आहे.संसारी मनुष्याच्या हातून कळत नकळत अपवित्र, अशुद्ध गोष्टी घडत असतात.म्हणून संसाररूपी व्यसनाधीन लोकांनां भगवंताची व्याप्ती कळत नाही.त्यामुळे ते देवाला भजत नाहीत.परंतु या मायावी भावसागरातून मुक्ती मिळवायची असेल तर परमार्थ केलाच पाहिजे.भजन-कीर्तनाच्या माध्यमातून भगवंतांचे नामस्मरण केल्याने मनुष्य जीवनात विरक्ती निर्माण होते, असे प्रतिपादन ह.भ.प.उमेश महाराज दशरथे यांनी केले.

राजुरेश्वर महागणपती येथे चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद् भागवत कथा सोहळ्यामध्ये चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्प दशरथे महाराज यांनी गुंफिले.कीर्तन सेवेसाठी त्यांनी संसाराच्या अंगी अवघीच व्यसने ! आम्ही या कीर्तने शुद्ध झालो !! आता हे सोवळे झाले त्रिभुवन ! विषम धोऊन सांडीयेले !! ब्रम्हपुरी वास करणे अखंड ! न देखीजे तोंड विटाळाचे !! तुका म्हणे आम्हा एकांताचा वास ! ब्रम्ही ब्रम्हरस सेऊ सदा !! या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची निवड केली होती. जीवनात कठोर साधना केल्याशिवाय साध्य प्राप्त होत नाही.संसार व परमार्थ यात पुर्णतः भिन्नता आहे.संसारात सर्वकाही माझे या स्वार्थीवृत्तीतून सत्ता ,संपत्ती संग्रही केली जाते तर परमार्थात या सर्वांचा त्याग केला जातो.ईश्वराच्या नामस्मरणातून परोपकारी भावना निर्माण होते व यातूनच दुसऱ्यांसाठी जगण्याची प्रेरणा मिळते.कीर्तनातुन विरक्ती निर्माण होते.म्हणून जीवनात सत्संग झाला पाहिजे.त्यासाठी एकांत व सातत्या यांची आवश्यकता आहे असे दशरथे महाराज म्हणाले.



यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायनाचार्य कैलास महाराज पवार,ओमकार महाराज कागदे,भगवान महाराज गाडेकर,उमेश महाराज ठोंबरे, कृष्णा महाराज मोरे, लक्ष्मण महाराज कराड, विठ्ठल महाराज शिरसाठ,व्यासपीठ चालक गोरक्षनाथ महाराज सोनवणे, सुदाम महाराज निर्मळ तसेच संत-महंत , कीर्तन श्रवण करण्यासाठी परिसरातून आलेले भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह समिती संयोजक विष्णू महाराज सास्ते यांनी उमेश महाराज दशरथे यांचा सत्कार केला.

# सांस्कृतिक अर्थकारण आणि तरुणाई



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**सांस्कृतिकदृष्ट्या आपण ज्या प्रतिमा आणि प्रतिकांची निर्मिती करत असतो त्याभोवती नंतरच्या काळात एक अर्थवलय निर्माण झाल्याचे दिसून येते. हे फक्त आपल्याकडेच होते असे नाही तर जगात कोठेही अशा प्रकारच्या प्रतिमा आणि प्रतिकाभोवतीचे वातावरण कमी अधिक प्रमाणात दिसून येते. अर्थकारण जनकेंद्री करण्याचा आणि आपणही काहीतरी कमाई करत आहोत हे दाखविण्याचा एक स्वस्त पर्याय म्हणूनच याकडे पाहिले पाहिजे. राज्यसत्ता किंवा व्यवस्थात्मक प्रणाली सर्वांना सर्वकाळासाठी रोजगार उपलब्ध करून देऊ शकत नाही हे खरे असले तरी अशा स्वस्तातल्या पर्यायाचा उदोउदो हा राष्ट्राच्या ऐहिक प्रगतीतील मोठी धोंड असते.**



## क्षितिजापल्याड

हे बराच काळ निघून गेल्याशिवाय सामान्य माणसास समजत नाही.भौतिकदृष्ट्या कमावलेल्या ज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक प्रगती व्हावी आणि ती नैतिक पायावर अधिष्ठित असावी अशी अपेक्षा ठेवली जाते. यात गैर काही नाही, परंतु सामाजिक आणि नैतिक म्हणजे काय याचा उहापोह केल्याशिवाय आपणास ते साधता येणार नाही. सांस्कृतिक अंगाने विचार केले जाणारे प्रत्येक क्षेत्र हे सामाजिकदृष्ट्या नैतिक असतीलच असे आपण म्हणू शकत नाही. कारण समाजधारणा बलवत्तर करण्यासाठी म्हणून ज्या गोष्टी त्या त्या काळात आवश्यक वाटल्या त्या सर्व समाजधुरिणांनी रुजवण्याचा प्रयत्न केला म्हणून त्या नैतिक नव्हेत. यामध्ये नैतिकतेपेक्षा व्यवस्थात्मक तडजोड हा भाग महत्त्वाचा होता आणि आहे. आपली सांस्कृतिक जडणघडण, भौतिक ज्ञान आणि प्रागतिक विचार याची सांधेजोड आपणास काळाच्या पार्श्वभूमीवर घालता आली पाहिजे. सूर्य, चंद्र किंवा इतर ग्रहांना देवत्व प्राप्त करून दिल्यामुळे आपली आत्मशांती जरी साधता आली तरी भौतिक प्रगती मात्र खुंटू शकते हे इतिहाससिद्ध आहे. कारण एखाद्या वस्तूबद्दलचा पूज्यभाव त्याचे विश्लेषण किंवा पूर्णपणे आकलन करून घेण्यास बाधा पोहोचवतो. देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे ही प्रबोधनकार ठाकरे यांची छोटीशी पुस्तिका जिज्ञासूंनी वाचावी म्हणजे आपल्याकडून विश्लेषित करण्याचे किती मुद्दे राहून गेले आणि त्यांचे विश्लेषण याही पद्धतीने होऊ शकते याची साक्ष पटते. सांस्कृतिक क्षेत्रातील अर्थकारण हे मानसिकदृष्ट्या पंगूत्वाकडे घेऊन जाणारे ठरते. त्याचे कारण असे की, त्यात एकतर नाविन्याचा काही मागमूस नसतो आणि व्यवस्थात्मक चौकट भेदून नव्या काळाचे आव्हान कसे स्वीकारायचे याचे शिक्षण नसते. केवळ पारंपरिक कार्य कुशलतेच्या बळावर टिकून राहणे आणि ही गुणसूत्रात्मक कुशलता पुढच्या पिढीस हस्तांतरित करणे यावरच सर्व भिस्त अवलंबून असते. नव्या विज्ञानयुगाच्या मूल्यांना आपल्यात सामावून घेऊ शकेल आणि काळाची आव्हाने स्वीकारू शकेल असे काही त्यात असत नाही. शिक्षण, रोजगार, आरोग्याच्या सोयी, दिवाबत्तीची सुविधा आणि समाजकंटकापासून संरक्षण ही राज्याची मूलभूत कर्तव्ये असताना आज केवळ भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर देखील त्याकडे हेतूपुरस्सरपणे दुर्लक्ष होत असेल तर आपली मनुष्यता कोणत्या दिशेने प्रवाहित होत आहे, हे सांगण्यासाठी कोणत्याही पुरोहिताची गरज नाही. आज देशाला पैशाचा फुगीरपणा आवश्यक नाही तर पैसा निर्मिती महत्त्वाची आहे.

हा पैसा एकतर शेती क्षेत्रातून निर्माण होतो किंवा कारखानदारीतून. आजही भारतात एकूण लोकसंख्येच्या पासष्ठ ते सत्तर टक्के जनता शेतीवर अवलंबून असेल तर राज्याने विशेषत्वाने त्या क्षेत्राकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मागच्या दोन तीन दशकात शेतीची जी वाताहत झाली त्याला आमची



चुकीची धोरणे जबाबदार आहेत हे कोणीही कबूल करेल पण राज्यकर्ते मानणार नाहीत. दहा वर्षांपूर्वी शेतीमालाला असणारा बाजारभाव आणि आजची किंमत याची तुलना करता त्यात अत्यल्प वाढ झाल्याचे दिसते. याउलट शेती आदानांच्या किंमतीत मात्र आमूलाग्र वाढ झाली. ही तफावत आम्ही कधी लक्षात घेणार आहोत. ज्या भारतीय संस्कृतीची मदार पूर्णपणे इथल्या सामान्य माणसावर आणि त्याच्या चांगुलपणावर अवलंबून आहे तो सामान्य माणूस आज देशोधडीला लागण्याच्या अवस्थेस येऊन ठेपला आहे. इथल्या लक्षावधी कुटूंबाचा उदरनिर्वाह जर बेलफुलें विकून अथवा मंदिराच्या बाहेर काहीतरी जिनसा विकून चालत असेल तर लोक फार भक्तीवान झाली असा त्याचा अर्थ होत नाही. हाती दुसरे काही काम नाही म्हणून त्याला नाईलाजास्तव तिथे पथारी अंथरावी लागते. नुसत्याच पदव्यांचे भेंडोळे घेऊन फिरण्याने पोटातली आग शमत नाही, त्यासाठी अर्धीकच्चीच का असेना भाकरी लागते. हा भाकरीचा संघर्ष कोणत्याही सांस्कृतिक कार्यापेक्षा निश्चितच मोठा आहे. हा देश जसा देवळांचा देश आहे तसाच निवडणुकांचा देखील देश आहे. निवडणूका आणि देवळांचा अतिशय कलात्मक आणि अफलातून मेळ आपण नेहमीच पाहत असतो. देवळांच्या सांस्कृतिक वातावरणाने भारावलेला इथला अनेक पदव्या घेतलेला तरुण आपल्या हाताला काम नाही याची चिंता किंवा वंचना करण्यापेक्षा जेव्हा जात, धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी जिंदाबाद-मुर्दाबादच्या घोषणा देऊ लागतो तेव्हा इथला तरुण आपल्या संस्कृती रक्षणासाठी जागृत झाला म्हणून ऊर भरून यावा की त्याची दिशाहीनता पाहून विषण्ण व्हावे, हा जाणकारांपुढे पडलेला यक्ष प्रश्न आहे. इथल्या तरुणांचे व्यवस्थापकांकडून हवे तेव्हा आणि हवे तसे वापरले जाणे हे आपल्या कोणत्या उच्च सांस्कृतिक कसोटीत बसते हे न उलगडणारे कोडे होय. ज्या तरुणांच्या सळसळतेपणावर भिस्त ठेऊन समाजाने प्रगतीकडे मार्गक्रमण करावे तो तरुण वाह्यातपणावर स्वार होऊन इतस्ततः भरकटत जात असल्याचे चित्र पुढे येत आहे. इथे कोणताच धर्म, पुजापद्धती खतरेमे नाही. खतरेमे आहे ती तरुणाई आणि मनुष्यता. व्हॅलेंटाईनच्या दिवशी संस्कृतीरक्षकाचा धर्म निभावणारा हा तरुण, राजकीय नेत्यांच्या जय पराजयात स्वतःला झोकून देणारा हा तरुण स्वतःप्रति मात्र उदासीन असतो. ही त्याची उदासीनता कोणत्या संस्कृतीचे द्योतक आहे आणि त्यावर उपाय काय? निसंदिग्धपणे त्याचे उत्तर तरुणांनी आपले जीवनध्येय ठरवून त्यानुसार स्वतः झोकून काम केले पाहिजे हेच असेल. कर्तव्यनिष्ठा हीच तरुणांची संस्कृती आणि कार्यमग्नता हाच त्यांचा धर्म झाला तरच त्यातून सुटका होईल अन्यथा आपला असाच वापर होणार हे तरुणांनी लक्षात ठेवावे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# नवोदय



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**संध्याकाळची वेळ होती. साधारणत: आठ वाजले होते. विराट च्या घरचे सगळे टी.व्ही.पाहत पाहत जेवण करत बसले होते. विराटच्या भावाला म्हणजे जय ला पुरणपोळ्या आवडतात म्हणून त्याच्या आईने आज आमरस व पोळ्या केल्या होत्या. विराट चे पप्पा नंतर जेवण करतो म्हणून सोप्यावर काहीतरी लिहीत बसले होते. हे सारे जेवण करत असताना पप्पांना फोन आला. तो फोन विराटच्या शाळेमधून विराटच्या माधव सरांचा होता. पप्पांनी तो फोन उचलला व म्हणाले, " हॅलो, हॅलो..!' " मी विराटच्या शाळेमधून माधव सर बोलतो." " हा नमस्कार सर, बोला, बोला सर" "अहो, सर, तुमचा मुलगा विराट हा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे."**

**(मागील अंकावरून)** रात्रीच्या नऊ साडेनऊच्या दरम्यान विराट चे पप्पा, मम्मी आणि जय घरी पोहोचले. घरात उदास, भयान वाटत होतं. विराट घरात नाही हे जाणवत होतं. त्याच्या आठवणी उचंबळून येत होत्या. तो इथे बसत होता. तो इथे झोपत होता. त्याचे कपडे हे होते. असं सारं काही आठवणीनं घर भरलं होतं. तेवढ्यात विराटच्या आत्याचा फोन विराट ची विचारपूस करण्यासाठी मुंबईवरून आला. फोन विराटच्या पप्पांनी उचलला. पण विराट चे पप्पा फोनवर बोलू शकले नाहीत. विराट चे नाव काढल्याबरोबर त्यांच्या डोळ्यात अश्रू आले होते. विराट ची मम्मी त्यांच्याबरोबर बोलली. विराटला महिन्यातले चार रविवार भेटण्यासाठी दिले होते. पहिला रविवार जवळ आला होता.विराट मात्र तिथे भेटायला येणाऱ्या पालकाच्या फोनवरून रोज पप्पाला फोन करत असे. त्याची खुशाली तो हसत हसत देत असे. त्यामुळे आम्ही रविवारी भेटायला येणार आहोत असे त्याला सांगितले होते. आम्ही चिकनची भाजी करून तुला आणू हा निरोप ही त्याला दिला होता. सकाळी सकाळीच लवकर उठून रविवारी चिकन आणले. चिकनची भाजी करून विराट ला भेटण्यासाठी सारे निघालो. विराट ला कधी बघू आणि कधी भेटू असे त्याच्या मम्मी,पप्पाला व जयला झाले होते. शेवटी नवोदय विद्यालयात पोहोचलो. जय ची भेट झाली. सगळ्यांना त्याला बघून आनंद झाला. नंतर विराटच्या हाऊस मध्ये गेलो. हाऊस मध्ये सगळी विचित्र अवस्था दिसून आली. कचरा अस्ताव्यस्त पडलेला, पंखा दुरुस्त केला नसलेला, कपडे कसेही वाळू घातलेले, कुत्रा तिथेच झोपलेला, संडासमध्ये पाणी न टाकलेले, बाथरूम कडे पाणी साठलेले, हे सारं पाहून वाईट वाटले. काही मुले तर त्या हाऊस मध्येच क्रिकेट खेळत होती हे बघून फार वाईट वाटले. कुठल्याच प्रकारची शिस्त त्या मुलांमध्ये दिसून येत नव्हती. म्हणून विराटच्या पप्पांनी हाऊस मास्टरला फोन केला. हाऊस मास्टर मात्र काही फोन उचलत नव्हते. दोन-तीन फोन केले होते तरीही त्यांनी फोन उचलला नाही. विराटच्या मेस मध्ये जेवण करण्यासाठी आम्ही सगळे तिकडे निघालो. त्या मेस मध्ये कुत्रे इकडे तिकडे फिरत होती. तसेच आम्ही टेबल खुर्चीवर जाऊन बसलो. त्यामुळे तिथल्या प्रशासनाची ही दुरावस्था दिसत होती. फार निष्काळजीपणा जाणवत होता. संडास बाथरूमची तशी अवस्था, मुले बाहेरच उघड्यावर आंघोळ करत असत. गरम पाणी आंघोळीला नाही, मेस मध्येही अशी दयनीय अवस्था. मन प्रचंड नाराज झाले. पण काय करावे सुचत नव्हते. हे सारे बघून विराटच्या मम्मी पप्पा ची झोप उडाली. हळूहळू तिथले मुले बोलू लागले. सांगू लागले. इथे असेच आहे. मोठी मुलं छोट्या मुलांनवर दादागिरी करतात. चोऱ्या करतात. शिक्षक कोणीही लक्ष देत नाहीत. आम्हाला कुणाला काही सांगायचे नाही असे शिक्षकांनी व हाऊस मास्टर ने सांगून ठेवले आहे. हे सारं जरी खरे असले तरी विराट ची मात्र तिथे राहण्याची इच्छा होती. त्याला विचारले तर तो सांगत होता. इथे चांगलं आहे. मी सगळं व्यवस्थित करीन. नवीन नवीन आपल्याला तसं वाटत असेल. असे म्हणून शहाण्या माणसासारखी तो मम्मी पप्पा ची मनधरणी करत होता. तिथे विद्यार्थ्याला पालक भेटायला आल्यावर तो कोणाच्या ना कोणाच्या तरी फोनवरून रोज संपर्कात राहत असे. काळजी करू नका असे आम्हाला तो बजावून सांगत असे. नवोदय विद्यालयातील वातावरण बघून विराटच्या पप्पांनी इतर पालकाबरोबर चर्चा केली. ते म्हणाले की,सर,पालक लोकांनी खूप तक्रारी केलेल्या आहेत ;पण त्या तक्रारीचा या लोकांवर काहीच फरक पडलेला दिसत नाही. उलट ते आपल्याला बोलू देत नाहीत. दमदाटी करण्याचा प्रयत्न करून आम्ही तुमच्या विरुद्ध तक्रार करूत अशी धमकी देतात. काही मुलांच्या पालकांच्या अनेक विविध अडचणी असतात म्हणून ते तसेच दिवस काढत राहतात. दिवसा मागून दिवस जात होते. विराटला तिथे जाऊन आठ दहा दिवस झाले होते. नवोदय विद्यालयात डोळ्यांची साथ सुरू झाली होती. विराटचा मंगळवारी फोन आला. डोळे आल्याचे त्याने पप्पाला सांगितले. लगेच पप्पा मम्मी त्याला भेटण्यासाठी निघाले. नवोदय विद्यालयात पोहोचले. विराटच्या डोळ्याची अवस्था दयनीय होती. डोळे लाल झाले होते. तसा प्रथमोपचार त्यांनी त्या विद्यालयात सिस्टर कडून केला होता. तेथील सिस्टर ला आम्ही भेटून आलो होतो. त्याला घरी घेऊन यायचे होते परंतु त्याची परीक्षा चालू होती. परीक्षा शनिवारी संपणार होती. त्याच्या हाऊस मास्टरला फोन केले परंतु ते फोन काही उचलत नव्हते. पंखा काही दुरुस्त केला नव्हता. त्याच्या हाऊसकडे परत जाताना रस्त्यात विराटच्या पप्पांना नवोदय विद्यालयाचे उपप्राचार्य कैद्य सर भेटले. त्यांना ही सारी हकीगत सांगितली. हाऊस मास्टर फोन उचलत नाहीत याबाबतही सांगितले. ते म्हणाले की, आम्ही काय सारे रिकामेच आहोत की काय? आम्हालाही काही पर्सनल लाईफ आहे की नाही? त्यांनी हाऊस मास्टरांना फोन लावला. व याबाबत सांगितले. हाऊस मास्टर थोड्यावेळाने गावातून हाऊस जवळ आले. विराट चे पप्पा त्यांना भेटले बोलले. परत घरी परत यायला निघाले. खरे तर तिथल्या या शिक्षकांच्या वागण्याचे, खोटं बोलण्याचे आणि बनवाबनवीचेही नवल वाटत होते. ऍडमिशन घेताना मात्र ते फार गोड गोड बोलायचे. त्यांनाही त्यावेळी विद्यार्थ्यांची गरज होती.एकदा ऍडमिशन झाले की, पालकांना कोलून देत असायचे. असा अनुभव अनेक पालकांना आलेला होता. शनिवारी परीक्षा संपल्यानंतर विराटचा फोन पप्पाला आला. पप्पा, मी चांगला आहे. तुझे डोळे कसे आहेत. बरे आहेत पप्पा पण डोळे फार दुखत आहेत. सगळ्यांचे पालक येऊन विद्यार्थ्यांना घेऊन जात आहेत.विराट चे पप्पा म्हणाले ठीक आहे. मीही चार पाच वाजेपर्यंत येतो तुला घेऊन गावाकडे घेऊन येतो. ठरल्याप्रमाणे विराट चे पप्पा,मम्मी जय सगळे विराटला आणण्यासाठी गेले. विराट ची भेट झाली. विराट केविलवाणी दिसत होता. तिथे राहण्याची त्याची ऊर्जा संपल्यासारखी वाटत होती. त्याला परत घेऊन येण्यासाठी त्याच्या हाऊस मास्टरला फोन केले. हाऊस मास्टर फोन उचलत नव्हते. त्यांच्या घराकडे गेलो. तिथे जाऊन फोन केले तरीही फोन उचलत नव्हते. नर्सकडे गेलो. नर्स ची परवानगी घेतली. पुन्हा कैद्य सर भेटले. त्यांना हे सांगितले. त्यांनी हाऊस मास्टरांना फोन केला. हाऊस मास्टर हाऊसकडे आले. त्यांना अर्ज देऊन विराटला घरी आणले. घरी आणल्यानंतर विराट नवोदय विद्यालयाविषयी, शिक्षणाविषयी, हाऊस विषयी, शिस्तविषयी, शिक्षकाविषयी व इतर अनेक गोष्टीविषयी तो सांगू लागला. बोलू लागला. त्याच्या सांगण्या आणि बोलण्यात तिथे राहण्याविषयीचा नकारात्मक सूर येऊ लागला. तो पप्पाला म्हणाला, " मी घरीही राहून चांगला अभ्यास करू शकतो. नवोदयमधील वातावरण काही एवढे चांगले वाटत नाही." शेवटी विराट चे पप्पा त्याला म्हणाले, तुझ्या मनावर तुझी काय इच्छा आहे ते तू सांग. शेवटी विराट आपल्या पप्पाला म्हणाला,पप्पा मला तिथे नको राहायचे. तिथले वातावरण एवढे काही चांगले नाही. मग पप्पांनी ठरवले की, त्याला नवोदय विद्यालयातून काढून पहिल्याच शाळेत टाकायचे. पहिल्या शाळेतील मुख्याध्यापकांना विराट चे पप्पा भेटले. त्यांनी तिथे त्याला परत घेतो म्हणून सांगितले. कारण विराट त्याच शाळेत नर्सरी पासून शिकत होता. विराट चे पप्पा सगळ्यांना घेऊन पुन्हा परत नवोदय विद्यालयात विराटचा टी.सी. काढण्यासाठी गेले. तिथे कार्यालयात भेटले. त्यांनी सांगितले की, प्राचार्यांना भेटून घ्या, विराट चे पप्पा प्राचार्यांकडे गेले.प्राचार्यांना शाळा सोडण्या बाबतचा अर्ज दिला. प्राचार्यांनी पुन्हा कैद्य सरांकडे पाठवून दिले. कैद्य सर समजावून सांगत होते. टी.सी. देता येत नाही. सगळे कागदपत्र पुण्याला पाठवले आहेत. तुम्ही तुमच्या मुलालाच समजून सांगा. आम्ही अगोदरच तुम्हाला सगळं सांगितलं आहे. वाटलं तर मी प्राचार्य मॅडमला भेटून सांगतो. चला आपण मॅडमला भेटून घेऊ म्हणून परत मॅडमकडे आणले. पुन्हा परत ते दोघेही समजून सांगू लागले. तुम्हाला टी.सी आता मिळणार नाही. आठ दहा दिवसांनी मिळेल. दुपारचे दोन वाजत आले होते. विराट चे पप्पा त्यांना मुलासाठी गयावया करत होते. पण ते ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हते. शेवटी प्राचार्यां ऑफिस मधून बाहेर आल्या. जेवणासाठी घरी जात असताना कार्यालयीन अधीक्षकासोबत बोलत होत्या.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सांडपाणी रस्त्यावर आल्याने आरोग्याचे वाजले तीन तेरा

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील ग्राम शेलू खडसे येथील अरुंद नालीमुळे सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने याचा त्रास मात्र ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे. तसेच अनेक वेळा घाणीचे पाणी रस्त्यावर आल्याने रस्त्याने येजा करणाऱ्या ग्रामस्थांना, शाळकरी मुलांना वयोवृद्ध मंडळीला याचा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायत प्रशासन मात्र याकडे कानाडोळा करत असून बघ्याची भूमिका घेत आहे. यातूनच नागरिकांच्या आरोग्याची समस्या निर्माण होत आहे. रस्त्यावरून वाहणारे हे दुर्गंधीयुक्त ग्राम पंचायत च्या गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाइनच्या माध्यमांतून पाणी पुरवठा करणाऱ्या वॉल क्रमांक 3 मध्ये मुरून जल वाहिनिद्वारे लोकांच्या पिण्यात येत आल्याने ही अत्यंत गंभीर बाब असल्याने यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोकादायक आहे. किसन नथुजी खडसे यांच्या घरापासून ते गजानन अभिमन्यू खडसे यांच्या घरापर्यंत रस्त्याची आणि सांडपाण्याची दुरवस्था झाली आहे हा रस्ता रहदारीचा असल्याने एजा करणाऱ्या नागरिकांना त्रास होत आहे त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिक संतप्त होऊन तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत.







रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे त्या गड्ड्यांमध्ये सांडपाणी साचत आहे . त्यामुळे आरोग्य समस्या उद्‌भवतात . रहदारीचा रस्ता असल्यामुळे येजा करणाऱ्या नागरिकांना याचा खूप त्रास होत आहे . त्यामुळे प्रशासनाने या कडे लक्ष द्यायला हवे . **विठ्ठल श्रीराम खडसे, नागरिक**

रस्त्याच्या दुरावस्थेमुळे सांडपाणी कॉक मधून



पाईपलाईन मध्ये जात आहे, आणि अशुद्ध पाणी पिण्याची वेळ आमच्यावर आली आहे . अनेक वेळा तक्रार करून ग्रामपंचायत प्रशासनाने यावर दुर्लक्ष केले आहे . **संजय खडसे, तंटामुक्ती अध्यक्ष, शेलू खडसे .**

# गरजूंना तीन चाकी सायकल, शिलाई मशीन वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिवसेना पूर्व विदर्भ संपर्क संघटक मा. किरणभाऊ पांडव यांचे विशेष सूचनेनुसार, चंद्रपूर संपर्क प्रमुख मा. दत्तात्रयजी पईतवार साहेब व गंगाधरजी बडूरे साहेब यांचे मार्गदर्शनानुसार शिवसेना चंद्रपुर जिल्हाप्रमुख श्री नितीन मत्ते व महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रतिमाताई ठाकूर, श्री भरत गृप्ता यांचे सहकार्याने होम हवन, शिलाई मशिन, व तिन चाकी सायकल वाटप, श्री कमलेश शुक्ला उपजिल्हाप्रमुख, श्री विनोद बुटले युवासेना जिल्हाप्रमुख, श्री अरविंद धिमान वैद्यकिय मदत कक्ष जिल्हाप्रमुख, श्री संतोष पारखी तालूका प्रमुख चंद्रपूर, श्री जमिल शेख अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख, मायाताई मेश्राम उपजिल्हाप्रमुख यांचे उपस्थितीत, मा . मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांचा वाढदिवस सकाळला माता महाकाली मंदिरात श्री भरत गुप्ता महानगर प्रमुख यांचे प्रयत्नाने होम - हवन व नंतर श्री नितीन मत्ते यांचे नेतृत्वात महिलांना शिलाई मशिनचे वाटप व दिव्यांग बांधव - भगिनिंना तिन चाकी सायकल वितरीत करण्यात आल्या.मुख्यमंत्री शिंदे साहेब यांना दिर्घायुष्य लाभो व त्यांच्या हातून सतत गोरगरिब, कष्टकरी जनतेची सेवा घडत राहो ही महांकाली चरणी प्रार्थना करण्यात आली . यावेळी शिवसेना चंद्रपुर तालूका प्रमुख श्री संतोष पारखी यांचे सहकार्याने रणजितसिंग नेपालसिंग बावरे उर्जानगर नेरी वार्ड नं 6 चंद्रपूर यांना व शिवसेना अल्पसंख्यांक सेलचे चंद्रपुर जिल्हाप्रमुख जमील शेख यांचे सहकार्याने यांना असद यासीब शेख रहमतनगर चंद्रपूर तसेच वरोरा विधानसभा क्षेत्रात श्री नितीन मत्ते यांचे सुचनेनुसार श्री आशिष ठेंगणे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, सौ . कल्पना ताई भूसारी उपजिल्हाप्रमुख महिला आघाडी, कमलकांत कळसकर तालूका प्रमुख भद्रावती व सिंगलदिप पेंदाम उपतालुका प्रमुख, कुसूमताई वैरागडे यांचे सहकार्याने तानेबाई किसन बारसागडे ढोरवासा, गुलाब आनंदराव सोनूले व श्रीकांत खंगार वरोरा तालूका प्रमुख व राजेश डांगे शहरप्रमुख वरोरा यांचे प्रयत्नाने शारदा अमोल कारलूके यांना तिन चाकी सायकल वितरीत करण्यात आल्या त्याचप्रमाणे प्रतिमा ठाकूर यांचे प्रयत्नाने शिलाई मशिन वाटप स्वाती वासेकर बिनबा वार्ड, विजया इपकायलावार महाकाली कॉलरी, मंगला बोरकर सुमित्रा नगर, पद्मा गेलोट बाबूपेठ वार्ड यांना वाटप करण्यात आल्या. यावेळी तरूण येनगंटीवार उपमहानगर प्रमुख, पंकज वडेट्टीवार तालूका प्रमुख पोभूर्णा, विनोद चांदेकर विधानसभा प्रमुख बल्लारपूर, बंडू पहानपटे उपतालुका प्रमुख, अविनाश उके उपतालुका प्रमुख, गुरुदास मेश्राम उपतालुका प्रमुख, मुकद्दरसिंग बावरे विभागप्रमुख, गौरव बेंडले विभाग प्रमुख, अमोल टोंगे विभागप्रमुख, राजू रायपूरे, मनिष रामटेके, श्रेयांश ठाकूर शहरप्रमुख बल्लारपूर, उबेदखान महानगरप्रमुख अल्पसंख्यांक सेल, साहील शेख, सपि मोहम्मद, राजिक इरफान, राकेश बहुरिया, जय मल्होद, रिषभ पेंदोर, राहूल बेनी, वाणी सदालावार शहर प्रमुख, कृष्णा सुरमवार तालूका प्रमुख, सुनिता गोवर्धन शहर संघटिका, मंदाताई कहीले उपशहरप्रमुख, श्रद्धा जोशी, पूजा विश्वास, रिता बन्सी व शिवसैनिक उपस्थित होते.



# शिवजयंती अध्यक्षपदी देशमुख तर उपाध्यक्षपदी गोरख पाटील यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज





**कन्नड :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवजयंती उत्सव समितीची बैठक छत्रपती शिवाजी महाराज उद्यान शिवाजीनगर कन्नड येथे संपन्न झाली.शिवजयंती संस्थापक अध्यक्ष सुनील पवार , सुरेश चव्हाण ,प्रवीण जंजाळ,विजय भोसले,सिद्धार्थ निकाळजे,अभिषेक देशमुख,सचिन काळे,रोहिदास पाटील,अमोल मैराळ,उद्धव पवार,स्वप्नील जहागीरदार ,राजेंद्र चव्हाण,संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीची कार्यकारणी समिती सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्ष - मनोज देशमुख, कार्याध्यक्ष- दीपक दाभाडे स्वागतध्यक्ष- डॉक्टर अशोक पवार, सचिव- सुधीर वाघ, उपाध्यक्ष : गोरख पाटील , प्रकाश जिरे माळी , अनिल शिरसाट सहसचिवः आकाश सुरे, दीपक घाडगे कोषाध्यक्ष-राजधर सोनवणे, सहकोष्याध्यक्ष - आकाश काळे, प्रशांत बारगळ, रेणुकादास कुलकर्णी मिरवणूक व्यवस्थापन समितीः अभिषेक देशमुख,नंदु शिरसे,उद्धव पवार, सचिन काळे, अमोल मैराळ ,भाऊसाहेब शिरसाट, संदीप पाटील, कैलास जाधव स्पर्धा व्यवस्थापन समिती- निलेश काथार, अरविंद पद्मे,बाळू अल्लाड ,प्रवीण जमदाडे, शिवराज पाटील, शेखर शिंदे , प्रदीप दाभाडे सांस्कृतिक कार्यक्रम समिती : दिलीप मगर, सचिन आहेर, विनोद साबळे,अनिल हाटोळे सोशल मीडिया समिती - संतोष पवार ,राजेंद्र पाटील ,राज ठाकूर

# बल्लारपूर पोलिसांची धडक कारवाई; ९ लाख ८० हजारांचा मुद्देमाल पकडला

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** ९ फेब्रुवारी रोजी पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की अवैध देशी दारू ची वाहतूक एका वाहनातून होत आहे. त्या आधारे त्यांनी आपल्या पथकासह सापळा रचून अवैध दारूचे वाहन क्र. एमएच ३३ टी ४६७३ कन्नमवार वार्ड न्यू कॉलोनी रोड येथे थांबवून तपासले असता त्यात दारू आढळून आली. पोलिसांची गाडी बघताच टाटा एस चा चालक गाडी सोडून पसार झाला. या धडाकेबाज कारवाईमुळे शहरातील अवैध व्यवसाय करणाऱ्यांत चांगलीच खळबळ उडाली आहे.

बल्हारपूर पोलिस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार आसिफराजा शेख यांनी पदभार स्वीकारताच धडक कारवाई करीत ८० पेटी अवैध दारु सह टाटा एस गाडी कुल ९ लाख ८० हजारांचा मुद्देमाल पकडले.

सदर कारवाई पोलिस निरीक्षक आसिफराजा शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण तडी, पोलीस उपनिरीक्षक हुसैन शाह, पोलीस उपनिरीक्षक गोविंद चाटे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गजानन डोईफोडे, पोलीस हवालदार रणविजय ठाकूर, विशिष्ठ रंगारी, श्रीनिवास वाभीटकर, बाबा नैताम यांनी केले.



# मीटरमध्ये फेरफार; वीजचोरावर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहागंज परिसरातील काचीवाड्यात राहणाऱ्या वीजग्राहकाने मीटरमध्ये फेरफार करून महावितरणचे ४६ हजार ७५० रुपयांचे नुकसान केले. याप्रकरणी सहायक अभियंता संभाजी अथरगण यांच्या फिर्यादीवरून वीजचोरावर छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणच्या शहागंज शाखेचे सहायक अभियंता संभाजी अथरगण व त्यांचे सहकारी प्रधान तंत्रज्ञ दत्तात्रय शिंदे, सचिन पांदे, इतर कर्मचारी काचीवाडा परिसरामध्ये मीटर तपासणी व पाहणी करण्यासाठी गेले होते, त्यावेळी चंद्रकांत बाबुराव इंगळे (घर क्र. १-२९-३१/पी, काचीवाडा) या ग्राहकाच्या वीज जोडणीची प्राथमिक पाहणी केली असता मीटरच्या पाठीमागील बाजूस छिद्र केल्याचे आढळून आले व मीटरमध्ये



फेरफार केल्याचे दिसून आले. सदर मीटर तपासणीकरिता प्रयोगशाळेत पाठवले असता फेरफार सिद्ध झाली.

चंद्रकांत बाबुराव इंगळे याने महावितरणची २६२१ युनिटची वीज चोरून वापरली. त्याची किंमत अधिभारासह ४६७५० रुपये आहे. वीजचोरीचे ४६७५० व तडजोडीचे २००० असे एकूण ४८७५० बिल दिले असता इंगळेने ते भरण्यास टाळाटाळ केली. सहायक अभियंता संभाजी अथरगण यांच्या फिर्यादीवरून वीजचोरावर छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



# गाडीखाली श्वान आलं, गृहमंत्र्यानं राजीनामा द्यावा ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचा बिहार होतोय अशा प्रकारची ओरड विरोधकांनी सुरू केली ती केवळ राजकारणातला विरोधाला विरोध म्हणुन. लोकसभा निवडणुका तोंडावर आल्या असताना त्यातही पुन्हा केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार विरोधकांनाही कळुन चुकल्यामुळे केवळ धांगडधिंगाणा घालायला त्यांनी सुरूवात केली. वैयक्तिक कारणातुन गोळीबारासारख्या घटना घडणे खऱ्या अर्थाने दुर्दैव म्हणावे लागेल पण याच घटनेचं राजकिय भांडवल करायचं आणि सत्ताधाऱ्यांची बदनामी करायची ती केवळ राजकिय विरोध म्हणुन.**

पण घडत असलेल्या अशा घटना चिंताजनक असताना अशा घटना घडुन सामाजिक संस्कृती बिघडू नये यासाठी खऱ्या अर्थाने विरोधकांनी भुमिका घ्यायला हवी. महाराष्ट्राचा बिहार झाला ही त्यांची ओरड खरं पाहाता आपल्या राज्याची बदनामी जणु काही सुपारी घेतल्यासारखी म्हणावी लागेल. संजय राऊत, नाना पटोले, जितेंद्र आवाड, विजय वडेट्टीवार यांचा तिळपापड केवळ लोकसभा निवडणुक हे आता कुणालाही कळु शकतं. गल्लीबोळात शाळकरी मुलांचे भांडण झाले तरी गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी ही मंडळी करू शकते. म्हणूनच उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस वैतागुन म्हणतात की, गाडीखाली श्वान आलं. लोकशाहीच्या माध्यमातुन राजकिय संस्कृती शाबुत ठेवण्यासाठी आणि सामान्य जनतेला न्याय मिळवुन देण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक हेच खऱ्या अर्थाने आदर्श लोकशाहीचे अलंकार म्हणुन ओळखल्या जातात. सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर विरोधकांचा अंकुश यासाठी आदर्श लोकशाही. पण जेव्हा विरोधक हे केवळ विरोधाला विरोध म्हणुन राजकारण करू लागतात अशा वेळी लोकशाही सदृढ करायला निघालेल्या विरोधकांची किव येते. गंमत बघा, केंद्र सरकारने भाजपा जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणींजीला भारतरत्न पुरस्कार जाहिर केला. खरं तर विरोधकांनी स्वागत करायला हवं पण पुरोगामी विचाराच्या नावाने चालणाऱ्या अनेक विचारवंतांसह विरोधकांनी देखील चेष्टा करत केंद्र सरकारवर टिका केली. यात विचारवंत पत्रकार देखील मागे राहिले नाहीत. स्वतःला पत्र पंडित समजुन घेणारे निखील वागळेंनी सांगितले की, आडवाणींना भारतरत्न पुरस्कार म्हणजे एका दंगलखोराने दुसऱ्या दंगलखोराला दिलेली शाबासकी. काल पुन्हा माजी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव, चरणसिंग चौधरी यांच्यासारख्याला भारतरत्न जाहिर झाले. त्यावेळी वागळेसारख्यांची दातखिळी बसली. सांगणे हे आहे की, लोकशाही धोक्यात आली, संविधान संपष्टात येवु लागलं. असा गळा काढणारेच लोकशाही संपविण्यासाठी सुपारी घेवुन काम करू लागले की काय? असं लक्षात येतं. नरसिंहरावांना काँग्रेसनं कधी पुरस्कार दिला नाही पण भाजपाच्या केंद्र सरकारने पुरस्कार देणं याचाच अर्थ सबका साथ, सबका विकास ही आमची निती. प्रामुख्याने विषय मांडणी होत आहे ती विरोधकांच्या भुमिकेची. आगामी काळात लोकसभा निवडणुका तोंडावर आहेत. 2014 आणि 2019 लोकसभा निवडणुकीत नरेंद्रजी मोदी सत्तेवर आले. दहा वर्षाची यशस्वी कारकीर्द पहाता 2024 च्या अर्थात उद्याच्या लोकसभा निवडणुकीत देखील तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणुन नरेंद्र मोदीच शपथ घेतील. ही गोष्ट आता जगाच्या पाठीवर लपुन राहिलेली नाही. विरोधकांना देखील भविष्य उमजलेले आहे. निवडणुक केवळ औपचारिकता राहिली. म्हणुनच विरोधक एकत्र आले पण माळ गळ्यात घालण्याच्या अगोदर आपोआप मणी तुटुन पडतात. कारण कुजलेल्या दोऱ्यात मणी टाकतात तसं घमेंडी आघाडी अर्थात इंडी विरोधकांचे हाल होवुन बसले. उदा.ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल, बिहारात नितीशकुमार ही






मंडळी बाजुला गेली. बाहेरच्या राज्याचे जावु द्या. महाराष्ट्रात इंडी आघाडीचा प्रयोग हाती घेवुन दोन महिने झाले तोच आघाडी फुटली. त्यात राष्ट्रवादी पक्ष, शिवसेना यांच्यात गट पडले. मोठ्या साहेबांच्या हातुन, उबाठा नेत्याच्या हातुन मुळ पक्ष बाजुला गेला. काँग्रेस आणि आंबेडकरांमध्ये एकमत नाही. जागा वाटपात मतभेद आहेत. हे सारं चित्र पाहिल्यानंतर महाराष्ट्रात देखील विरोधकांच्या चिंधड्या उडाल्या असुन दोन-तीन जागा देखील लोकसभेच्या निवडुन येतील अशी परिस्थिती नाही. त्यामुळे विरोधक म्हणुन काम पाहणारे विरोधक खरंच बिथरल्यासारखे करायला लागलेले दिसतात. हे सारं लिहिण्यामागचं कारण म्हणजे मागच्या दोन-चार दिवसापासुन राज्यात गोळीबाराच्या घटना घडल्या. ठाण्यात सत्ताधारी आमदार गणपत गायकवाडांनी वैयक्तिक कारणातुन महेश गायकवाड यांच्यावर गोळ्या झाडल्या. पुण्यात दोन गुंडामधला वैमनस्यातुन शरद मोहोळची हत्या. काल मुंबईत अभिषेक घोळसाळकर आणि मॉरीश फेसबुक लाईव्ह बोलत असताना अभिषेकवर त्याचेच मित्र मॉरीशने धाडधाड गोळ्या घातल्या आणि स्वतःलाही गोळ्या घालुन आत्महत्या केली. गंमत बघा, साऱ्या घडलेल्या घटनेचं पोलीस यंत्रणेनं चोख कर्तव्य बजावताना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गंभीर गुन्ह्याची दखल घेत कायद्यान्वये कठोर कारवाई केली. शरद मोहोळ हत्या प्रकरणात तात्काळ आरोपी गजाआड केले, आ.गणपत गायकवाड सत्ताधारी आहेत म्हणुन त्यांना पाठीशी घातलं नाही तर त्यांच्यावर कठोर कारवाई करत इतर आरोपी अटक केले आणि अभिषेक घोळसाळकर प्रकरणात देखील पोलीस सक्षमपणे तपास करतात. ना सत्ताधाऱ्याचा हस्तक्षेप, ना गृहमंत्र्यांचा हस्तक्षेप. खरं तर या साऱ्या घटना वैयक्तिक वैमनस्य आणि प्रॉपर्टीच्या वैयक्तिक वादातुन घडल्या हे महाराष्ट्रातील जनता याचि देहि, याचि डोळा पहात आहे. तपासात अनेक कांगोरे पुढे देखील येतील. वास्तविक पहाता अशा घटना घडणं दुर्दैव असुन सत्ताधारी असो की विरोधकांनी एकत्रित येवुन चिंतन करण्यासारखी परिस्थिती आहे. ज्यातुन अशा घटना घडणार नाहीत ही पाहण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांसोबतच विरोधकांची आहे. पण विरोधक केवळ प्रत्येक घटनेचं राजकारण करू पहाताना सरकारची बदनामी एवढाच उद्योग त्यांनी सुरू ठेवला. खरं तर सामान्य जनतेचं सत्ताधारी आणि विरोधकांच्याही भुमिकेवर लक्ष्य असतं. संजय राऊत, नाना पटोले, जितेंद्र आवाड, विजय वडेट्टीवार यांनी तर बदनामीचा कहर केला. गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी करू लागले. खरं तर देवेंद्रजी फडणवीसांनी वैतागुन गाडी चालवताना कुत्रं जर मेलं तरी या राज्यात गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होवु शकते उपरोधक टोला दिला? म्हणजे अशा घटनेचं या मंडळींना कुठलंही सोयरसुतक नसावं. खरं तर विरोधकांनी सामाजिक प्रश्नावर सत्ताधाऱ्यांना सहकार्य करायला हवं. पण केवळ वैयक्तिक घटनेतुन घडत असलेल्या घटनेला राजकिय भांडवल बनवत लोकसभेच्या भाकरी तापलेल्या तव्यावर टाकणं म्हणजेच टाळुवरचं लोणी चाटण्यासाठी सुरू असलेली धडपड असंच म्हणावे लागेल. सांगायचं तात्पर्य हेच आहे की, उद्या एखाद्या गल्लीत शाळकरी मुलांचे भांडण झाले तरी देखील ही मंडळी गृहमंत्र्यांचा राजीनामा मागु शकते? एकीकडे लोकशाही धोक्यात आल्याची भाषा करणारे विरोधक खरंच लोकशाहीचं राज्य सदृढ बनवण्यासाठी मदत करण्यापेक्षा आदर्श लोकशाहीची प्रकृती बिघडवण्याचं काम करू लागले की काय? यातुन निष्पन्न होतं.

# श्रम विकासाचा पाया



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**प्रत्येक व्यक्तीने दररोज काही ना काही श्रम करावेत. श्रम हाच आपला दाता, तीच आपली माता आहे.आणि करता, करविता तोच आहे, त्यासाठी श्रम करणे महत्त्वाचे आहे. जिथे काम केले जाते तेथे प्रत्यक्ष भगवान येत असतो. जिथे राबती हात तेथे हरी प्रत्येक यशस्वी व्यक्ती, राष्ट्र किंवा समाज कधी पुढे जातो तर तो केलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमातून पुढे जातो. म्हणून श्रम हा विकासाचा पाया आहे. गुरुकुल शिक्षण पद्धतीत श्रमाला फार महत्त्व होते श्रम करूनच विद्यार्थी शिकत होते. त्यामध्ये त्यांना कसलाही कमीपणा वाटत नव्हता. श्रम करण्याची कधीही कोणाला लाज वाटू नये. बदलत्या काळात भौतिक साधनांची उपलब्ध झाली. लोकांना काम कमी लागू लागले.**

त्यामुळे आळस वाढले, आजच्या मुलांना थोडे जरी काम सांगितले तर बऱ्याच जणांना दम लागतो, कंटाळा येतो, त्यातून अनेक जणांना आजार जडले, समाजात दोन वर्ग निर्माण झाले, एक कामगारांचा आणि दुसरा भांडवलदारांचा त्यामुळे भेदाभेद निर्माण झाला, कर्मवीर भाऊराव पाटलांनी त्यांच्या संस्थेत कमवा आणि शिका पद्धतीने श्रम करायला सांगितले. नेहमी श्रम करा. श्रम प्रतिष्ठेवरच समाजाचा विकास अवलंबून असतो.समाजामध्ये एकात्मता वाढायचे असेल तर एकत्रित येऊन श्रम करावेत. वेगवेगळ्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून विद्यार्थ्यांना श्रम करण्यास शिकवतात. त्यामुळे श्रमाचे महत्त्व कळते. महात्मा गांधींनी चरख्यावर सूत कताई करत होते. कारण त्यातून त्यांचे श्रम समाजाला कळाले. बाबा आमटेनी कुष्ठरोग्यांची सेवा करून आपले श्रम दाखवून दिले. तसेच मदर तेरेसा यांनी आयुष्यभर समाजाची सेवा केली.म्हणून श्रमाचे महत्त्व कमी होता कामा नये. श्रमप्रतिष्ठा हे एक नैतिक मूल्य आहे. ते आपल्यावर श्रमावर अवलंबून आहे. म्हणून श्रमदान करत चला, श्रम करणाऱ्या माणसाला कुठेही मानसन्मान असतो. लोकशिक्षक गाडगे महाराज अगोदर श्रम करायचे आणि नंतर ते गावातील लोकांनी दिलेलं अन्न आपल्या गाडग्यात घेऊन खात असत,काम न करता त्यांनी कधीच काही खाल्लं नाही, स्वतःच्या मुलीला सुद्धा त्यांनी त्यांच्या आश्रमात काम केल्याशिवाय भोजन करू नये असे सांगितले. म्हणून श्रम फार महत्त्वाचे आहेत, श्रम न करता दे रे हरी पलंगावरी असे म्हटले तर काही मिळत नाही, दैववादी होण्यापेक्षा कार्य करून श्रम करून कर्तुत्वान बना, *कोशिश करीत रहा कोशिशी मधून तुम्हाला सर्व काही साध्य होते, म्हणून कोशिश करने वालों की हार नही होती असे म्हटले जाते .सारखे श्रम करा; मोठे व्हा, तुम्हाला कधीही, कुठेही ,सन्मानच मिळेल, परंतु आळशी माणसाला काही मिळणार नाही, सारखे चालत राहा, संकल्प करा, अभ्यास करा, तरुणांने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून मोठे अधिकारी व्हावेत, एक ,दोन वेळेस अपयश आले तरी तिसऱ्या वेळेस आपण विजयी होणार म्हणजे होणारच, असे मनाशी खूणगाठ बांधावी आणि आतापर्यंत झालेले थोर व्यक्ती त्यांच्या श्रमामधूनच मोठे झाले आहेत,जर श्रम करत नसाल तर पाठीमागे राहाल ,अनेक खेळाडूंनी शतके बनवले कारण त्यांची त्यात श्रम आहेत



,अनेक साहित्यिकांनी ग्रंथ,लेख पुस्तके लिहिले त्यांना पुरस्कार मिळाले ते श्रम केल्यामुळेच; कोणालाही काहीच न करता आज पर्यंत कधीच मोठे होता आले नाही, म्हणून प्रयत्नाने वाळूचे कण रगडीता तेलही गळे असे आपण ऐकतो. म्हणून तुम्ही श्रम करा.शेतकरी राब राब राबतो, दिवस रात्र कष्ट करतो, म्हणून आज आपण गुण्यागोविंदांने एकत्रित वागत आहोत, मला तरुणांना ,युवकांना एवढंच सांगायचं आहे की? त्यांनी आपल्या जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर उठा जागे व्हा आणि यशस्वी व्हा, जो माणूस थोडा थोडा चालत जातो तो अंतर कापतो, जो माणूस जागचा हालत नाही, त्याला कुठेही जाता येत नाही,व यश ही मिळत नाही,समाजातील काही माणसांनी मोठमोठे पर्वत पार केले, तरीही ते थकले नाहीत काही व्यक्तींनी आपले जीवनच सेवेसाठी आहे म्हणून समाजाला सेवा दिल्या. सेवा करा आपोआपच मेवा मिळतो असे म्हणतात.काही वार्ताहार अगोदर छोट्या छोट्या बातम्या तयार केले. नंतर ते पत्रकार झाले. नंतर उपसंपादक आणि नंतर श्रमाच्या जोरावर जिद्दीवर संपादक होऊन स्वतंत्र वर्तमानपत्र काढून समाजाची सेवा केली. अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय दिला. त्यांच्या मनातली अभिव्यक्ती बाहेर आली आणि ते सुखी झाले; असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, खरंच सर्वसामान्य माणसे मोठी का होतात? कारण ते कष्टाने पुढे गेलेले असतात. आणि दुसऱ्यांसाठी ते प्रेरणादायी व्यक्ती म्हणून पुढे येतात. डॉ. ए,पी,जे अब्दुल कलाम हे साध्या व गरीब घरातून मोठे झाले, आणि आज भारतरत्न म्हणून त्यांचा गौरव केला जातो, अशा व्यक्तींचे पुन्हा पुन्हा नाव का घ्यावे वाटतात ,तर ते तेवढे मोठे श्रम केल्यामुळे झालेत हे विसरून चालणार नाही, छत्रपती शिवाजी महाराज यांनी अनेक लढाया केल्या ,शत्रूला पराभूत केले या हिंदवी स्वराज्यासाठी आपले आयुष्य झिजविले, ते सर्व श्रमामधूनच साध्य झाले, म्हणून श्रम हा विकासाचा पाया आहे जर तुम्ही काहीच केले नाही तर तुम्हाला दारिद्र्य येईल, नंदनवनाचे नरक होईल. अपयश आल्यानंतर तुम्ही दैवावर नशिबावर अवलंबून राहाल
.तर तुम्हाला काहीच मिळणार नाही, म्हणून तुम्ही थोर व्यक्तीची चरित्रे वाचा, तुमच्या कामातून तुमचं नाव पुढे येते असे कार्य करा, कारण कार्य करणारा माणूस आज पर्यंत पाठीमागे राहिला नाही, जो दैवावरील विसंबला। त्याचा कार्यभाग संपला।। हे खरोखर आहे,जनसामान्य लोक राबराब राबवून कष्ट करून ते पुढे जातात. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुलेंनी आपले आयुष्य सर्व समाजातील मुलांना शिकवण्यासाठी घालविले. त्यांचे त्या पाठीमागे श्रम आहेत. मला काय त्याचे ?असे म्हणून बसले असते तर ? काहीही झाले नसते म्हणून मला प्रत्येकाला सांगावे वाटते आपले विचार प्रगल्भ व मोठे असावेत. आपल्या विचारांवर इतरांनी विचार करावा असे ते असावेत. खोटे बोलू नका .त्यातून थोडा तुम्हाला लाभ होईल; परंतु नंतर कायमची हानी होते. म्हणून श्रम करा. विद्यार्थ्यांनी अभ्यास केल्यानंतर ते उत्तीर्ण होणार. गैरमार्गाचा अवलंब केला. जरी उत्तीर्ण झाले तरी ते आत्मविश्वासाने जीवन जगू शकत नाहीत .कारण ते बावरलेले, भेदरलेले दिसतात .म्हणून विद्यार्थ्यांनी ज्ञानाकडे गंभीरपणे बघून सचोटीने ज्ञान प्राप्त करावे. ज्ञानाचा दर्जा त्यामुळे उंचावेल, त्यासाठी श्रम करा. दादाभाई नौरोजी नेहमी म्हणायचे अखंड चळवळ करा, चळवळ करा यश आपल्या जवळ आहे .आपल्याला स्वातंत्र्य मिळेल म्हणून कार्य करा,बऱ्याच ठिकाणी आश्रमामध्ये भाविक, भक्त गेल्यानंतर थोडं श्रम करण्यासाठी सांगतात ,आणि नंतरच मग त्यांना पुढील गोष्टी विचारतात, म्हणून कुठेही श्रमाला महत्त्व आहे. त्यासाठी लहानपणा पासूनच तुम्ही ज्या ठिकाणी जाता त्या ठिकाणी कार्य करीत रहा. त्यामुळे तुमचा विकास तुमच्या चरणाजवळ आहे. असे मला सांगावे वाटते, सैनिकांनी अहोरात्र उभे राहून सीमेवर आपली सेवा करतात, तसेच शिक्षक दिवस-रात्र विद्यार्थ्यांना घडवतात. समाजामधील समाजसुधारक, क्रांतिकारक,लेखक ,वकील,डॉक्टर समाजामध्ये एकात्मता नांदावी म्हणून वेगवेगळे श्रम करून करून लोकांना एकत्रित आणून पुढे नेण्याचा प्रयत्न करतात. समाज जीवंत ठेवतात. म्हणून आजच्या तरुणांनी मोबाईल मध्ये आपला अमूल्य वेळ न घालवू नये. चुकीच्या लोकांच्या सोबत न फिरता छोटा-मोठा व्यवसाय करावा, मनाशी लाजू नयेत, कर्म करीत रहा फळ तुम्हाला आपोआप मिळेल. आणि जीवनाचं सार्थक करावं ही अपेक्षा.त्यासाठी श्रम हा विकासाचा पाया आहे हे त्रिकाल सत्य आहे.

# धन कुबेराच्या धवल यशाचे रहस्य सूत्र



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**वाचनाचा व्यासंग असेल तर कोणतेही प्रश्न सोडविता येतात, संकटावर मात करता येते. अस्सल निखळ ज्ञान मिळवा नवे प्रयोग करा आणि ज्ञानाच्या आधारे जगावर राज्य करा हेच एलॉन मास्क याच्या जीवनाचे रहस्य होय, यशसूत्र होय. एलॉन मस्क हे नव्या जगाचे कुबेर आहेत. तसेच ते भांडवलशाहीचा संस्थापक ॲडम स्मीथ आणि साम्यवादाचा संस्थापक कार्ल मार्क्स यांना मागे टाकणारे मध्यममार्गी नवे विचारवंत आहेत. गांधी प्रमाणे ते विश्वस्त संस्थेच्या अर्थकारणाचा पुरस्कार करतात. त्यामुळे ते विचारांचे ध्रुवीकरण करणारे तेजस्वी विचारवंत आहेत. त्यांच्या विचाराचा प्रकाश नव्या जगाच्या अर्थ कारणावर पडत आहे. मावळलेल्या 2023 वर्षातील जगातील एक धनाडय माणुस म्हणून ते ओळखले जात असले तरी त्यांनी आपल्या लाभाचा उपयोग मानवी कल्याणासाठी करण्याचे ठरविले आहे.**

त्यांच्यावर जशी स्तुती सुमने वाहिली जातात, तशी भेदक टिकाही केली जाते. अविवेकी अवैज्ञानिक आणि दिशाभूल करणारी विधाने केल्याबददल त्यांच्यावर अनेकांनी कोरडे ओढले आहेत. ट्वीटर वरील त्यांनी संपादन केलेली मालकीसुध्दा वादग्रस्त व वादवी ठरली होती. त्यांनी नफ्यासाठी आपल्या कंपन्यातून मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना



काढून टाकले. या बद्दलही ते टिकेचे लक्ष्य बनले होते. टिकाकारावर सदोष टोकदार आणि द्वेषाने भरलेली भाषणे करण्यात ते पटाईत आहेत.
हे प्रकरण निकाली काढण्यासाठी मस्क यांनी टेस्लोचे अध्यक्षपद शोभले आणि 20 दसलक्ष दंड भरला. याचा अर्थ असा की, त्याने अमेरीकन कायद्याचा आदर केला.अमेरीकेतील जेष्ठ व्यवस्थापन गुरु पीटर ड्रकर यांनी म्हटल्याप्रमाणे जो कायद्याचे पालन करतो आणि नितीमत्ता पाळतो तोच खऱ्या अर्थान प्रगतीच्या शिखरावर पाहोचतो. चिकाटी, संघर्ष आणि एकाहून एक कठीण आव्हाने स्विकारुन नवनवीन शिखरे गाठणारा लोकोत्तर उद्योगपती असे त्याचे वर्णन करावे लागेल.

**आरंभीचा संघर्षकाळ :** एलॉन रीव्ह मस्क यांचा जन्म 28 जून 1971 रोजी दक्षीण आफ्रिकेतील प्रशासकीय राजधानी असलेल्या प्रिटोरिया नगरीत झाला. त्यांच्या व्यक्तीमत्त्वात ब्रिटीश आणि डच यांचे रक्त सळसळते त्यांची आई मायेमस्क कॅनडातील सॉस्को चेवान या गावी जन्मल्या होत्या. आणि दक्षिण आफ्रिकेत वाढलेल्या प्रसिध्द मॉडेल आघाडीवरच्या आहार तज्ज्ञ आहेत. त्यांचे वडील एरॉल मस्क दक्षीण आफिकेचे इलेक्ट्रो केमीकल अभियंता व पायलट, खाजगी सल्लागार आणि मालमत्ता व्यवहार करणारे मोठे व्यवसायिक होते. त्यांच्याकडे टांझानिका तलावाजवळील झांडियन पन्नाखाणीची अंशतः मालकी आहे तसेच तेथे भाड्याने द्यावयाची निवासस्थाने आहेत. टिंबवती खाजगी निसर्ग स्थळावर सुद्धा त्यांनी मालकी ठेवली आहे. त्यांचे वडील वर्णभेद विरोधी प्रगतीशील पक्षाचे नगरसेवक म्हणून टिटोरिया महानगरपालिकेवर निवडुन आले होते. त्यांच्या मुलांनी वडिलांच्या वर्णभेदाची नापसंती दर्शविली आहे. त्यांचे आजोबा जेगुवा हॅल्डेमन हे अमेरीकन वंशाचे कॅनेडीयन होते. ते आपल्या कुटुंबाला एकच इंजीन असलेल्या डेलाका विमानात आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाच्या प्रवासाला येऊन गेले होते. हा एक विक्रम होता.

**एलॉनचे ग्रंथप्रेम :** अस्थिरतेच्या काळात त्याची पुस्तकाशी मैत्री जडली व तो थेट ग्रंथप्रेमी उत्साही वाचक बनला. त्याच्या यशाचे श्रेय काही लेखक व ग्रंथाकडे जाते. त्याला वाचनाचे वेड लागले. बेंझामीन फ्रॅंकलिन यांचे AN AMRICAN LIFE, LORD OF THE FIVES , THE FOUNDATION SERIES आणि द फिच हायकर्स गाईड टु द गॅलक्सी या पुस्तकांनी त्याला वेड लावले आणि त्यातून त्याचे व्यक्तीमत्त्व फुलत गेले. त्यांना या काळात व्हिडीओ गेम खेळण्याची आवड निर्माण झाली त्याने स्वतःला VIC 20 चा वापर करून मान्यवर मधून कसे प्रोग्राम करावे हे शिकुन घेतले. त्यामुळे तो संगणक क्षेत्राकडे वळला. वयाच्या 12 व्या वर्षी मस्कने त्याच्या बेसीक कल्पनावर आधारीत गेम ब्लास्टर पीसी ऑफिस टेक्नॉलॉजी अंदाजे 500 डॉलर्समध्ये विकला होता. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. तसा हा उद्योगपती वयाच्या 12 व्या वर्षी व्यापार करावा लागला.

**शिक्षणाचा श्रीगणेशा :** एलॉन मस्क याने दक्षीण आफ्रिकेतील प्रिटोरीया बॉईज स्कुलमधून पहिली पदवी संपादन केली. पण त्याआधी त्याने वापर क्स्लुक हौस प्रिटोटरी स्कुल मध्ये प्रवेश घेतला पुढे गायन स्कंद हायस्कुल गाठले आणि प्रिटोरिया बॉईज हास्कुलमध्ये शिक्षण घेतले तेथून ते पदवीधर झाले. त्याने प्रिटोरिया विद्यापीठात 5 महिने शिक्षण घेतले मस्क 1989 मध्ये कॅनडास पाऊल टाकले आणि सस्क्याचंद मध्ये दुसऱ्या चुलत भावासोबत ते एक वर्ष राहिले. शेतात आणि लाकडाच्या गिरणीमध्ये त्याने कष्टाच्या नौकऱ्या केल्या त्यातून त्याला घामाचे मोल कळले. 1990 मध्ये त्याने अंर्तयोग् या कॅनडातील क्वीन्स विद्यापीठात प्रवेश घेतला दोन वर्षानंतर पुढे त्याने अमेरीकेच्या पेन्सेल्विनीया विद्यापीठात प्रवेश घेतला. तेथे त्याने व्हर्सन्स स्कुल मधून भौतिक शास्त्रातून कला शाखेची पदवी, आणि अर्थशास्त्रातील बॅचलर ऑफ सायन्स ही पदवी पुर्ण केली. मस्क ने 1995 साली पदवी प्राप्त केली. 1997 मध्ये त्यांनी युपेन सोडले. या काळात त्यांनी गुगल बुक्स प्रमाणे इलेक्ट्रॉनिक पुस्तक सेवेची नवी योजना तयार केली. त्यांची संशोधक वृत्ती पदार्थ विज्ञान व अर्थशास्त्र यांच्या सुरेख संगनमतातून झाली 1994 मध्ये त्यांनी सिलीकॉन व्हॅली या अमेरीकेतील संगणक बाजारपेठेत दोन महत्त्वाच्या इंटरर्नशीप केल्या व संपुर्ण अनुभव घेतला पहिला अनुभव स्टोरेज स्टार्टअप ईनॅकल इन्स्टिटयुट या उर्जा कंपनीमध्ये घेतला त्यामध्ये त्यांच्या संग्रहासाठी इलेक्टॉइटिक एस्ट्रो कॅपॅसिटरची निर्मिती व तपासणी केली दूसरा अनुभव त्यांनी पाली अल्टो आधारीत स्टार्ट अप रॉकेट सायन्स गेल या कंपनीत घेतला 1995 मध्ये कॅनफोर्ड विद्यापीठात भौतिकशास्त्र या विषयात पीएच. डी कार्यक्रमासाठी त्यांना पात्र धरुन स्वीकारण्यात आले. इंटरनेट गुममध्ये मास्कने झोकून दिले. हा निर्णय विचारल्यानंतर दोन देशांनी त्यांनी आपला पवित्रा बदलला आणि ते नेटस्केपमध्ये नौकरीसाठी अर्ज भरला. पण तेथे प्रतिसाद मिळाला नाही पण त्याने उमेद सोडली नाही नव्या व्यवसाय क्षेत्रात उडी घेतली.

**समारोप :** एलॉन मस्क या धनकुबेराच्या यशचे रहस्य कशात असेल तर प्रतिकुल परिस्थितीशी झुंज देण्यात आहे. या महामानवाने जीवनात पदार्पन करतांना योग्य ज्ञान शाखेची निवड केली. मानवी गरजा अनंत आहेत पण साधने मात्र दुर्मिळ आहेत. गरजा आणि साधने यामध्ये मेळ घालण्याचे अर्थ शास्त्र हे एक महत्त्वाचे शास्त्र आहे असे मार्शलने म्हटले आहे. तर ऑगस्ट कॉम्टे यांनी पदार्थ विज्ञानाचा अभ्यास मानवी जीवनातील एक्ष प्रश्न सोडवून राहणीमानाची उंची वाढवितो असे म्हटले होते. नव्या जगामध्ये अर्थ शास्त्र व पदार्थ विज्ञान या दोन विषयांचे महत्त्व ओळखून त्यांनी अंरविद्याशाखिय संशोधनाचे महत्त्व जाणीले. नव्या जगात एका नव्हे तर दोन घोड्यावर बसून वाटचाल करावी लागेल असे सूत्र एलॉन मास्कनी मांडले. व कृतिमध्ये आणले व ते कृतिमध्ये आणले. वाचनाचे वेड लागल्यामळे एलॉन माक्सला नव्या जगात ज्ञानसत्तेचे महत्त्व लक्षात आले. वाचनाचा व्यासंग असेल तर कोणतेही प्रश्न सोडविता येतात, संकटावर मात करता येते. अस्सल निखळ ज्ञान मिळवा नवे प्रयोग करा आणि ज्ञानाच्या आधारे जगावर राज्य करा हेच एलॉन मास्क याच्या जीवनाचे रहस्य होय, यशसूत्र होय.

# १९७० ते १९८५ सालाची पिढी



सचिन कोरडे
9021920903

आधुनिक केसरी

**१९७० ते १९८५ सलाची ही पीढ़ी आता 35 ओलाडून 50 कडे चाललीय, 'हया' आपल्या पिढीचं सगळ्यात मोठं यश म्हणजे या पिढीने खूप मोठा बदल पहिला आणि पचवला सुद्धा व स्वतः वर त्या बदलाचा अतिरेक होऊन दिला नाही.या पिढीत संस्कार,नाती जपणे,मोठ्यांचा आदर करणे सर्व बाबी आढळून येत होत्या, यांच्यात गरिबीची लाज अन् श्रीमंतीचा माज कधीही नव्हता.या पिढीची एक मोठी अडचण म्हणजे हि पिढी कायम उंबरठ्यावरचीच पिढी आहे.**

एक पैश्या पासुन ते ५० पैश्यापर्यंत नाणे बघीतलेल्या या पिढीने पाहुण्याकडूनही न लाजता पैसे घेत होती. शाई-बोरु/पेन्सिल/पेन पासून सुरवात करून, ही पीढी आता, स्मार्ट फोन, लॅपटॉप, पीसी, उतारवयात सुद्धा अगदीं सराईतपणे हाताळत आहे.
जी पिढी हातात पेन घेऊन मामाला पत्र लिहायची, शेजारच्याला आलेले पत्र अडखळत अडखळत का होईना पणं वाचून सांगायची याच पिढीने तारुण्याचा उंबरठ्यावर असताना प्रेम पत्र देवान-घेवान जग अनुभवलेले आहे. त्यातूनच कुठे काव्य तर कुठे कविता उदयास येत गेल्या. टेलिफोन, कॉइन बॉक्स, एसटीडी बूथ,वायरलेस भ्रमणध्वनी,बटनाचे साधे मोबाईल ते आजचे अत्याधुनिक स्मार्टफोन हीच शेवटची पिढी अनुभवत आहे. वडील धोतर, गांधी टोपी, फेटा,पायजमा घालणारे तर आई कपाळ भरून कुंकू, चोळी-पातळ, मनगट भरून बांगड्या, काष्टा, कंबर पट्टा, डोक्यावर पदर असे आई वडील पाहणारे ही शेवट ची पिढी असणार आहे. ज्या पिढीच्या बालपणी सायकल सुद्धा एक चैन, असलेली, पण आता ह्या उतारवयात सराईतपणे स्कूटर, कार चालवणारी ही पिढी, अवखळ तर कधी गंभीर पणं खूप भोगलेली आणि खूप सोसलेली, पण पूर्ण संस्कारित शेतामधील हुरडा बोरे मक्याचे कणसे शाळेत शिक्षकांना घेउन जाणारी आजही शाळेत शिकवणारे आज वयोवृद्ध असणारे शिक्षक दिसले की,आदराने आपल्या गुरुवर्या समोर लिन होणारी हिच ती पिढी, शाळेत सर्व डब्बे एकत्र मिसळून जेवणाच्या सुट्टीतील अंगत पंगत जात भेद सोडून एकोप्याच दर्शन देउन गेली. टेप रेकॉर्डर, रेडिओ, मनगटावर घड्याळ, पायात बूट पिढीसाठी खूप मोठी मिळकत होती. मार्कशीट व टिव्ही च्या कालखंडात सुद्धा स्वतःच्या बालपणाचा बळी जाऊ न देणारी अशी ही शेवटची पिढी असणार आहे. हि पिढी दूरदर्शन वरील मालिका, मराठी चित्रपट, ठळक बातम्या हे सर्व टीव्ही वरील मनोरंजन कार्यक्रम एकत्र कुटुंबिया सोबत पाहणारी शेवटची पिढी ठरली आहे. कुकरच्या रिंग्स, टायर, असल्या गोष्टी घेऊन लहानपणी गाडी गाडी खेळणं यात त्यांना कधीही कमीपणा वाटत नव्हता. सळईचा तुकडा जमिनीत खुपसत जाणं, आंब्याच्या कोया गोळा करून खेळणे,वेगवेगळया सिगारेट पाकिटांच्या नोटा बनवून खेळणे हे खेळ असू शकतेत का? पण होते.
फरशीच्या तुकड्या पासुन चप्पी सारखे खेळ यात पिढीतील मुली खेळू शकल्या 'कैऱ्या तोडणं' ही यांच्या साठी चोरी नव्हती, आणि कुठल्याही वेळी कुणाचंही दारा वर थाप मारणे यात कुठलेही संबंध बिघडत नव्हते. मित्राच्या आईने जेवू घालणं यात कसलाही उपकाराचा भाव तर कधीच जाणवला नाही. त्याच्या वडिलांनी ओरडणं यात कसलाही कमी नसणारी ही शेवटची पिढी. वर्गात किवा शाळेत स्वतःच्या बहिणीशी सुद्धा कुचरत बोलणारी ही पिढी. दोन दिवस जरी मित्र शाळेत नाही आला तर शाळा सुटल्या सुटल्या दप्तरासकट त्याच्या घरापर्यंत जाणारी ती पीढी.. कुणाचेही बाबा शाळेत आले की..मित्र कुठेही



खेळत असो साठच्या स्पीड ने "तुझे बाबा आलेय चल लवकर ही बातमी मित्रापर्यंत पोहोचविणारी ती पिढी शेवटची पिढी पण गल्लीत कुणाच्याही घरात कसलाही कार्यक्रम असलं तरी वाट्टेल ते काम कसलिही अपेक्षा न बाळगता काम करणारी ही पिढी. कपील, सुनिल गावसकर , वेंकट, प्रसनाच्या बोलिंग वर आणि पेस,भूपती,स्टेफी ग्राफ,सम्प्रसच्या टेनिस वर तर राज, देव,दिलीप ते राजेश,अमिताभ आणि धर्मेंद्र,जितेंद्र बरोबर नंतर बऱ्याच नवीन कलाकारांवर, अगदी आमिर,सलमान, शाहरुख माधुरी,अनिल वर वाढलेली ही पिढी भाड्याने VCR आणुन ४-५ पिच्चर पैसे गोळा करून एकत्र पाहणाऱ्या मित्रांची ही पिढी.
लक्ष्या-अशोक च्या निर्व्याज विनोदावर हसलेली, नाना,ओम पुरी, शबाना, स्मिता पाटील, गोविंदा, जग्गू दादा, वर्षा, सोनम, किमी ,सोनाली,हे कलाकार पाहिलेली पिढी. कितीही शिकलं तरी 'स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही'. यावर विश्वास असणारी 'शिक्षकांचा मार खाणं' यात काहीही गैर नाही फक्त घरी कळू नये कारण 'घरात परत धुतात' ही भावना जपणारी पिढी. ज्यांच्या शिक्षकांवर कोणीही आवाज चढवला!नाही की,आमच्या मुलाला मार्क का कमी? अशी पिढीला, सरांनी कितीही धुतलं तरी दसऱ्याला आवरजून शिक्षकांना सोनं देऊन पाया पडणारी आणि आज इतक्या वर्षानी सुद्धा निवृत्त शिक्षक येताना दिसले तर लाज न बाळगता खाली वाकून नमस्कार* करणारी पिढी.कॉलेज ला सुट्टी असली तर् आठवणीत स्वप्न रंगवनारी पिढी ना मोबाईल ना SMS ना व्हाट्सअप तरीहि भेटण्या साठी आतुरतेने वाट पाहणारी पीढ़ी. पंकज उधासच्या 'तुने पैसा बहोत कमाया इस पैसेने देस छुडाया' या ओळीला डोळे पुसणारी, दिवाळीच्या पाच दिवसांची कथा माहित असणारी लिव्ह इन तर सोडाच, लव मॅरेज म्हणजे फार मोठं डेरिंग समजणारी ही पिढी, अहो शाळेत आणि महाविद्यालयात पण मुलींशी बोलणारी मुले ॲडव्हान्स समजली जाणारी पिढी. पुन्हा डोळे बंद करून? दहा, वीस, तीस, चाळीस. ऐंशी, नव्वद.......... येऊ का? पुन्हा या जुना आठवणीचा सुवर्ण काळ सांगणारी ही पिढी गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी.....असं न समजणारी सुज्ञ पिढी, कारण आजचे दिवस हेच उद्याच्या आठवणी असणार असं मानणारी ही पिढी ? धन्य ते जीवन जे खर आपणच जगलोत !!! असं सांगून जीवनाला आनंदाने त्रिवार नमस्कार करणारी हीचं ती शेवटची पिढी.

# आशेचे पंख



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**तिन्हीसांजेची वेळ झाली होती. माणसं गुरंढोरं घेऊन शेतातून घरी परतत होती. गोठ्यात गायीचं हंबरण अन वासरांच शेपूट वर करून प्रेमपान्हा पिण्याच्या ओढीणं पळणं सुरू होतं. शेळ्या आपल्याच तालात बें बें करत बांधलेल्या खुंटी भोवती नाच करत होत्या. कोंबड्या मान मागे पुढे करत टुक टुक आवाज काढत खुरुडयात जाऊन बसत होत्या. निशेचं पांघरून हळूहळू पसरायलं लागलं तशी घरोघरी दिवेलागण झाली पण, सुमनच्या घरात कोणतीच हालचाल दिसत नव्हती. तिच्या दारातील तुळशीजवळचा दिवा तेवढा तेवत होता. त्याचाच काय तो मंद प्रकाश अंगणभर पसरला होता.मोठया माणसांचा आवाजही घरातून येत नव्हता. घरातील लहान लेकरं तेवढी आतबाहेर करताना दिसत होती.**

काही वेळाने माधवी तिच्या घराकडे जाताना दिसली. ती बाहेर दिसताच आतून हुंदक्याचा आवाज येऊ लागला. अंगणात चिपाडासारखी वाळून गेलेली म्हातारी तिला म्हणाली,
"आता येणं केलंस व्हय, माझं सोन्यासारखं पोर देवानं नेलं गं . अजून त्याची लेकरं लहान धाकटी हायती. त्याला त्यांची सुधीक दया आली नाही. म्हणतं म्हातारीने जोरात हबरडा फोडला.
पण तिच्या डोळ्यात कसलेच अश्रू दिसत नव्हते. जणू तिचं काळीज करपून गेलं होतं. ती म्हातारीची कशीतरी समजूत काढत म्हणाली, "काकू मरण कोणाच्या हातात असते का? जे होईल त्याचा स्वीकार करत राहणं आणि मार्ग काढत पुढे जाणं एवढंच आपल्या हातात असतं. उजव्या हातानं पदर डोळ्याला लावत म्हातारी म्हणाली, व्हय पर एक सोडुन दोन्ही तरणीताठी मुलं गेली. किती सांगितलं तरी बाटलीचा नाद काही सोडला नाही. शेवटी शरीर बाद करून घेतलं. नका बोटानं केलेला संसार वाया गेला गं पोरी . घरात दोन तरण्या सुना लेकुरवाळ्या हायत्या. त्याच्या तोंडाकडही पहावसं वाटत नाय बघ.या म्हातारीचा जीव कासावीस हुतुया पण मलाच चार पाऊल चालवत नाही अन त्यांना कसा आधार देऊ. माधवीने म्हातारीची कशीबशी समजूत काढली. आणि दोघीही घरात गेल्या. सोप्यात एका कोपऱ्यात छोटी सून दोन्ही पायात मानगूट घालून बसली होती.केस विस्कटलेले , साडीचा पदर कसातरी अंगाभोवती गुंडाळलेला. अवघी तिशी ओलांडलेली ती पण, अचानक आलेल्या संकटानं दबलेली, खचलेली ती सारच काही हरवल्यासारखी नजर फ़िरवत होती . माधवीला पाहून नुसतेच मूक हुंडके देऊ लागली. उगाच जमिनीवर हात फिरवू लागली.जणू तिच्या नशिबाची रेषाच पुसली होती अन ती त्यावर असह्य वेदनेचा हात फिरवत होती.बाजूला तिची मोठी जाऊ बसली होती जी आधी एक वर्षांपासून विधवापण भोगत होती. ती नुसती ओशाळलेल्या नजरेने तिच्याकडे पाहत होती. तिच्याकडे तिच्या सात्वनासाठी शब्द नव्हते.कारण त्या यातना भोगता भोगता दिवस मागे सारता तीच पार सुकून अन वाकून गेली होती. ती उठली हातात पाण्याचा ताब्या घेऊन बाहेर आली. हळूच माधवीला म्हणाली,
"सगळाच अंधार झालाय भोवताली. तो कसा बाजूला करावा . आभाळ कोसळल्यागत झालंय बघा.कोणतं दुःख करत बसावं. त्या बाटलीच्या नादापायी सारा संसारच उघड्यावर पडलाय. किती सांगावं, समजावावं पर काहीच उपयोग झाला नाही. लेकरं अजून लहान हायती.माझा नवरा जाऊन एक वर्षही झालं नाही तोवर दीर गेला. आधी लई गरिबी होती.त्याच्या बापाचं घराकडं लक्ष नव्हतं. तो दोन तीन महिने अचानक घरातून गायब व्हायचा.या दोघांवर लहान वयातच घराची जबाबदारी पडली



होती. शिक्षण अर्धवट सोडुन दोघंही दुकानात कामाला लागली. मिळतील त्यातले चार पैसे गाठीला बांधीत गेली.काही वर्षे गेल्यावर एक गाळा भाड्याने घेऊन छोटं दुकान थाटलं. दोघेही कष्ट करत होते हळूहळू जम बसत होता. चार पैसे शिल्लक राहू लागले. बघता बघता एक स्वतःचा गाळा दोघांनी विकत घेतला. आता दुकानात कामगारांची गरज भासू लागली. मातीत लिपलेलं घर पाडून छोटंसं पण देखणे घर बांधले.आता त्यांनी इतर दुकानात माल पोहचवणे सुरु केले. त्यातही त्यांना बराच फायदा झाला.आता अनेक सुखसुविधा घरात आल्या होत्या . मित्र वाढले. सखेसोयरे घरी येऊ लागले. कार्यक्रमाला आवर्जून बोलवू लागले.नंतर दोघांचीही लग्ने थाटामाटात पार पडली. सगळे व्यवस्थित सुरु होते. पण काय सांगू तुम्हाला,चुकीच्या लोकांची संगत लागली अन सगळंच बिघडून गेलं . आज पार्टी आहे म्हणतं म्हणत घरात बाटली कधी आली ते कळलेच नाही. ते हळूहळू एवढे व्यसनात गुंतले की त्याना तिच्याशिवाय चैन पडेना. घराकडे व व्यवसायाकडे दुर्लक्ष झाले.मनाला वाटायचं संध्याकाळी ते आले की गप्पा माराव्यात.त्याच्यासोबत कुठेतरी फिरायला जावं. त्यांनी लेकरांना मांडीवर खेळवावं. पण यातलं काहीच झालं नाय ओ. तेच दारू पिऊन पडलेलं असायचे . मलाच त्यांना ओढत करत घरी आणावं लागायचं. मीच माझं नशीब ओढतीय असं मला वाटून जायचं.रोजचे दुःखाचे भोग वाट्याला आले. रात्री सगळे कष्ट करून धरणीवर अंग टाकायचे म्हटले की आम्हाला मारझोड सुरु व्हायची.खरं सांगू ताई. तारुण्य उमलण्याआधी करपून गेलं आमचं . त्या तारुण्यातील मूकभावना मी कधीच्या गाडून टाकल्या होत्या . तो आधाराचा,प्रेमाचा हात कधी अंगावरून फिरलाच नाही. बाप म्हणून लेकरं कधी मांडीवर खेळलीच नाहीत. आमच्या प्रश्नाचे त्याच्याकडे एकच उत्तर ठरलेले असायचे. "तुम्हाला ल्यायला नेसायला काही कमी हाय का.? त्याच्या या लक्षणाने आलेले वैभव हळू हळू गेले. मिळवलेली संपत्ती विकावी लागली. आम्ही दोघींनी बरेच उपाय केले.व्यसनमुक्ती केंद्रात त्यांना नेऊन ठेवले. पण तेवढ्या पुरता संयम. परत आहे ते सुरु.अति व्यसनाने शरीर साथ देईनासे झाले.आई वडिलांच्या आधी यांनीच अंथरूण धरले. काही अवयव खराब झाले. एक महिनाभर जगण्यासाठीचा संघर्ष चालू होता. पण काहीच उपयोग झाला नाही. शेवटी माझ्या अंगावर बोजा टाकून आपल्याच विश्वात राहिले . त्याच्या शेवटच्या दिवसात मी उशाला बसून आधार देत होते पण मी हतबल होते. त्या शेवटच्या घटका मी उघड्या डोळ्याने पाहत होते.शेवटी व्हायचे तेच झाले. लेकरांना बाप निटसा कळण्याआधीच त्यांनी जगाचा निरोप घेतला. छोटा दीर हे सगळं पाहत होता. कुटूंबाची जबाबदारी स्वीकारात होता. पण ते ही दारूचा नाद सोडायला तयार नाहीत. घरात पैसे नसले की ते कासावीस व्हायचे.धान्य विकून प्यायचे. एक दिवस रेल्वेतून प्रवास करताना त्यांची तब्येत अचानक बिघडली. ते बेशुद्ध झाले. उपचार वेळीच न मिळाल्याने त्यांनाही मृत्यूने कवटाळले.घरात कर्ता माणूसच राहिला नाही. या व्यसनापायी कित्येकांचे संसार लयाला गेले ताई.
कोपऱ्यात बसलेली तिची जाऊ माधवीला म्हणाली,
"पोर कालपासून विचरतेय " माझा बाबा घरी कधी येणार.?
"काय उत्तर देऊ मी"? खरं सांगू .सगळंच संपलंय असं वाटायला लागलंय. या लेकरांना उभं कसं करावं.चार पैसे कमवण्याचे साधन फक्त दुकान आहे पण त्यावरही कर्जाचा बोजा आहे.काही मदत मिळेल या आशेने रक्ताच्या माणसाजवळ बोलले. पण कोणीच मदतीला आले नाही. नुसती मोकळी हळहळ चार दिवस कानावर आली.दिवस फ़िरताच नाती गोती लांब पळाली. माधवीने तिच्या डोळ्यावरचे केस बाजूला केले.तिचा हात आपल्या हातात घेतला. आणि म्हणाली,
"सखे तू अशी संकटाना हार मानू नकोस. तू अबाला नाहीस गं सबला आहेस. तू ठरवलेस ना तर सर्व परिस्थिती बदलू शकतेस. हताश, निराश होऊन मार्ग कधीच निघणार नाही बघ.तुमचा व्यवसाय तुम्ही दोघीजणी पुढे नेऊ शकता. बचत गटातून काही मदत मिळवू शकता. तुम्ही दोघीं कुटुंबाला सावरू शकता. फक्त मनात धैर्य व विश्वास ठेवून चालत रहा. एक दिवस तुमच्या जीवनातला अंधार नक्कीच बाजूला होईल. मुलांवर चांगले संस्कार घडवा. योग्य संगतीत ती वाढतात का यावर लक्ष असू दया.शिक्षणाची वाट दाखवा. भविष्यकाळ निश्चित उज्ज्वल असेल. माधवीचे हे शब्द ऐकताच सुमनच्या अंगात चैतन्य संचारल्यासारखे झाले. डोळ्यात एक वेगळीच चमक दिसू लागली. ती तडकन उठली आणि छोटया जावेचा हात तिने हातात घेतला आणि म्हणाली, "आता ऊठ. दुःखाला कुरवाळत बसून चालणार नाही. बरबटलेल्या अंधारात दिवा पेटवावाच लागेल. दोघींना सुटलेल्या पदराची गाठएकमेकीच्या पदाराशी बांधावीच लागेल. तेव्हाच कुठे दोन पाऊले निर्भयपणे टाकता येतील . त्या दोघीनी एकमेकींना घट्ट मिट्टी मारली. अश्रूना मोकळी वाट करून दिली. पण ते दुःखाचे नव्हते. अंधारात सापडलेल्या काजव्यासम आनंदाचे होते.जणू आज दोन देह त एक झाले होते. वेदनेला आशेचे मुक्त पंख फुटले होते. आशेचे पंख फुटले होते.

# अंशकालीन व्याख्यात्यांची वेठबिगारी कधी संपणार ?



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**देशात सर्वत्र नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने वातावरण निर्मिती सुरू झालेली आहे. अनेक विद्यापीठांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. देश 2047 मध्ये विकसित राष्ट्र म्हणून समोर येईल या दृष्टिकोनातून नवीन शैक्षणिक धोरणाच योगदान हे अतिशय महत्त्वपूर्ण राहणार आहे. आज देशाची बहुसंख्य लोकसंख्या ही तरुण असून हा देश युवकांचा देश म्हणून ओळखला जातो आहे . संपूर्ण विश्वात सगळ्यात जास्त तरुणाईची संख्या असलेला देश म्हणून आज भारताकडे मोठ्या आशेने बघितल्या जात आहे.**

याच तरुणाईला घडविण्यासाठी किंवा भविष्यातील विकसित देशांमध्ये त्यांचं योगदान रहावं यासाठी झटणारा सगळ्यात महत्त्वाचा वर्ग म्हणजे प्राध्यापक वृंद.वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक वृंदांचं तरुणाईच्या जीवनमानामध्ये फार मोलाच योगदान असतं. कारण ऐन तारुण्यांमध्ये भरकटू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देऊन राष्ट्राच्या पुनर्निमाण कार्यामध्ये त्यांना सहभागी करून घेण्यासाठी या तरुणाईला घडविण्यासाठी , देशाच्या कोणशीलेला आकार देण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद हा अतिशय कसोशीने प्रयत्न करत असतो . शिवाय देशात संशोधनाचा कार्य मोठ्या प्रमाणात व्हावं या दृष्टिकोनातूनही देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी आवाहन केलेल आहे .
समाजकार्यामध्ये, सामाजिक दायित्वामध्ये जे संशोधन उपयोगाचे असेल अशा संशोधनाला मोठ्या प्रमाणात वाव देण्याचा प्रयत्न आज देश पातळीवर होताना दिसतो आहे. हे सर्व चांगलं चित्र एका बाजूने होत असताना दुसऱ्या बाजूला मात्र, आज अंशकालीन व्याख्यातांच्या समोर त्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या मानधनाचा प्रश्न हा आवासून उभा आहे. गेल्या कित्येक वर्षात विद्यापीठाने किंवा यूजीसीद्वारे कायमस्वरूपी प्राध्यापकांची नियुक्तीच बंद केलेली होती. काही ठिकाणी काही अंशी काही प्रमाणामध्ये प्राध्यापक भरती करण्यात आली. परंतु आज महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांवर आज उच्च विद्या विभूषित अर्थात लेक्चररशिप साठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता एमए , एम कॉम , एमएससी . एमफिल. सेट, नेट , पीएचडी अशा सर्व पदव्या घेऊन सुद्धा आजचा तरुण प्राध्यापक हा अतिशय नाममात्र मानधनावर काम करताना दिसतो आहे . त्यामुळे या अंशकालीन व्याख्यात्यांची वेठबिगारी आता तरी दूर होईल का ?? असा प्रश्न आता महाराष्ट्रातल्या सर्व उच्च विद्या विभूषित अंशकालीन प्राध्यापक वर्गामध्ये चिंतेचा विषय झालेला आहे. अनेक महाविद्यालयांमध्ये केवळ शंभर रुपये तासिका, दीडशे रुपये तासिका यावर तर काही ठिकाणी काही महाविद्यालयांमध्ये पाच हजार रुपये, सात हजार रुपये ते दहा हजार रुपये अशा मानधनावर आज अंशकालीन व्याख्याता काम करताना दिसतो आहे. सर्वच महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या विविध स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा परिषदा असो अनेक संमेलने असो किंवा महाविद्यालयातील इतर कोणतेही सांस्कृतिक कार्यक्रम किंवा शैक्षणिक उपक्रम असोत या संपूर्ण कार्यक्रमांमध्ये किंवा उपक्रमांमध्ये अंशकालीन व्याख्यात्यांचाच सहभाग मोलाचा असतो. ज्या महाविद्यालयामध्ये नक कमिटी येणार आहे त्या महाविद्यालयांमध्ये तर प्रत्येक कामासाठी फक्त अंशकालीन प्राध्यापकांना राबराब राबवून घेतल्या जात असते. बोटावर मोजण्या इतक्या काही पूर्णकालीन प्राध्यापकांचा सन्माननीय अपवाद वगळता , आज बहुतांश महाविद्यालय ही अंशकालीन प्राध्यापकांच्याच भरोशावर सुरू आहेत. विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या उन्हाळी आणि हिवाळी परीक्षांमध्ये सुद्धा पूर्ण कालीन प्राध्यापक आपलं योगदान देत नाहीत .तर , अंशकालीन प्राध्यापकांच्या भरोशावरच सर्व महाविद्यालयांमधील परीक्षा सुरळीत पार पडत आहेत. परंतु पेपर तपासण्यासाठी मात्र या अंशकालीन प्राध्यापकांना संधी दिली जात नाही. हा अतिशय खेदाचा विषय आहे . ज्या ठिकाणी राबायचे आहे त्या ठिकाणी अंशकालीन प्राध्यापक हा हक्काचा माणूस वेठबिगार म्हणून उपलब्ध आहे . परंतु ज्या ठिकाणी त्याला सन्मानाने मोबदला मिळू शकेल अशा ठिकाणी मात्र त्याला वगळल्या जाते . ही एक फार मोठी शोकांतिका आहे . एम ए ,एम कॉम, एम एस सी ,एम फिल, पीएचडी अशा



सर्व पदव्या प्राविण्यश्रेणीत घेतलेले अनेक तरुण आज विविध महाविद्यालयांमध्ये 5000 ,7000, 10000 जास्तीत जास्त 15 हजार रुपयांवर काम करताना दिसून येत आहेत. हा वर्ग खरोखरच तन-मन-धनाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिकवतो आहे. परंतु, हा असा काळ या लोकांनी किती वेळ काढावा ? किती वर्ष काढावा ? यावर मात्र अजूनही विचार होताना दिसत नाही. गेल्या पंधरा वर्षापासून , वीस वर्षापासून अनेक अंशकालीन प्राध्यापक पूर्णकालीन प्राध्यापक होण्यासाठी तात्काळत बसलेले आहेत. परंतु शासकीय पातळीवरून मात्र पूर्णपणे प्राध्यापकांच्या भरतीची प्रक्रिया अजूनही पूर्ण होताना दिसत नाही.

ज्या ठिकाणी प्राध्यापक भरती घेतली जाते त्या ठिकाणी प्राध्यापकाच्या एका जागेसाठी 40 लाख ,45 लाख ते 60 लाख रुपयांपर्यंत आज त्या जागेचा भाव पोहोचलेला आहे. सामान्य परिस्थितीमध्ये जगणारा आणि परिस्थितीशी संघर्ष करत ज्याने उच्च विद्या विभूषित होत सर्व पदव्या मिळविलेल्या आहेत असा विद्यार्थी उच्च विद्या विभूषित असूनही हा एवढा पैसा परमनंट सीनियर लेक्चर व्हावा यासाठी कुठून आणेल ? हा सुद्धा एक अतिशय गंभीर प्रश्न आज संपूर्ण समाज व्यवस्थेच्या समोर उभा ठाकलेला आहे.

शेतमालाला योग्य हमीभाव मिळत नाही म्हणून प्रसंगी कर्ज काढून त्या कर्जाखाली दबत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विदर्भातील चिंतेचा आणि चिंतनाचा विषय होत असतानाच , आता पूर्णकालीन प्राध्यापकांच्या भरती प्रक्रियेला वेग मिळत नसल्यामुळे किंवा याबाबतीत शासन उदासीन असल्यामुळे उच्चविद्याविभूषित आणि लेक्चरर पदासाठी आवश्यक असलेल्या सर्व शैक्षणिक अहर्ता धारण करूनही 15 - 15 , 20 - 20 वर्षांपासून जर आपल्याला पूर्णकालीन नियुक्ती मिळत नसेल आणि नाममात्र मानधनावर काम करावे लागत असेल तर आपली मानसिकता हा तरुण किती दिवस सकारात्मक ठेवेल ? हा प्रश्न आहे. यातून भविष्यात उच्चशिक्षित तरुणांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढणार तर नाही ना ? हा आता सामाजिक दृष्ट्या अतिशय चिंतेचा आणि संशोधनाचा विषय झालेला आहे .

सरकार कोणाचेही असो , परंतु शैक्षणिक क्षेत्रात मात्र कोणत्याही सरकारचा रस दिसून येत नाही . सरकारी दृष्ट्या शैक्षणिक क्षेत्र हे कदाचित " डेड इन्व्हेस्टमेंट सेक्टर " म्हणून पाहिल्या जात असेल. कारण , या क्षेत्रातून गुंतवणूक केल्यानंतर लगेचच रिटर्न मिळत नाही . परंतु देशाच्या भविष्यकालीन गुंतवणुकीचा विचार करता हे क्षेत्र अतिशय मोलाचे असे क्षेत्र आहे .परंतु या क्षेत्रात आपले मोलाचे योगदान देणारे प्राध्यापक जर समजा नाममात्र दरावर आपलं अवघ तारुण्य शैक्षणिक क्षेत्रात समर्पित करत असेल तर अशावेळी या विषयावर अतिशय सखोल असं चिंतन होणं हे सामाजिक दृष्ट्या , शैक्षणिकदृष्ट्या आणि सरकार पातळीवर सरकारी दृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे . या प्रश्नाकडे सरकारने आता जर योग्य पद्धतीने लक्ष दिल नाही तर येणाऱ्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांप्रमाणेच तरुण उच्च विद्या विभूषित अंशकालीन व्याख्यात्यांच्या आत्महत्या या हेडलाईन्स पेपर मध्ये यायला वेळ लागणार नाही. अशी वेळ उच्च विद्या विभूषित प्राध्यापकांवर येऊ नये यासाठी आजचा हा लेखन प्रपंच.

# आर्थिक विकासाचे द्वार उघडणारे नरसिंह राव



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राष्ट्र उभारणीत व देशाला नवे अर्थिक धोरणाची ओळख ज्यांनी करून दिली त्यांना मोदी सरकारने मरणोपंत पी. व्ही. नरसिंह राव यांना भारत रत्न देवून त्यांचा यथोचित गौरव केला आहे. देण्यात राष्ट्र निर्मितीसाठी सार्वजनिक धोरणे राबवण्याचे आणि प्रशासन चालवण्याचे त्यांचे कसब आणि मर्मदृष्टी वाखाणण्याजोगी होती. ज्यामुळे अनेकांनी त्यांना आधुनिक भारतातील नव आर्थिक धोरणाचे व उदारीकरणाचे प्रणेते म्हणुन त्यांचा उल्लेख केला जातो. देशाचे महान विद्वान दिवंगत पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांचे अल्पमताचे सरकार असताना ५ वर्षे पूर्ण कार्यकाळ यशस्वीरीत्या सरकार चालवण्याच्या त्यांच्या राजकीय कौशल्यामुळे लोकांनी त्यांना आधुनिक चाणक्याची उपाधी दिली, अशा समाज सुधारक, शिक्षणतज्ज्ञ, भाषाशास्त्रज्ञ आणि विद्वान अभ्यासपूर्ण अष्टपैलू व्यक्तीमत्वाला भारत रत्न देवून केंद्र सरकारने त्यांचा मरणोपांत सन्मान केला**

डॉ. मनमोहन सिंग देशाचे अर्थमंत्री असताना पी. व्ही. नरसिंह राव यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण केले हे त्यांचे सर्वात मोठे योगदान आहेच. त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला परवाना प्रक्रियेच्या जटील कार्यपद्धतीच्या तावडीतून बाहेर काढून आंतरराष्ट्रीय बाजारपेठांच्या स्पर्धेत उतरवले, त्यांचे हे महत्त्वपूर्ण कार्य जनतेच्या मनात खोलवर रुजले आहे. गेली पाच दशके 'हिंदु ग्रोथ रेट'च्या जोखडात अडकून पडलेल्या भारत देशाला प्रथमच त्यांनी बाहेर काढले. त्यांनी जागतिकीकरण करत असताना कमी विकास दर असलेल्या दुर्बल अर्थव्यवस्थेला 'हिंदू रेट ऑफ ग्रोथ' रुपाने भारताला एका नव्या उंचीवर नेवून ठेवले.

पी व्हि. नरसिंहराव काँग्रेस पक्षाचे होते मात्र त्यांनी विरोधी पक्षाचा नेहमीच सन्मान केला.कारण त्यांनी गुणवत्तेच्या आधारावरच विरोधी पक्षनेते सुब्रमण्यम स्वामी यांना कॅबिनेट मंत्रिमंडळातील महत्त्वाचे पद दिले होते. त्याचबरोबर दुसरे विरोधी पक्षनेते आणि प्रभावशाली सभापती अटलबिहारी वाजपेयी यांना संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत भारताचे प्रतिनिधी म्हणून पाठवले होते. तर कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेले अर्थशास्त्रज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांची भारताचे अर्थमंत्री म्हणून नियुक्ती केली होती.


राव यांच्यात एक महत्त्वपूर्ण गुण हणजे ते खूप शांत आणि संयमी होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांच्या राजकीय विरोधकांनी (बहुतेक त्यांच्याच काँग्रेस पक्षातील नेत्यांनी) त्यांच्यासमोर अनेक प्रकारची संकटे निर्माण केली, पण ते कधीच डगमगले नाहीत. त्यांना बाबरी मस्जिदच्या पाडावा सारख्या प्रशासकीय आणि राजकीय समस्यांचा सामना करावा लागला. त्यांनी अशा ज्वलंत प्रकरणाची संयमी हाताळणी केली. या काळात त्यांच्यावर बरेच आरोप – प्रत्यारोप झाले. पण बाबरी मशीद प्रकरणाचा अत्यंत बारकाईने तपास करणाऱ्या 'द लिब्राहन कमिटी'ने असे म्हटले की, पंतप्रधानांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल त्यांच्यावर दोषारोप ठेवता येणार नाही.

त्यांचे राज्य कारभाराचे सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे, त्यांची भारतीय राज्यघटनेवर असलेली त्यांची संपूर्ण निष्ठा. ज्या-ज्या वेळी त्यांच्याकडे कोणताही नवीन प्रस्ताव मंजुरीसाठी येत असायचा, तेव्हा ते पहिला प्रश्न विचारायचे की "हा प्रस्ताव किंवा धोरण हे संविधानिक आहे का?" तसेच त्यांच्या कार्यकाळात त्यांनी घटनेच्या विरोधात असलेल्या कोणत्याही प्रस्तावाचा कधीही स्वीकार केला नाही.

ते भारताचे पहिले नेते होते, ज्यांनी 'लुक ईस्ट पॉलिसी'ची पायाभरणी केले. त्यापूर्वी आपल्या देशाचे लक्ष केवळ पाश्चिमात्य देशांकडे किंवा आखाती राष्ट्रांकडे असायचे. जर भारताला आशिया खंडातील स्थान भक्कम करायचे असेल तर, आपल्याला बांगलादेश, म्यानमार, थायलंड आणि अन्य आसियान देशांशी चांगले मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करावे लागतील, हा विचार सर्वप्रथम त्यांनीच केला. त्याचबरोबर त्यांनी इस्रायल देशाशी मजबूत संबंध निर्माण केले आणि १९९२ मध्ये त्यांना नवी दिल्लीत दूतावास उभारण्याची परवानगीही दिली. त्यांनीच इराणशी मजबूत आणि घट्ट नाते निर्माण केले. तसेच नरसिम्हा राव यांनीच देशाला आण्विक चाचण्या आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रमाला मोठ्या यशाच्या दिशेने पुढे जाण्यास चालना दिली. १९९६ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या काही दिवस अगोदर मे महिन्यात त्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांना 'अणु फ्यूजन' बॉम्बचे परिक्षण घेण्यासाठी तयार राहण्याचे आदेश दिले होते. पण निवडणुकांचे निकाल काँग्रेसच्या विरोधात गेले. परिणामी शेवटी अण्वस्त्रांची चाचणी वाजपेयी सरकारने १९९८ मध्ये केली.

१९९३ ते ९७ दरम्यानच्या काळात काश्मिरमध्ये सर्वात जास्त बंडखोरी माजली होती. अशा परिस्थितीतही काश्मीरचा प्रश्न सोडवण्याची त्यांची उत्कट इच्छा होती. यासाठी त्यांनी डॉ. फारुक अब्दुल्ला आणि इतर नेत्यांना सांगितले की, मी कोणताही अनैच्छिक प्रस्ताव मान्य करायला तयार आहे. पण एक सुचना अशी आहे की, काश्मिर हा भारताचा अविभाज्य भागच असायला हवा. त्याचबरोबर बुर्किना फासो येथे अधिकृत दौऱ्यावर गेले असता त्यांनी हेही जाहीर केले की, " जो पर्यंत काश्मिर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. तोपर्यंत काश्मिरसाठी स्वायत्त असणे ही चिंतेची बाब आहे." परंतु या संदर्भात काही ठोस निर्णय घेण्यापूर्वी सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या आणि काँग्रेसची सत्ता गेली.

तसेच संसद आणि राज्यातील विधानसभेवर काश्मिरी लोकांनी निवडून यावे. यासाठी काश्मिरमध्ये निवडणुका पार पडाव्यात असे त्यांना वाटत होते, याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे. कारण तेथे गेल्या ८ वर्षांपासून कोणत्याही निवडणुका पार पडल्या नव्हत्या. निवडणुकीच्या माध्यमातून त्यांचे



सरकार निवडण्याच्या अधिकार काश्मिरी लोकांना आहे, आणि त्यांचा हा अधिकार नाकरता येणार नाही. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी मला सांगितले होते की, उर्वरित देशातील सार्वत्रिक निवडणुका पार पडल्यानंतर काश्मिर मध्ये स्वतंत्रपणे निवडणुका घेण्यासाठी आपण योग्य नियोजन केले पाहिजे. परंतु सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि हे काश्मिरमध्ये निवडणुका घेण्याचे त्यांचे स्वप्नही भंगले.

त्यानंतर देवे गौडा यांच्या कार्यकाळात लॉजिस्टिक आणि सुरक्षेच्या समस्यांना तोंड देण्यासाठी गृह मंत्रालयाच्या आणि निवडणूक आयोगाच्या कठोर परिश्रमानंतर जम्मू- काश्मीरमध्ये निवडणुका घेण्यात आल्या. त्यांच्या तत्वज्ञानानुसार... निवडणुका म्हणजे बंडखोरीचा प्रतिकूल इलाज आहे, त्यामुळे त्यांना निवडणुका महत्त्वाच्या वाटत होत्या. म्हणुनच त्यांनी बंडखोरीग्रस्त आसाम आणि पंजाबमध्ये निवडणुका घेण्याचा आग्रह निवडणूक आयोगाकडे धरला होता. यामुळे कमी मतदान होवू शकेल याबद्दलही ते सजग होते. खरं तर निवडणुका ह्या बंडखोरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी महत्त्वाच्या असतात, असे त्यांना वाटायचे. बऱ्याच लोकांना हेही माहिती नसेल की, राव यांनी नागा उग्र संघटनांशी संवाद सुरू केला होता. याच पार्श्वभूमीवर त्यांनी संवादातून मार्ग काठण्यासाठी पॅरिस येथे जून १९९६ मध्ये नागा संघटनेचे भूमिगत नेते मुइवाह आणि इसाक स्वी यांची भेट घेतली होती. याअगोदर नागा समस्या ही केवळ कायदा व सुव्यवस्था आणि सुरक्षेस धोका मानली जात असे. परंतु ही एक राजकीय समस्या असल्याने नागा नेत्यांशी संवाद साधण्याचे राव यांनी मान्य केले. तसेच त्यांना चर्चेसाठी आमंत्रितही केले होते. त्यांच्या पुढाकारांमुळेच अखेर ऑगस्ट १९९७ मध्ये बंडखोरांसोबत युद्धबंदीचा करार झाला. तसेच नागालँड आणि ईशान्येकडील इतर भागांतील नागा वस्तीत शांतता प्रस्थापित झाल्याने राजकीय चर्चाही पार पडल्या. नरसिम्हा राव हे भारतातील बहुधा एकमेव पंतप्रधान होते, ज्यांच्यावर सत्तेतून पायउतार झाल्यानंतर अनेक गुन्हेगारी खटले दाखल करण्यात आली. या चौकशींसाठी तपास यंत्रणांनी अनेक वर्षांचा कालावधी घेतला यामुळे राव हे अगदी मोडून पडले. यामध्ये जेएमएम भ्रष्टाचार प्रकरण तर अगदी १९९६ पासून २००२ पर्यंत रखडत आणले. तर सेंट किट्स प्रकरण आणि लखुभाई पठाण प्रकरणांमधून ते सहीसलामत यशस्वीपणे बाहेर आले.

ही सर्व प्रकरणे राजकीयदृष्ट्या प्रेरित होती. पी. व्ही. नरसिंह राव यांनी बऱ्याच काँग्रेस नेत्यांवर आणि काही विरोधी नेत्यांवर जैन डायरी (तथाकथित जैन हवाला प्रकरण) च्या आधारे भ्रष्टाचाराच्या कारवाईचे आदेश सीबीआयला दिले होते. यामुळे हा राजकीय वर्ग त्यांच्यावर प्रचंड नाराज झाला होता. परंतु या प्रकरणात चौकशीचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिल्याने राव यांच्याकडे दुसरा पर्यायही नव्हता. तसेच या प्रकरणात कारवाई कुठपर्यंत झाली, याचा आढावा राव यांना दर आठवड्याला सर्वोच्च न्यायालयाला द्यावा लागत होता. नंतरच्या काळात त्यांच्याच पक्षातील काही नेत्यांनी राव यांच्या विरोधात निष्ठुरपणा दाखवला हे खुप दुर्दैवी होते. राव हे मे १९९६ मध्ये पंतप्रधान पदावरुन पायउतार झाले आणि माजी पंतप्रधानांना नियुक्त केलेल्या सरकारी घरात राहायला गेले. उतारवयात हे महान व्यक्तीमत्व एकटे आयुष्य जगले. ते नेहमी आपल्या लेखनात आणि पुस्तकांमध्ये व्यस्त असायचे. म्हणुनच मोदी सरकारने त्यांना भारतातील सर्वोच नागरी पुरस्कार मानला जाणाऱ्या 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला.

# लाल समुद्रातील अडचणीमुळे खाद्यतेलाची आयात घटली



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**औद्योगिक संघटना सॉल्व्हेंट एक्स्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ इंडिया (SEA) ने शुक्रवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये खाद्यतेलाची आयात घटून १३,०७,६८६ टन झाली आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत १५,५५,७८० टन होती. 'बिझनेस स्टँडर्ड' ने दिलेल्या वृत्तानुसार, खाद्यतेल विभागात, कच्च्या पाम तेलाची आयात ८,४३,८७९ टनांवरून ६,२०,०२० टनांवर घसरली, तर रिफाईंड पामोलिनची आवक २,५६,३९८ टनांवरून २,५१,६६७ टनांवर कमी झाली. तथापी समीक्षाधीन कालावधीत कच्च्या सूर्यफूल तेलाची आयात १,९४,००९ टनांवरून वाढून २,६०,८५० टन झाली आहे.**

**आयातकर लागू :** बांग्लादेश सरकारने मागील वर्षी द्राक्षावर ६६ रु.प्रति किलो इतके आयातकर लागू केले होते. या वर्षी ६६ रु.वरून १०४ रु.किलो इतके आयात कर करण्यात आले आहे. भारतातून बांगलादेशला मोठ्या आकाराची द्राक्षे , मोठ्या प्रमाणात निर्यात होत होती. त्याला भावही चांगला मिळत होता. पण आता आयतकर वाढवल्यामुळे द्राक्षाची निर्यात मोठ्या प्रमाणात कमी होईल. पुणे, नाशिक, नगर जिल्ह्यातील काही द्राक्षबागायतदार खास बांग्लादेशच्या आवश्यकतेनुसार द्राक्षाची जात निवडून पिकवली जात आहे. संत्र्याला आयात करात ५० टक्के अनुदान मिळते तसे द्राक्षलाही अनुदान मिळावे असे शेतकऱ्यांडून मागणी होत आहे.

**कॅलिफोर्नियामधील १२ हजार हेक्टरवरील द्राक्ष बाग कमी करण्याचे आवाहन:**
कॅलिफोर्नियामध्ये अतिरिक्त द्राक्ष (वाइनचे) उत्पादनाचा मोठा परिणाम वाइनच्या भावावर मागील ५ वर्षापासुन होत आहे. कॅलिफोर्निया अलाईड ग्रेप्स ग्रोवरचे अध्यक्ष जेफ बिटर यांनी उत्पादन कमी करण्यासाठी १२ हजार हेक्टरवरील द्राक्ष बाग कमी करण्याचे आवाहन स्थानिक द्राक्ष (वाइनचे) उत्पादकांना केले आहे. जेफ बिटरने दिलेल्या माहितीच्या अनुसार २०१९ मध्ये वाईन द्राक्षाचे उत्पादन उच्चांकी स्तरावर पोहचले. अधिक उत्पादनामुळे विक्री अभावी वेलीवरच द्राक्ष सोडून द्यावे लागले होते. त्यावेळी हि लागवड क्षेत्र कमी करण्याचे आवाहन करण्यात आले होते. सन २०१९ मध्ये ७२८० हेक्टरवरील द्राक्ष बाग कमी झाल्या होत्या. सन २०१९ नंतर २०२० आणि २०२३ मध्ये पुन्हा वेलीवर द्राक्ष सोडण्याची वेळ आली. सातत्याने वाइन उत्पादक बागायतदार नुकसान सहन करत असल्यामुळे यावर्षी कॅलिफ़ोर्निया विभागातील मोठया प्रमाणात द्राक्षबागा कमी होतील असे वाटते, वाईनच्या १ बॉटलचे भाव ६ डॉलर पेक्षाही अधिक राहीले तरच खर्च निघु शकतो असे जेफ बिटर म्हणाले. **जागतिक साखरेच्या किमती आठ महिन्याच्या निचांकी पातळीवर :** जागतिक स्तरावर साखरेच्या किमतीत घसरण झाली आहे. युगांडाच्या बाजारपेठेत साखरेचा भाव साडेपाच हजारावरून पाच हजार रुपयावर आला आहे. ब्राझीलच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे जानेवारीमध्ये जागतिक साखरेचे प्रमाण ०.५ दशलक्ष टन इतके वाढले आहे. जागतिक साखरेच्या किमती सध्या आठ महिन्याच्या नीचांकी पातळीवर आहे. सोयाबीनचे भाव अडीच वर्षातील निच्चांकी स्तरावर :- आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोयाबीनचे भाव अडीच वर्षातील निच्चांकी स्तरावर पोहचले आहेत . परिणामी कच्चे सोयातेल आणि सोयाचे भाव जोरदार घटले. जागतिक स्तरावर सोयाची उपलब्धता अधिक आहे, आणि सर्वात मोठा खरेदीदार चीनकडून आयात/मागणी कमी आहे. डिसेंबर महिन्यात भारतातून DOC ची निर्यात ३४ टक्के ने घटली मीलवाल्यांकडून सोयाचा साठा न करता गरजेपुरतीच खरेदी होताना दिसत आहे. जागतिक स्तरावर मागणी आणि पुरवठा पाहता सोयातेल आणि सोयाबीनमध्ये भाव नजीकच्या काळात वाढण्याची शक्यता नाही. **देशात गहु लागण क्षेत्रात वाढ :-** देशात गहूचे लागणक्षेत्र



२.३७ लाख हेक्टरने वाढून ३४१.५७ लाख हेक्टरवर पोहचले पण कडधान्य आणि तेलबियांच्या लागणक्षेत्रात मात्र मोठी घसरण दिसत आहे.

कृषी विभागाने २ फेब्रुवारी रोजी प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार भुईमूग, सूर्यफूल, सोयाबीनच्या लागण क्षेत्रात पाण्याच्या कमतरतेमुळे घट झाली. कडधान्याचे लागणक्षेत्र ६ लाख हेक्टरने घटून १६० लाख हेक्टरवर पोहचले. रब्बी भाताची लागण १ लाख हेक्टरने घटून २९ लाख हेक्टर झाली. ज्वारीचे लागणक्षेत्र ३ लाख हेक्टर तर मक्याचे लागणक्षेत्र ४० हजार हेक्टरने वाढले. मका आणि ज्वारीला मिळत असलेल्या चांगल्या परताव्यामुळे लागणक्षेत्रात वाढ होता आहे. इथेनॉल निर्मितीसह पोल्ट्री विभागातून मक्याला चांगला परतावा मिळत आहे. **हळदीचे भाव १५५०० रुपये प्रति क्विंटल पर्यंत :-** नवीन हळद बाजारपेठेत हळुहळु वाढत आहे. यावर्षी हळदीची काढणी उशिरा होत आहे. पण बाजारपेठेत जास्त भावाच्या अपेक्षेने अजुनही आवक मात्र कमीच आहे. हळदीमधील भावामुळे निर्यातही कमी झाली. नोव्हेंबर महिन्यात फक्त ८५०० टन हळदीची निर्यात झाली होती. सध्या हळदीला १२ हजार ते १३ हजार रुपये प्रति क्विंटल इतके सरासरी भाव मिळत आहेत. आताची परिस्थिती, मागणी आणि पुरवठा पाहता हळदीचे भाव १५ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल पर्यंत जाऊ शकतात. **गव्हाची नवीन जात विकसित :** हरियाणाच्या कृषी विद्यापीठाने गव्हाची WH1402 ही नवीन पाण्याची ताण सहन करणारी, उच्च उत्पादन देणारी नवीन जात विकसित केली आहे. ही जात तांबेरा रोगाला प्रतिरोधक असून पाण्याचा ताण सहन करणारी आहे. हेक्टरी सरासरी ५० क्विंटल उत्पादन देणारी असून उच्चांकी ६८ क्विंटल पर्यंत उत्पादन मिळाले आहे. **गुलाबाच्या मागणीत वाढ :** जागतिक प्रेम दिनामुळे गुलाबाच्या मागणीत मोठी वाढ झाली. मागील आठवड्यात २ ते ४ रुपयांपर्यंत असणारे गुलाबाचे भाव दि. ९ फेब्रुवारी रोजी ८ ते १० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. चांगल्या दर्जाच्या (डच) गुलाबाच्या फुलांना घाऊक बाजारपेठेत १८ ते २० रुपयांपर्यंत भाव मिळत आहेत. जे आधी १२ ते १४ रुपयांच्या आसपास मिळत होते. आणखी २ दिवसात २० ते २५ टक्क्यांची वाढ दिसू शकते.

**देशातील विविध भागातील शेतकऱ्यांचे आंदोलन :-** विविध मागण्यांसाठी दिल्ली नोएडा सीमेवर देशातील विविध भागातील शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु आहे. दि.११ फेब्रुवारी पर्यंत एक समिती स्थापन करून ती समिती शेतकरी संघटनेच्या विविध मागण्या संदर्भात चर्चा करतील. डॉ. स्वामीनाथन आयोगाने निर्देशित केलेल्या आधारावरून सर्व कृषी उत्पादनाची किमान आधारभूत किंमत ठरवून एक अधिनियम बनवावे ही प्रमुख मागणी करण्यात आली आहे. या सोबतच इतरही ११ मागण्या शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. जर दि.११ फेब्रुवारीला मागणी पूर्ण झाली नाही तर दि. १३ तारखेपासून पुन्हा आंदोलन सुरु करण्याचा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे.

**गव्हाचा साठा सीमा ५० टक्के ने कमी :-** केंद्रसरकारने पुन्हा एकदा गव्हाचा साठासीमा कमी केला आहे. घाऊक व्यापाऱ्यांना ५०० टनापेक्षा अधिक गव्हाचा साठा करता येणार नाही. या आधी एक हजार टनाचा साठा सीमा लागू होता. किरकोळ अथवा रिटेल व्यापाऱ्याच्या ठिकाणी ५ टनापेक्षा अधिक गव्हाचा साठा करता येणार नाही. गव्हाचे व्यवहार करणाऱ्या प्रत्येक व्यापारी, साठेकरी, मिलवाले यांना आता प्रत्येक शुक्रवारी स्वतःजवळील साठा जाहीर करावा लागणार आहे.

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



पेनाईल इम्प्लांट म्हणजे काय ? आता आपण पाहाणार आहोत पुरुषांसाठी वरदान ठरलेलं पेनाईल इम्प्लांट. सर्व प्रकारच्या औषधी आणि उपचार करूनही जेव्हा पुरुषांमध्ये लिंगात कठोरता येत नाही तेव्हा याचा खूप मोठा फायदा होतो. सेमिरिजिड इनफ्लेटेबल इम्प्लांट असे हे दोन प्रकारचे असतात. शस्त्रक्रिया करून हे सिलिकॉनपासून तयार कलेले इम्प्लांट लिंगामध्ये बसवले जातात. ज्यामुळे लिंग कठोरता पूर्ववत होते. इम्प्लांटमुळे लघवी, वीर्यपतन तसेच लिंग संवेदना यावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. नैसर्गिक पद्धतीने संबंध करता येतो. नपुंसकतेवर हा एक रामबाण उपाय आहे व सर्व उपचार अयशस्वी झाले तरीही पेनाईल इंप्लांट हे एक वरदान आहे. लैंगिक शिथिलतेवर स्टेम सेल थेरपीः सध्याच्या काळात अनेक आजारांवर जीवन संजीवनी म्हणून स्टेम सेल थेरपीचा वापर होतो. स्टेम सेल म्हणजे मूळ पेशी. या पेशी बाळ जन्मल्यानंतर नाळेत असतात व नंतर प्रौढांमध्ये त्या बोनमॅरो फॅट्स व रक्तामध्ये असतात. या मध्ये पेशींवर विशिष्ट प्रक्रिया केली जाते (कल्टिव्हेशन) व त्या लिंगामधे इंजेक्ट केले जातात. त्यामुळे पेशीमध्ये नर्व्हज, वेसल्स व इतर लागणाऱ्या पेशी तयार होतात व रुग्णास असलेला लैंगिक शिथिलतेचा आजार बरा होतो. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील दहिफळे हॉस्पिटलमध्ये या सर्व सुविधा उपलब्ध असून त्यामुळे नपुंसकता हा लपवण्यासारखा आजार नसून सर्वांनी तज्ज्ञ युरॉलॉजिस्ट, एन्ड्रोलॉजिस्ट व सेक्सोलॉजिस्टना तो दाखवला पाहिजे. अधिक माहितीसाठी दहिफळे हॉस्पिटल, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. तपासण्या रक्तातील हिमोग्लोबिन, शुगर, हार्मोन्स (सिरम एफ, एस, एच, एल, एच. टेस्टोस्टेरोन व प्रोलेक्टिन) कोलेस्टेरोल इ. लिंगाचे व अंडाशयाचे कलर डॉप्लर ज्यामुळे व्हॅरिकोसील व पेरॉनीज प्लेक या आजाराचे निदान होते. उपाय जीवनशैली बदलणे, योग, प्राणायाम, नियमित चालणे, वजन कमी करणे, व्यसने कमी करणे, तणाव कमी करणे, हा प्राथमिक उपचार आहे. मेडिकल लाईन ऑफ ट्रीटमेंट (औषधे, गोळ्या, मलम इ.) सिल्डेनाफील (व्हियाग्रा) या बद्दल सर्वांना माहीत असेलच पण तज्ज्ञ युरॉलॉजिस्ट, अण्ड्रोलॉजिस्ट व सेक्सॉलॉजिस्टच्या सल्ल्याशिवाय या गोळ्या घेऊ नयेत. प्रत्येक व्यक्तीचा डोस हा वेगवेगळा असल्याने सल्ला घेऊनच या गोळ्या घ्याव्यात. सध्याच्या बाजारात विविध प्रकारच्या गोळ्या उपलब्ध आहेत. मात्र डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही गोळ्या घेऊ नयेत. वरडेनाफिल, अवानाफिल अशा अतिशय चांगल्या प्रकारचे मेडिसीन सध्या उपलब्ध आहेत. त्याचे दुष्परिणाम अतिशय कमी प्रमाणात असतात. पण डॉक्टरांना विचारल्याशिवाय घेऊ नयेत. चघळायच्या औषधी गोळ्या, स्ट्रीप्स, जेली इ. नवीन औषधेदेखील असतात. इंजेक्शन थेरपी - इंट्राकॉर्पोरल इंजेक्शन (लिंगात द्यावयाची) इ. इंजेक्शन उपलब्ध आहेत. पण सेक्सॉलॉजिस्टच्या सल्याशिवाय ती घ्यायची नसतात. (व्हॅक्यूम, इंजेक्शन डिव्हाईस) यामध्ये पंपाचा व व्हॅक्यूमचा वापर ताठरता आणण्यासाठी करतात पण बऱ्याच जणांना हे वापरणे अवघड असते. पी शॉट व ओ शॉटमध्ये पी.आर.पी. वापरून नवीन रक्तवाहिन्या व पेशी, मज्जातंतू वाढवतात व ज्यांच्यावर औषधे काम करत नाहीत त्यांना याचा फायदा होतो. मधुमेह व ब्लडप्रेशर असणाऱ्या व्यक्तींना हे दिले जाते.






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# निंदकांची घरे चोहीकडे...

आधुनिक केसरी

**'निंदकाचे घर असावे शेजारी' ही माझी आवडती म्हण आहे. कारण ही म्हण महान विचारवंत तथा थोर संत तुकाराम महाराज यांनी वारंवार सांगितलेली आहे.आपली जवळची माणसे आपल्या कलागुणांची नेहमी स्तूती करत असतात.त्यामुळे स्वतःची स्तुती नेहमी ऐकली की व्यक्ती गर्विष्ठ बनते,अहंकारी बनते. या अहंकारात व्यक्तीला त्याचे स्वतःचे दोष कधीच दिसत नाहीत.मग तो आणखी अहंकारी बनतो,भलताच ऐटीत चालतो. त्याचे ते अहंकारातले ऐटीत चालणे,ऐटीत बोलणे बघितले की,मी म्हणजे मीच. माझ्यासारखा दुसरा कोणी नाही. अशा तोऱ्यात ते जीवन जगत असतात,इतरांना कमी लेखतात.**

म्हणून आपल्या शेजारी किमान एक तरी निंदक असावा. आपल्या स्वतःच्या स्वभावात, वर्तनात,बोलण्यात आणि व्यक्तिमत्त्वात सुधारणा घडवून आणण्यासाठी आपल्या शेजारी निंदकाचे घर असणे गरजेचे असते. हे निंदक आपले खरे मार्गदर्शक असतात.जरी ते शत्रूची भूमिका पार पाडत असले तरीही त्यांनी केलेल्या टीकेमुळे आपण आपल्यातील दोष शोधून काढतो आणि ते दोष सुधारण्याचा प्रयत्न करतो.म्हणून 'निंदकाचे घर असावे शेजारी' ही म्हण प्रचलित झाली आहे.परंतु,आजकाल जिकडे तिकडे निंदकांचा सुळसुळाट सुरु झाला आहे.हे निंदक आपल्या प्रत्येक गोष्टीत नाक खुपसतात आणि आपल्यातील दोष,उणिवा, दुर्गुण शोधून जगजाहीर करतात. आपण एखादे वाहन,यंत्र,मोबाईल खरेदी केले आणि त्याचे पेढे देण्यास गेलो की निंदक आपल्याला त्यांचे वाहन,यंत्र, मोबाईल किती चांगले व किती महाग आहेत हे ऐकवतात.आपल्या मुलीने किंवा मुलाने एखाद्या परीक्षेत चांगले यश मिळवले की आपले निंदक त्यांच्या लेकरांचे कोडकौतुक करतात.म्हणजे आपल्या जीवनात जे चांगले घडते,आपण जे चांगले कर्म करतो ते निंदकांना खटकते आणि आपल्याला फुकट मार्गदर्शन मिळते.हे सगळे निंदक जर एकत्र आले तर या विश्वाचे कल्याण व्हायला वेळ लागणार नाही! समाजात असे दिसते की हे निंदक खऱ्या अर्थाने आपले हितचिंतक असतात.कारण ते आपल्यातले दोष,उणिवा कमी करण्यासाठी मदत करतात.

आमच्या लहानपणी आमच्या गावात शिक्षणाला फार महत्त्व नव्हते.रोजगार किंवा मजूरी करणे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे हे कुटुंब प्रमुखाचे जीवन ध्येय असायचे.अशा काळात माझ्या शिक्षण प्रेमी वडिलांनी आम्हा भावंडांना शाळेत घातले होते.तेव्हा आमचे काही शेजारी, काही गावकरी व काही नातलग मंडळी वडिलांना हसायचे, वडिलांची थट्टा करायचे.परंतु, शिक्षणाची दूरदृष्टी असलेल्या वडिलांनी त्या टिकाकारांकडे दूर्लक्ष केले आणि आम्हाला वेळोवेळी एकाग्रतेने शिक्षण शिकण्यासाठी प्रेरीत केले.आज आम्ही भावंडं विविध क्षेत्रात उच्च पदावर नोकरी करत आहोत.तेव्हा त्यावेळी निंदकांनी माझ्या वडिलांची थट्टा केली होती आणि आज आम्हाला पाहून ते निंदक गप्पगार होतात. आपण ज्या कार्यालयात नोकरी करतो तेथे असणारे निंदक आपल्याला विनामूल्य मार्गदर्शन करताना दिसतात. शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणारे शिक्षक एकमेकांचे निंदक असते.निंदकाची भूमिका पार पाडणारे शिक्षक विद्यार्थ्यांजवळ व पालकांजवळ इतर शिक्षकांबद्दल वाईट साईट सांगून स्वतःचे कर्तृत्व सांगताना थकत नाहीत.वर्गात कमी शिकवणे आणि इतर फालतू गप्पा मारणे हे त्यांना छान जमते. आजकाल तळमळीने शिकवणे व मन लावून शिकणे दूर्मिळ होत चालले आहे.

या जगात जे जे लोक मोठे बनले, नावारुपाला आले ते केवळ निंदकांच्या प्रभावामुळे. निंदकांनी वेळोवेळी त्यांचे दोष जगजाहीर केले,त्यांच्या त्रुटी सांगितल्या आणि व्यक्तिमत्त्व विकासात सुधारणा केली.म्हणून तर 'निंदकाचे घर असावे शेजारी'असे म्हटले जाते. निंदकांचे आपण खूप खूप आभार मानले पाहिजेत.

बबन गुळवे,
९५४५४४२६४८.

# झाडाझुडपांमुळे अजिंठा लेणीपर्यंतचा रस्ता पर्यटकांसाठी धोकादायक

आधुनिक केसरी न्यूज



**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणीपर्यंतच्या रस्त्याच्या दोनही बाजूला जंगली झाडे आणि बोरीच्या झाडांच्या फांद्या पसरलेल्या आहेत. त्यामुळे या रस्त्याने दोन वाहने जाऊ शकत नाही त्यामुळे पर्यटकांसाठी हा रस्ता धोक्याचा झाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्यावर मोठी झाडे बाढली असून अनेक ठिकाणी रस्ता लहान आहे. त्यामुळे एकच बस जाऊ शकते. समोरून दूसरी बस आली तर एका बसला लांबून मागे जावे लागते. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या दुर्लक्षाम ळे रस्त्याच्या बाजूचे रानटी फांद्या साफ केल्या जात नाहीत. त्यामुळे पर्यटकांचा जीव धोक्यात आला आहे. तसेच वनविभागाच्या बंगल्याजवळील रस्त्यावर खड्डे पडले असून, त्यामुळे देशी-विदेशी पर्यटकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच याच मार्गावर रस्त्याच्या कडेला बाढलेल्या मोठमोठ्या झाडांच्या फांद्या वरून बसला आदळत आहेत. फर्दापूर टी पॉइंट बसस्थानक ते अजिंठा लेणीत लागणारा रस्ता खड्ड्यांनी खचला आहे. तर पर्यटकांमुळे पर्यटन विभागाला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळते. असे असतानाही फर्दापूर टी पॉइंट येथील बसस्थानकाच्या मार्गाचर पडलेले खड्डे दुरुस्ती होत नाही मात्र प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. अजिंठा लेणीकडे जाणाऱ्या रस्त्यावर व रस्त्यावर पसरलेल्या फांद्यांकडे लक्ष देऊन या खड्डेमय रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे. पर्यटन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी या मार्गाकडे अधिक लक्ष देण्यास तयार नाहीत. त्यामुळे दोन्ही विभाग पर्यटकांच्या जीवाशी खेळताना दिसत आहेत. रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे, जेणेकरून बसेस धावताना कोणतीही अडचण येऊ नये.। त्याचप्रमाणे २९ ऑक्टोबर २०२२ रोजी अजिंठा लेणीकडे जाणारा छोटा मार्ग असल्याने पर्यटकांना घेऊन जाणारी एसटी महामंडळाची बस समोरून येणाऱ्या बसला जागा देण्यासाठी नाल्यात उतरली होती आणि त्यात पर्यटकांचा जीव चुकला होता. प्रशासनाने वेळीच या रस्त्याचे रुंदीकरण न केल्यास व दोन्ही ठिकाणच्या फांद्या न तोडल्यास मोठा अनर्थ घडू शकतो.

# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

हा अमरावतीचा खास पदार्थ आहे. जवळपास दहिवड्याच्या प्रकारात मोडणारा हा पदार्थ असून चाट सारखा दिसतो आणि टेस्टी लागतो. आजिबात वेळ न घालवता लगेंच करायचा ना मग ? कारण चाट आणि दहिवड्याचे अद्भुत कॉम्बिनेशन खाण्याची तीव्र ईच्छा होतेय ना... **साहित्य : वड्यासाठी** 1 वाटी उडीद डाळ , 5..6 मिरे, 2..3 लसूण पाकळ्या, किंचित आल्याचा तुकडा , अर्धा चमचा जिरे, चवीनुसार मिठ, अर्धा चमचा हिंग तेल. **लाल चटणी साठी :** 8..10 लाल मिरच्या, 4..5 लसूण पाकळ्या, मिठ, पाव चमचा जिरे, अर्धा चमचा धणे, पाव वाटी खोबरे किंवा फुटाणे डाळ. **हिरव्या चटणी साठी :** अर्धी वाटी कोथिंबीर , 5..6 हिरव्या मिरच्या , 4..5 लसूण पाकळ्या , 2 चमचे फुटाणे डाळ किंवा खोबरे, कधीपत्ता, 3..4 पुदिन्याची पाने , पाव चमचा साखर , पाव चमचा जिरे , पाव चमचा लीम्बाचा रस, मिठ. **वरुन घालण्यासाठी दही :** 2..3 वाट्या घट्ट गोड ,ताजे दही , अगदी छोटासा आल्याचा तुकडा , 1 मिरची , 2..3 चमचे साखर , चवीनुसार मीठ. वरून भुरभूरण्यासाठी चाट मसाला , मिरपूड , आवडत असेल तर किंचित गरम मसाला, बारीक शेव, डाळिंब दाणे..

**कृती :** प्रथम डाळ धुवून 4..5 तास भिजवून अगदी किंचित पाणी घालून व्हायंपर वर बारीक वाटून घ्यावे . मग परातीत थाळीत काढून घेऊनत्यात सर्व साहित्य घालून ओल्या हाताने 7..8 वेळा तरी एकाच दिशेने गोलाकार पाण्याचा हात घेऊन भराभर फिरवत फेतून घ्यावे म्हणजे पीठ त्यात हवा भरल्यामुळे एकदम हलके होते . आणि त्यामुळे वडे हलके बनतात . असे पीठ बनवून तयार करून ठेवावे. आता चटण्या बनवायला घेऊ .प्रथम लाल मिरचीची चटणी करू .त्यासाठी लाल मिरच्या गरम पाण्यात आधी 2..3 तास भिजत ठेवाव्यात .मग त्या मिक्सर मध्ये घालून त्यात सर्व साहित्य घालून एकदम बारीक वाटावी. आता हिरव्या चटणीसाठी मिक्सर मधून डाळ , काढून मग कोथिंबीर ,मिरच्या ,कधीपत्ता ,पुदिना व सर्व साहित्य घालून सर्व छान बारीक वाटून हिरवीगार चटणी बनवावी छान रंग येऊन तो काळापट न होता बराच वेळ टिकण्यासाठी व चवदार बनण्यासाठी लिंबाचा रस घालावा. चटण्या पातळसर बनवण्यासाठी लागेल तसे पाणी घालावे. **दही बनवण्यासाठी :** दह्यात मिठ ,साखर , आले घालून स्वादासाठी एक मिरचीचे पोट फोडून त्यात घालावी व सर्व छान फेटून वरून घालण्यासाठी दही बनवून घ्यावे. आता वडे बनवण्यासाठी एका कढईत तेल घालून गरम करण्यास ठेवावे . मग प्लास्टिक पेपर वर पाणी लावून त्यावर एकेक गोळी बनवून ठेवावी व त्यावर प्लास्टिक ठेवून हाताने गोळी थापून वडा बनवावा व तो तापलेल्या तेलात तळून घ्यावा. दुसऱ्या मोठ्या बाऊल मध्ये पाण्यात थोडे मिठ घालून त्यात हे वडे घालुन 1..2 मिनिटांनी बाहेर काढून हलक्या हातानी दाबून पाणी काढावे व सर्व्हिंग दिशमध्ये काढावेत .मग त्यावर गरम मसाला , तिखट भूर भुरावे आणि आता त्यावर लाल व हिरवी चटणी , पांढरे दही ,पिवळी बारीक शेव आणि लाल डाळिंब दाणे घालून त्यावर चाट मसाला भूर भुरून सर्व्ह करावी .

**वैशिष्टय :** हा चाटचा अतिशय सुरेख असा प्रकार दिसायला जितका सुरेख ,आकर्षक ..तितकांच टेस्टी सुद्धा असल्यामुळे सर्वांना नक्कीच आवडेल . लहानापासून वृद्धांपर्यंत सर्वजण खाऊ शकतात . शिवाय पार्टीसाठी आधी करून थंडगार सुद्धा छान लागतो त्यामुळे करून ठेवता येतो म्हणून ऐनवेळी घाई होत नाही आणि नाविण्यापूर्ण पदार्थ मिळाल्यामुळे खाणारेही तृप्त होऊन नक्कीच प्रशंसा करतील.



# भल्या पहाटे माजी आ.रोहिदास चव्हाण रुग्णसेवेसाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** "काळ आला होता परंतु वेळ आली नाही" परिस्थिती लोहा तालुक्याने अनुभवली. अडीच ते तीन हजारांवर प्रचंड मोठ्या संख्येने जमा झालेले कोष्टवाडीतील भाविक भक्त बाळूमामाच्या कृपा आशीर्वादाने आरोग्य व पोलीस प्रशासनाच्या दक्षतेमुळे अनुभवी आजी माजी पदाधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे प्रसंग टळला. हीच शिकवण शिवसेनेचे माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी आयुष्यभर २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारणाचा प्रत्यय त्यांच्या कोष्टवाडी येथील विषबाधा प्रकरणी उपजिल्हा रूग्णालयात पहाटेच्या उपस्थितीमुळे दिसून आला. रात्र वैऱ्याची असल्याचा अनुभव झगडणाऱ्या शेकडो हातांना आला. यातून अधिकारी ,आजी-माजी पदाधिकारी सुटले नाहीत. रात्र जागून काढली. लोह्यासह शेजारील पालम, अहमदपूर, कंधार, विष्णूपुरी नांदेड येथील दवाखाना ,



शासकीय असो व खाजगी दवाखान्यात उपचार घेणारे रुग्ण आणि त्यावर ट्रीटमेंट करणारी डॉक्टर यांनी शर्तीचे प्रयत्न केले. ॲम्बुलन्स, बस, टेम्पो, काळी पिवळी अन्य वाहनांनी गोष्ट वाडी व परिसरातील खेड्यापाड्यातून रुग्णांची वाहतूक केली. तो क्षण अंगावर काटे आणणारा अनेकांनी अनूभवला. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी आमदार यांचा भ्रमणध्वनी पहाटे खणखणताच क्षणाचाही

खेड्यापाड्यातील महिलांच्या कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया पाण्याअभावी रखडल्या असे अनेक प्रश्न घेऊन शेकडो नागरिक शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी आमदार रोहिदास चव्हाण कडे आले असता त्यांनी दि. २० जुलै २०२३ रोजी उपजिल्हा रुग्णालयात चव्हाण स्वत: व सहकाऱ्यांसह जाऊन रुग्णांना असुविधेमुळे बेहाल होत असल्याचे जाणवताच वैद्यकीय अधीक्षक डॉ. बारी यांना धारेवर धरले व एक महिन्याचा अल्टिमेट देत स्वखर्चाने तब्बल चार ते पाच महिने स्वत:च्या टँकरद्वारे रुग्णालयाला मोफत पाणीपुरवठा केला. असा सामाजिक प्रश्न उचलून धरणारा नेत्यांमधील कार्यकर्ता पुन्हा एकदा काल घडलेल्या दि.(६) जानेवारी २०२४ च्या विषबाधा प्रकरणी भल्या पहाटे हाकेला दवाखान्यात हजर असणारा माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या रूपाने माणसातील देव माणूस अनेकांनी बघितला.

विलंब न करताच उपजिल्हा रुग्णालयात दाखल होऊन शासकीय रुग्णालयातील अधिकारी,कर्मचारी डॉक्टर्स नर्स, खाजगी दवाखान्यातील डॉक्टर्सना रुग्णांच्या तपासणी व आरोग्य उपचाराबाबत स्वतः जातीने लक्ष घालून पोटतिडकीने सूचना दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत विविध पक्षाचे पदाधिकारी यांनी सुद्धा प्रचंड मेहनत घेतली.

म्हणतात ना" देव तारी त्याला कोण मारी" असा प्रत्येक कोष्टवाडी येथील विषबाधा प्रकरणी आला. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते ,लातूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून रुग्णांबरोबर आलेल्या नातेवाईकांना यांच्या कडून तातडीने खिचडीचे वाटप केले. यावेळी रुग्णांच्या नातेवाईकांनी मागील चार ते पाच महिने आमच्या चव्हाण साहेबांनी पाण्याचा थेंबही नसताना रुग्णालयाला मोफत पाणीपुरवठा केला असल्याचे बोलून दाखवले. हा नेता नसून आजही जमिनीवर असलेला कार्यकर्ताच आहे असे बोलके शब्द कानावर पडत होते. आम्हाला पूर्वीपासून हीच बाळासाहेबांची शिकवण असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी दिली.



# कारागृहातील कैद्यांसाठी बायोमेट्रिक सुविधा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन : पाकगृहाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारत सरकारच्या उपक्रमातंर्गत आय.सी.जे.एस. या प्रकल्पाच्या माध्यमातून कारागृहातील बंदयांच्या सोयी-सुविधेत वाढ करण्यासाठी बायोमेट्रिक टच स्क्रिन किऑस्क मशिनचे उद्घाटन तसेच कारागृहातील अद्ययावत पाकगृहाचे भूमिपूजन जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते पार पडले.

जिल्हा कारागृह येथे पार पडलेल्या कार्यक्रमाला मुख्य न्यायदंडाधिकारी शेखर गोडसे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, कारागृह अधीक्षक अनुपकुमार कुमरे, वरिष्ठ तुरूंगाधिकारी सतिश सोनवणे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, उपविभागीय अभियंता व्ही.आर. अंबुले, कनिष्ठ अभियंता रूपेश चेंदे आदी उपस्थित होते.

बायोमेट्रीक टच स्क्रिन किऑस्क च्या माध्यमातून बंद्यांना त्यांच्या बायोमॅट्रीक फिंगरप्रिंटच्या सहाय्याने त्यांच्या केस प्रकरण संदर्भातील अद्ययावत माहिती, मनिऑर्डर, बंदी वेतन, पॅरोज/फर्लो रजा, मुलाखत सुविधा, दूरध्वनी सुविधा, माफी व इतर आवश्यक माहिती पाहणे शक्य होणार आहे.

# भरदिवसा दीड लाखांची चोरी; फत्तेपूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज




**जामनेर :** तालुक्यातील तोरणाळे येथील शालिग्राम त्रंबक पाटील हे काईमचे रहिवाशी असून सेवानिवृत्त शिक्षक आहे ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या पुण्याला असलेल्या मुलाकडे राहायचे परंतु काही कामानिमित्त दोन तीन महिन्यातुन घरी येत होते त्याचप्रमाणे आज दि.९ /०२/२०२४ रोजी शिक्षक घरी येताच त्यांना आपल्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडलेले दिसले त्यानंतर त्यांनी घरामध्ये गेल्यानतर त्यांना देवघर, टी.वी शोकेश,गोद्रेज कपाटामध्ये असलेले मौल्यवान वस्तू जसे की सोन्याची अंगठी,सेवन पिस, रोक रक्कम आदाजे दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत चोरांनी लाबवल्याचे निर्दशनास आल्यावर त्यांनी तात्काळ नव्यानेच मंजूर झालेले फत्तेपूर पोलीस स्टेशन गाठून स.पो.निरीक्षक गणेश फड सहेबाशी संपर्क साधून घडलेला सर्व प्रकार सांगितला साहेबांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन घडलेल्या सर्व प्रकार लक्षात घेता.बीट अमलदार दिनेश मारवडकर व जवरे साहेब यांनी घटनास्थळी पंचनामा करून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध फत्तेपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे मात्र या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे कारण या अगोदर परिसरात बऱ्याच ठिकाणी चोऱ्या झाल्या आहेत.हनुमान मंदिराची दांनपेटी, देऊळगाव व पळसखेडा काकर येथील शेतकऱ्याचे ठिबक, गाय, बैल, मोटरसायकल, एवढेच नव्हे ,तर शेतकऱ्यांनी शेतातून तयार करून आणलेला शेतमाल सुद्धा चोरीस गेलेले आहेत.आजपर्यंत या अज्ञात चोरांच्या मुसक्या मात्र आवरल्या गेल्या नाहीत जर असेच गावागावात जनतेचा मौल्यवान वस्तू व शेतकऱ्यांचा शेतमाल चोरीला जात असेल तर शेतकऱ्यांनी व जनतेने करावं तरी काय? हा मोठा प्रश्न निर्माण झाला असून संपूर्ण परिसरामध्ये चोरांची पसरण्याचे दिसत असून आज त्याची चोरी झाली उद्या आपली होईल की काय असा धक्का सर्वसाधारण शेतकरी वर्गामध्ये पोहोचलेला आहे त्यामुळे फत्तेपूर येथील स.पो. निरीक्षक साहेबनी लवकरात लवकर चोरट्यांचा शोध घेऊन त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यात यावा.अशी मागणी परिसरातील जनतेकडून व शेतकरी बांधवांकडून केली जात आहे.

# आ. किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून बॉडी बिल्डिंग स्पर्धा

## बॉडी बिल्डर नीलेश दगडेंची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार



यांच्या संकल्पनेतून श्री माता महाकाली क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत उद्या रविवारी चंद्रपूर डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस स्पोर्ट्स असोसिएशन चंद्रपूर यांच्या सहकार्याने चंद्रपूर महानगर पालिका पटांगणावर भव्य विदर्भ राज्यस्तरिय बॉडी बिल्डींग अंजिक्यपद स्पर्धा पार पडणार आहे. मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे हे या स्पर्धेचे विशेष आकर्षण असणार आहे.

यंदाही आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. या अंतर्गत नुकतेच क्रिकेट सामने आणि कबड्डी स्पर्धा घेण्यात आली आहे. तर उद्या रविवारी गांधी चौक येथील महानगरपालिकेच्या पटांगणावर भव्य विदर्भ राज्यस्तरीय बॉडी बिल्डींग अंजिक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सांयकाळी 5 वाजता या सामान्यांना सुरवात होणार आहे. या स्पर्धेत नामवंत बॉडी बिल्डर सहभागी होणार आहे. यंदाचे हे तिसरे वर्ष असून यंदा मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत आमदार श्री ठरणा-या बॉडी बिल्डरला 51 हजार 111 रुपये व ट्रॉफी देण्यात येणार आहे. तर बेस्ट पोझरसाठी 31 हजार 111 रुपये ट्रॉफी , बेस्ट इम्प्रुव्हसाठी 21 हजर 111 रुपये ट्रॉफी , असे एकुन दोन लक्ष 46 हजार 648 रुपयांचे पारितोषिक वितरित केले जाणार आहे. या स्पर्धेला आमदार किशोर जोरगेवार यांचीही प्रामुख्याने उपस्थिती राहणार असुन नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत स्पर्धेचा आनंद घ्यावा असे आवाहण आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भिवगाव जि.प. शाळेने घातली आकाशाला गवसणी

## सहलीवरील विद्यार्थ्यांनी केले कळसूबाई शिखर सर

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** तालुक्यातील भिवगाव बु जि.प शाळेतील विद्यार्थ्यांनी सहली दरम्यान महाराष्ट्रातील सर्वात उंच असे कळसुबाई शिखर सर करून एक प्रकारे आकाशाला गवसणी घातली. शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांसाठी आनंदाचे क्षण,विविध ऐतिहासिक,निसर्गरम्य स्थळांना प्रत्यक्ष भेटीद्वारे होणारा अभ्यास तर असतोच त्यातच महाराष्ट्रातील सर्वात उंच असलेले (१६४६ मीटर) कळसुबाई शिखरावर चढणे म्हणजे एक विक्रमच आहे.असाच एक विक्रम तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा भिवगांव बु.येथील विद्यार्थ्यांनी केला. ह्या विद्यार्थ्यांनी खडतर मार्ग,वळणदार रस्ते,लोखंडी शिड्या,आजूबाजूला खोल दऱ्या असलेले शिखर मोठ्या हिंमतीवर सर केले.जिद्द ,हिंमत, कळसुबाई शिखर सर करणारी जिल्हा परिषद भिवगांव बु ही तालुक्यातील पहिलच जिल्हा परिषद शाळा असून बुलडाणा जिल्ह्यातील दुर्मिळच शाळा म्हणावी लागेल.भिवगाव जि.प शाळा नेहमीच शैक्षणिक गुणवत्ता,सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा,विज्ञान प्रदर्शन विविध उपक्रमात अग्रेसर असते कळसुबाई शिखर सर करून या शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा खोवला आहे.विद्यार्थ्यांच्या सोबत शाळेतील ज्येष्ठ शिक्षक आंधळे सर,कायंदे सर,दराडे सर,बाबर



सर व कुमारी भोरजे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे ,जबाबदारीने ,मोठी हिंमत दाखवून हा यशस्वी विक्रम घडवून आणला.यशाच्या(कोणत्याही) शिखरावर गुरुजीविना दुसरे कोण घेऊन जाऊ शकते ? भिवगांव बु शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय वाघ सर,भालके सर, तागवाले सर,कासतकर सर यांनी सहलीचे उत्तम प्रकारे नियोजन केले.दरम्यान या यशाबद्दल शिक्षणाधिकारी खरात, गटशिक्षणाधिकारी दादाराव मुसदवाले, केंद्रप्रमुख श्री सोनुने यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# विद्यार्थ्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग विकसित भारतासाठी महत्त्वाचा

## गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सरधोपट मार्गाने जाण्यापेक्षा आयुष्याचे नेमकं ध्येय काय याची जाणीव नसल्याने आजच्या नवयुवकांमध्ये नैराश्य आलेल ओ . या पार्श्वभूमीवर आम्ही पराक्रमी पूर्वजांचे वंशज आहोत याची जाणीव करून देण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने जनजाती संमेलनाचे आयोजन केल्याबद्दल अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अभिनंदन असे म्हणत निर्णय प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नसल्याने आज अनेक अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे 2047 मध्ये विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचं असल्यास विद्यार्थ्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभागात अतिशय महत्त्वाचा आहे. या दृष्टिकोनातून गोंडवाना विद्यापीठ येणाऱ्या काळामध्ये विविध प्राधिकरणांवर विद्यार्थ्यांचा सहभाग करून घेणार असून निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग राहील त्याकरिता विविध विद्यार्थी संघटनांनी समोर यावे असे आवाहन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर प्रशांत बोकारे यांनी आज येथे केले.

चंद्रपूर येथील वन अकादमी येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विदर्भ प्रांत द्वारे आयोजित जनजाती संमेलनाच्या अनुषंगाने ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अखिल भारतीय युवा कार्यप्रमुख वनवासी कल्याण आश्रम चे वैभव सुरंगे अखिल भारतीय जनजाती छात्र कार्य प्रमुख अखिल भारतीय विद्यार्थी परिषद चे प्रमोद राऊत ,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत मंत्री पायल कीनाके, प्रांत जनजाती विद्यार्थी कार्यक्रम उमेश राऊत ,आदित्य गजकेश्वर, भूमिका गेडाम आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती आदिवासी नृत्य रेला व त्यानंतर दीप प्रज्वलनाने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



यावेळी पुढे बोलताना डॉक्टर प्रशांत बोकारे यांनी विद्यार्थ्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग हा अतिशय महत्त्वाचा असून या दृष्टीने गोंडवाना विद्यापीठ निश्चितच येणाऱ्या काळात अनेक प्राधिकरणांवर विद्यार्थ्यांची नियुक्ती करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अखिल भारतीय युवा कार्यप्रमुख वनवासी कल्याण आश्रम चे वैभव सुरंगे यांनी भारताच्या निर्माण मध्ये जनजातींचे योगदान काय होते यावर विस्तृत विवेचन केले. इतिहासामध्ये स्वातंत्र्यलढ्यातील जनजातींच्या योगदानाबद्दल पूर्ण व खरी अशी आवश्यक ती माहिती नव्हती . त्यामुळे आदिवासी जनजातीतील विविध योद्धांचा, क्रांतिकारकांचा परिचय त्यांनी आपल्या भाषणातून करून दिला. जनजातींचा गौरवशाली इतिहास आपण समजून घेतला पाहिजे ,यातून आपला स्वाभिमान जागृत होईल व या जागृत स्वाभिमानातूनच उद्याचा नवा भारत घडेल असेही मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले. आपल्या भाषणामध्ये त्यांनी पश्चिम बंगालमधील संथाल क्रांतीची सविस्तर माहिती दिली. तसेच बाबुराव शेडमाके, विटा वीर नारायण सिंग, भीमा नायक, तंट्या मामा, ख्वाजा नायक ,राणी दुर्गावती यासह विविध आदिवासी युद्धांचा व क्रांतिकारकांचा परिचय उपस्थित तरुणाईला करून दिला. संपूर्ण दिवसभर चालणाऱ्या या जनजातीय छात्र संमेलन मध्ये शिक्षा, आरोग्य , रोजगार ,संस्कृती , नेतृत्व अशा विविध विषयांवर त्या त्या क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार असून या विषयावर सखोल मनन, चिंतन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्राध्यापक उमेश कुलमेथे यांनी संमेलनाच्या आयोजना मागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक उमेश कुळमेथे यांनी तर आभार प्रदर्शन आदित्य गचकेश्वर यांनी केले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद चंद्रपूर द्वारे अथक परिश्रम करण्यात आले.

# गडचिरोली शहरात हर घर जोडो अभियान

## शेतकरी कामगार पक्ष सभासद नोंदणी करणार

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**गडचिरोली :** शेतकरी कामगार पक्षाच्या महिला नेत्या जयश्रीताई जराते यांच्या नेतृत्वात गडचिरोली शहरातील प्रत्येक वॉर्डात पक्ष शाखांची स्थापना करण्यात येणार असून १३ ते २७ फेब्रुवारी दरम्यान हर घर जोडो अभियान राबविणार आहे. या अभियाना अंतर्गत विद्यार्थी, युवक, महिला व पुरुषांना पक्षाशी जोडण्यासाठी पक्ष सभासद नोंदणी करण्यात येणार आहे. याबाबत शेतकरी कामगार पक्षाने प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, १३० कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाच्या सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या सरकारने ८० कोटी लोकांना ५ किलो मोफत राशन दिल्याचा आणि २५ कोटी जनतेला गरिबीतून मुक्त केल्याचा दावा अर्थसंकल्पीय अधिवेशन फेब्रुवारी २०२४ दरम्यान केला आहे. हा सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचा खोटारडेपणा देशातील सर्वसामान्य गरीब, कष्टकरी, कामगार, शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी, युवक, बेरोजगार, छोटे दुकानदार, नोकरदारांची, गळचेपी करणारा आहे. शेतीमालाला योग्य हमीभाव, आरोग्य, शिक्षणावरील कमी केलेली तरतूद, गरिबांना आणखी गरिबीच्या खाईत लोटणार आहे. सर्व क्षेत्रातील पराकोटीचे खाजगीकरण येणाऱ्या पिढ्यांच्या उरावर बसणार असून गरिबांच्या मुलांना शिक्षण, आरोग्य, नोकरी, रोजगार मिळणे बंद होणार आहे. या संपूर्ण अराजकतेविरुद्ध देशातील प्रमुख विरोधी असलेला काँग्रेस पक्ष जनतेसोबत लढा उभारायचा सोडून ईडी-सीबीआय च्या धाकाने मिळमिळीत भूमिका घेऊन शांत बसलेला आहे. अशा स्थितीत स्वातंत्र्यपूर्व काळापासून सत्तेच्या राजकारणापेक्षा भांडवलदार, कारखानदारां विरोधात सरकारशी सामान्य माणसांसाठी विधिमंडळात आणि रस्त्यावरचा संघर्ष करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या लाल झेंड्याखाली एकत्र येऊन आवाज बुलंद करण्याची आता वेळ आलेली आहे. त्यासाठी गडचिरोली शहरातील गरीब सामान्य शेतकरी, कष्टकरी, कामगार, शेतमजूर, छोटे दुकानदार, नोकरदार, महिला, विद्यार्थी - बेरोजगार युवकांनी मोठ्या संख्येने आपापल्या वार्ड शाखेचे मोठ्या संख्येने सभासद होऊन एकत्र यावे, असे आवाहन जिल्हा चिटणीस भाई रामदास जराते, जिल्हा खजिनदार भाई शामसुंदर उराडे, महिला नेत्या जयश्री जराते, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष भाई अक्षय कोसनकर, जिल्हा समितीचे सदस्य डॉ. गुरुदास सेमस्कर, रेश्मा रामटेके, विजया मेश्राम, छाया भोयर, रजनी खैरे, शुल्का बोबाटे, संगिता बोदलकर, अस्मिता लाटकर, धारा बन्सोड, कुसूम नैताम, पुष्पा कोतवालीवाले, योगेश चापले, भीमदेव मानकर, राजकुमार प्रधान, बाबुलाल रामटेके, विनोद उराडे, अंकुश मारभते, भूषण चिंचोलकर यांनी केले आहे.

शिवसेना – राष्ट्रवादी यांनाही पक्ष फुटीने ग्रासलेले असून जनतेच्या प्रश्नांपेक्षा स्वत :च्या अस्तित्वाच्या संघर्षात गुरफटले आहे . देशापातळीवरील या परिस्थितीमुळे आपल्या गडचिरोली शहरातही त्याची झळ बसणार असून दुकानांमध्ये काम करणारे नोकरदार, कामगार, मजूर, छोटे दुकानदार, व्यापारी, गृहिणी, युवक, विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी कोणीही पुढाकार घेताना दिसत नसल्याची टिका शेतकरी कामगार पक्षाने केली आहे . शहरातील फुटपाथ दुकाने, घरकुल, अतिक्रमणे कायम करून प्रॉपर्टी कार्ड मिळणे, रस्ते, नाल्या, पिण्याच्या पाण्याची सोय यासारख्या समस्यांचे निवारण होणे आवश्यक आहे .



# आष्टीत सावित्रीच्या लेकींना सायकल वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चामोर्शी :**महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय आष्टी या ठिकाणी सावित्रींच्या लेकींना सायकलचे वाटप करण्यात आले. मानव विकास मिशन योजनेअंतर्गत या विद्यार्थिनींना बाहेरगाव वरून ये-जा करण्याकरिता सुविधा उपलब्ध व्हावी व त्यांचे शिक्षण सुकर व्हावे या उदात्त हेतुने महाराष्ट्र राज्य मानव विकास योजना अंतर्गत विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करण्यात आले. यावेळी वन वैभव शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष बबलूभैया हकीम त्यांच्या सहचारिणी नागपूर विभागीय महिला राष्ट्रवादी काँग्रेस चे अध्यक्ष शाहीनभाभी हकीम,आष्टी येथील सरपंच बेबीताई बुरांडे, मार्कंडा ( कंसोबा ) येथील सरपंच वनश्री चापले आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय आष्टीचे प्राचार्य शैलेंद्र खराती, महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय आष्टीचे प्राचार्य संजय फुलझेले,पर्यवेक्षक किशोरसिंह बैस, पालक तथा कला महाविद्यालयाचे प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी एकूण 124 सायकली विद्यार्थिनींना वाटण्यात आल्या. सायकल मिळाल्याचा आनंद विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. शाहीन भाभी हकीम यांनी विद्यार्थ्यांसोबत परीक्षेबाबत त्यांना मार्गदर्शन केले.



# विकासकामांचे लोकपर्ण व भूमिपूजन आ. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**मारसावळी :** ता.फुलंब्री येथे विविध फुलंब्री तालुक्यातील मारसावळी येथे विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरीभाऊ बागडे नाना यांच्या हस्ते संपन्न झाले.

हरीभाऊ बागडे नाना यांच्या विशेष प्रयत्नातून ग्रामविकास निधीतून गावात सिमेंट रस्त्याचे लोकार्पण तसेच वसंतराव नाईक वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाठ, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अनुराधाताई चव्हाण, जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्याताई अभिषेक गाडेकर, गजानन नागरे, आप्पासाहेब काकडे, विकास गायकवाड, बाबुराव गाडेकर, काशिनाथ गाडेकर, सावळाहरी गाडेकर, यांच्यासह सरपंच, उपसरपंच, सदस्य, चेअरमन व्हॉईस चेअरमन, संचालक आदींसह मारसावळी - फाजलवाडी गावातील गावकरी, पदाधिकारी - कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते बक्षीस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय व राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय घोडेगाव ता.खुलताबाद येथे चित्रकला स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ पदवीधर आमदार मा.सतीश भाऊ चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय साईनाथ पाटील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पदवीधर आमदार सतीश भाऊ चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

त्यानिमित्ताने आज महाविद्यालयात चित्रकला स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीयविद्यार्थ्यांचे व पालकांचे आमदार साहेबांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष मा.साईनाथ पाटील जाधव यांनी केले. यावेळी महेश उबाळे, अनिल चव्हाण, केशव जाधव, प्रकाश मत्ते, प्रसिद्धी अधिकारी रामेश्वर कदम व ऋषिकेश करडीले, दादासाहेब जाधव,श्री. द्वारकादास जाधव, मिठु महालकर, विनोद जाधव, बबन औटे, सुनिल जाधव, दिलीप जाधव, रमेश गोल्हार, बबन जाधव, आजिनाथ चव्हाण, भागीनाथ जाधव, वाल्मिक जाधव, विलास सोनवणे, राजु पवार, विसपुते सर, धुमाळ सर, मंगला पाटील मॅडम व पंचक्रोशीतील पालकवर्ग उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यास प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.





# महावितरण कार्यालयासमोर द्वारसभा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानिर्मिती, महवितरण आणि महापारेषण या तीनही कंपनीतील सर्व वीज कंत्राटी कामगारांना आज रोजी मिळत असलेल्या एकूण पगारात दि. १ एप्रिल २०२३ पासून मागील सर्व फरकासह ३० टक्के वेतनवाढ करून देण्यात यावी यासह अन्य १७ मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती २०२४ चॅट वतीनं करण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील आंदोलनांतर्गत शुक्रवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी धुईल शहरातील वीजवितरण कंपनीच्या कार्यालयासमोर द्वार सभा घेण्यात आली. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघटनेतर्फे एकूण ६ टप्प्यात आंदोलन करण्यात येणार असून द्वार सभेने या आंदोलनाची सुरुवात झाली आहे. यासंदर्भात संघटनेने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातुन विविध प्रकारच्या एकूण १७ मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत. त्यात मनोज रानडे समितीच्या अहवालातील शिफारशींची तातडीने अमलबजावणी करा, कंपनीतील मंजूर नियमित रिक्त पदांवर सर्व कंत्राटी कामगारांना नियमित सेवेत सामावून घ्या, समान कामास समान वेतन द्या, कोर्ट केसेसमधील आणि आयटीआय नाही म्हणून कामावरून कमी केलेल्या सर्व कामगारांना पुन्हा तातडीने कामावर घ्या, कर्तव्य बजावताना कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना जी ४ लाख रुपये मदत दिली जाते त्यात वाढ करून ही रक्कम १५ लाख रुपये करा इत्यादी मागण्यांचा समावेश आहे. प्रसिद्धी पत्रकावर संघटनेचे नचिकेत मोरे, निलेश खरात, वामन बुटले, भाई चैनदास भालाधरे, डी जी तायडे, शंकर गडाख, सुरेश भगत, विक्की कावळे, सतीश तायडे, दीपक ओतारी, संजय पडोळे, वामन मराठे, नीताई घोष, रमेश गणोरकर, राहुल नागदेवे, प्रफुल्ल सागोरे, गणेश सपकाळे, कैलास नेमाडे, राजेश पखिड्डे , अरुण दामोदर, बंडू हजारे, मंगेश चौधरी, संदीप बांदेकर, सचिन मेंगळे, अजित नार्वानकर, रोशन गोस्वामी या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

# दलित मुलीवर प्रेम केल्याने मुलाला संपवले

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** दलित समाजाच्या मुलीवर प्रेम केल्याच्या कारणावरून संतप्त वडिलांनीच आपल्या पोटच्या मुलाची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार अकोला जिल्ह्यात पोलीस तपासात उघडकीस आला. दुसऱ्या मुलाच्या मदतीने वडिलांनी मुलाचा गळा आवळून जीव घेतला. घटनेनंतर संपूर्ण कुटुंब बाहेरगावी प्रसार होऊन मुलाला कोणी तरी मारल्याचा बनाव रचला होता. पोलीस तपासात मात्र सत्य समोर आले. संदीप नागोराव गावंडे (२६) असे मृताचे, तर नागोराव कर्णाजी गावंडे असे आरोपी वडिलांचे नाव आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्याच्या बार्शीटाकळी तालुक्यातील टिटवा गावात नागोराव गावंडे त्यांच्या कुटुंबासह राहत होते.

त्यांचा मुलगा संदीप हा पुण्यातील एका कंपनीत कामाला होता. संदीपचे गावातील एका अनुसूचित जातीच्या कुटुंबातील मुलीशी प्रेम होते. त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांचे प्रेम संबंध वडिलांना मान्य नव्हते. त्यामुळे घरात वाद देखील निर्माण होत होता. दोघांनी पळवून जाऊन लग्न करण्याचे ठरवले. ही गोष्ट संदीपच्या वडिलांना कळली. त्यावरून वडील नागोराव व संदीपमध्ये वाद झाला. या दरम्यान वडिलांनी आपल्या दुसऱ्या मुलाच्या मदतीने घरातच संदीपचा गळा आवळून हत्या केली. त्यानंतर संदीपचे हातपाय बांधून घराला कुलूप लावून सर्व बाहेरगावी निघून गेले. शुक्रवारी सायंकाळी घरी परतले आणिआपल्या मुलाला कोणीतरी मारले, असा बनाव रचला. पोलिसांच्या तपासात सर्व प्रकार उघडकीसझाला. या प्रकरणी वडील आणि मृतकाचा भाऊ यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पिंजर पोलीस करीत आहेत.

# निखिल वागळे हल्लाप्रकरणी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोकशाहीचा चौथा खांब असलेल्या पत्रसृष्टीला राज्य घटनेने स्वातंत्र्य दिले आहे. जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहचविण्याचा अधिकार घटनेनेच पत्रकारांना दिला आहे. परंतु दहशत माजवून, हल्ला करुन पत्रकारांच्या अधिकारांवर घाला घालण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे शासनाने अशा हल्लेखोर आणि दहशत निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींवर कडक कारवाई करावी अशी मागणी ज्येष्ठ पत्रकार महेश घुगे यांनी केली आहे.

पुण्यात रात्री ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर प्राणघातक भ्याड हल्ला झाला. त्या निषेधार्थ आज धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या नेतृत्वात संपूर्ण पत्रसृष्टी एकवटली. मराठी पत्रकार संघाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनही देण्यात आले. पत्रकारांच्या या मागणीला समविचारी संघटनांनी पाठबळ दिले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिल्यानंतर ज्येष्ठ पत्रकार महेश घुगे, माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहचविण्याचे स्वातंत्र्य लोकशाहीच्या चौथ्या खांबाला दिले आहे. पत्रकार हे पारदर्शक पध्दतीने जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहचविण्याचे काम करतात परंतु दहशत,हल्ले करुन पत्रकारांच्या अधिकारावर घाला घालण्याचे काम सध्या सुरु आहे. पत्रकारांचे लिखान, बोलणे यावर दहशतीच्या माध्यमातून निर्बंध घालण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरु आहे. वास्तविक पाहता पत्रकार, धर्म, राजकारण बाजूला ठेवून वस्तुस्थिती समोर मांडत असतो. मुजोर सत्ताधाऱ्यांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून सत्तेतून खाली खेचू शकतो हे लक्षात ठेवण्याची गरज आहे. पत्रकारांवर होणारे प्राणघातक हल्ले पत्रसृष्टी खपवून घेणार नाही. धुळे जिल्ह्याची पत्रकारीता ही घाबरणारी नाही,त्यामुळे पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होवू नये.पत्रकारांवरील हल्ल्याप्रकरणी शासनाने कडक कारवाई करावी अशी मागणी महेश घुगेंनी केली.



धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुण्याच्या डेक्कन येथील खंडूजी बाबा चौकात शुक्रवार दि.९ रोजी संध्याकाळी ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. त्यांच्या अंगावर शाई फेक करण्याचा प्रयत्न झाला. निर्भय बनो कार्यक्रमस्थळी दगडफेक देखील करण्यात आली. लाठी हल्ला, शाई फेक,अंडी फेक केली. निखिल वागळे यांच्यावर ४ ते ५ ठिकाणी जीवघेणा हल्ला केला. त्यांच्या गाडीच्या काचा फोडण्यात आल्या. विचारांची लढाई,विचारांनीच लढली पाहिजे. गुंडशाहीने व्यक्ती मारता येतो. मात्र विचार मारता येत नाही. म्हणून कायदा हातात घेणाऱ्यांना तो कोणत्याही पक्ष संघटनेचा पदाधिकारी,कार्यकर्ता अथवा समर्थक असतो. त्याला कडक शासन झालेच पाहिजे. ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर झालेल्या भ्याड झाल्याचा आम्ही धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने निषेध करतो. निवेदन देतेवेळी ज्येष्ठ पत्रकार महेश घुगे, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, माजी अध्यक्ष रविंद्र इंगळे,सुनिल पाटील, नूरखॉन पठाण, कोषाध्यक्ष तुषार बाफना, सचिव सचिन बागुल, प्रांतिक सदस्य प्रकाश शिरसाठ, सदस्य मोहन मोरे, रविंद्र नगराळे, पुरुषोत्तम गरुड, झी-२४ तासचे प्रशांत परदेशी, एबीपी माझाचे धनंजय दिक्षीत, सिध्दार्थ पारेराव, व्यंगनगरीचे संपादक राजेंद्र सोनार,सुभाष वाघ, विरेंद्र मोरे, सुनिल बैसाणे, तुषार परदेशी, अजय गर्दे, आकाश सोनवणे, दिनेश निकुंभ, चंदू पाटील,गोरख गर्दे, संजय पाटील, आवेश खान, पंकज पाटील, दिपक शिंदे ,दिलीप मोहिते,राम निकुंभ, मनोहर सोलंकी, योगेश पाटील,राकेश गाळणकर, दिग्वीजय गाळणकर आदी उपस्थित होते.

पत्रकार संघाच्या या मागणीला समविचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पाठबळ दिले. यावेळी अंनिसचे अविनाश पाटील, सेनेचे डॉ.सुशिल महाजन, किरण जोंधळे,ॲड. जगदीश सूर्यवंशी, ॲड.राहुल वाघ, डॉ.अनिल भामरे, ॲड.संतोष जाधव, योगेश जगताप, राष्ट्रवादीचे रणजीत भोसले,आझाद समाज पार्टीचे आनंद लोंढे, राजेंद्र डोमाळे,सकल मराठा समाजाचे भानुदास बगदे, विनोद जगताप, मनोज जाधव,महादू गवळी, कुणाल कानकाटे, ललीत माळी,दीपक देवरे आदी उपस्थित होते.

# अग्निवीरांच्या भरती प्रक्रियेत बदलांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** भारतीय सैन्यदलाने अग्निवीरांच्या भरती प्रक्रियेत मोठ्या बदलांची घोषणा करण्यात आली आहे. यासंदर्भात शुक्रवारी भारतीय सैन्यदलाने एक जाहिरात प्रसिद्ध केल्याची माहिती गोदावरी अकॅडमी चे अध्यक्ष बाजीराव खांदवे यांनी दिली.



या जाहिरातीनुसार सैन्यात भरतीसाठीचे तीन टप्पे असतील. अनुक्रमे कॉमन एंट्रन्स टेस्ट, फिजिकल फिटनेस टेस्ट टेस्ट आणि मेडिकल (वैद्यकीय) टेस्ट अशा तीन टप्प्यांमध्ये ही परिक्षा होईल.

यापूर्वी जी भरती प्रक्रिया होती त्यानुसार सर्वात आधी उमेदवारांची फिजिकल फिटनेस टेस्ट होत होती. त्यानंतर त्यांची मेडिकल म्हणजेच वैद्यकीय चाचणी केली जायची. त्यानंतर शेवटच्या टप्प्यात उमेदवारांना सीईई म्हणजेच कॉमन एंट्रन्स टेस्ट म्हणजेच लेखी परिक्षा द्यावी लागत होती. आता भरती प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. नव्या बदलांनुसार सर्वात आधी लेखी परिक्षा होईल. त्यानंतर फिटनेस टेस्ट होईल. या दोन चाचण्यांनमतर वैद्यकीय चाचणी होईल. आतापर्यंत १९,००० अग्निवीर भारतीय सैन्यात दाखल झाले आहेत. तर २१,००० अग्निवीर मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सैन्यात दाखल केले जातील. त्यानंतर ४०,००० अग्निवीरांची निवड सैन्यदलात होईल. यावेळी नवीन भरती प्रक्रिया लागू केली जाईल. म्हणजेच आगामी ४०,००० अग्निवीर हे नवी भरती प्रक्रिया पार करून भारतीय सैन्यात दाखल होतील.

भारतीय सैन्यातील अधिकाऱ्यांनी सांगितलं की, भरतीसाठी येणाऱ्या हजारो उमेदवारांसाठी लागणारा मोठा प्रशासकीय खर्च आणि लॉजिस्टिक व्यवस्थापनाचा विचार करता भरती पक्रियेत बदल करण्यात आला आहे. आधीच्या प्रक्रियेनुसार मोठ्या संख्येने येणाऱ्या उमेदवावांचं स्क्रीनिंग केलं जात होतं. यामुळे प्रशासनावरील दबाव वाढत होता. तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात सुरक्षा बळ तैनात केलं जात होतं. तसेच भरतीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वैद्यकीय कर्मचारी देखील उपस्थित असतं. नवीन भरती प्रक्रियेमुळे भरती मेळाव्यांवरील खर्च खूप कमी होणार आहे. तसेच प्रशासकीय आणि लॉजिस्टिक भार कमी होईल.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# प्रत्येक शाळेतून बालकवी निर्माण व्हावेत : मुख्याध्यापक नीळ



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** रविंद्रनाथ टागोर विद्यालयामध्ये दिनांक 7 जानेवारी 2024 रोजी कवी /लेखक यांची ओळख करून देणारा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रविंद्र निळ हे होते तर विशेष निमंत्रित कवयित्री म्हणून श्रीमती अनिता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

कविता ही थेट मनाला स्पर्श करुन काळजाला भीडते.आपल्या मराठी भाषेला थोर कवी परंपरा लाभली आहे. ज्ञानेश्वरां पासून ते मंगेश पाडगावा पर्यत आपण नामांकित, प्रख्यात कविता पाहिल्या अनुभवल्या आहेत.अशा प्रकारच्या सुंदर कविता विद्यार्थ्यांनी वाचाव्या नंतर सुंदर रचना आणि लेखन करावं अस प्रतिपादन विद्यालयाचे मुख्याध्यापक रविंद्र निळ यांनी केले. 'जे सुर्य पाहू नाही शकत तो एक कवी पाहू शकतो' अशी एका कवी ला उपमा दिली जाते. म्हणजे कवी ची दृष्टी ही सुर्या पेक्षा भेदक असते.कविता ह्या कल्पना मांडण्या साठी, भावना व्यक्त करण्यासाठी केल्या जातात. लेखक, कवी, कवियित्री हे आपल्यातीलच असतात आणि ते अशाप्रकारे कवितेची काव्यची निर्मिती करतात हे विद्यार्थ्यांच्या बालमनावर आत्तापासूनच बिंबले जावे यासाठी तसेच प्रत्येक शाळेतून बालकवी,लेखक निर्माण व्हावेत,यासाठी विद्यालयात लेखक,कवी,कवियित्री यांची विद्यार्थ्यांशी भेट असा नवोपक्रम विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला.तसेच एखादे कवी संमेलन किंवा बाल साहित्य संमेलन शाळेमध्ये आयोजित करण्याचा मानस ही मुख्याध्यापक रविंद्र निळ त्यांनी व्यक्त करून दाखवीला. यावेळी निमंत्रित कवयित्री श्रीमती अनिता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.त्यांनी प्रथम विद्यार्थ्यांशी संवाद साधून कविता करण्यासाठी वाचन व निरीक्षण महत्त्वाचे असते असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस यु पवार यांनी केले ,प्रस्ताविक अमेयअहिरे यांनी केले;तर आभार श्रीमती वैशाली घुले यांनी मानले.यावेळी विद्यालयातील शिक्षक सोपान गवळी, नवनाथ करवंदे,श्रीमती कल्पेश्वरी मोरे आदींची उपस्थिती होती.

# घटेश्वर मंदिर विकासकामासाठी देवरे परिवाराच्या वतीने आर्थिक मदत

## गुरुवर्य भास्करगिरी बाबांच्या हस्ते सुपूर्त

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम येथील गोदातीरी असलेल्या घटेश्वर मंदिर विकासाचे काम वेगाने सुरू असून यासाठी येथील देवरे परिवराच्या वतीने पाच हजाराची आर्थिक मदत करण्यात आली सदरची मदत गुरुवर्य भास्करगिरी बाबांच्या हस्ते मंदिर विकास कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली.

देवरे वस्तीवरील श्री संत पुंजाई माता पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या समवेत भेट दिली असता संत सेवक शंकरराव देवरे सरांनी आपल्या परिवाराच्या वतीने सदरची रक्कम श्री भास्करगिरीजी बाबांच्या हस्ते परीसर विकास कमिटीकडे सुपूर्त केली. गोदातीरी असलेल्या घटेश्वर मंदिर परिसर विकास कामांसाठी प्रवरासंगम येथील ग्रामस्थांनी एकत्रित येऊन परिसर विकास समिती स्थापन केल्याबद्दल गुरुवर्य बाबाजींनी समाधान व्यक्त केले. यावेळी घटेश्वर मंदिर परिसर विकास समितीच्या वतीने बी.के.चव्हाण, सोसायटीचे चेअरमन पांडुरंग काळे, उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झालेल्या गौरीताई शंकरराव देवरे व शंकरराव बाबुराव देवरे सर यांचा गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा यांनी घटेश्वर मंदिर परिसरातील वैकुंठ धाम दुर्लक्षित होते ते काम ही हाती घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले चांगले काम करत राहा,भगवंत पूर्तता करत राहील असा शुभाशीर्वाद त्यांनी यावेळी बोलताना दिला.तर देणगीदार शंकरराव देवरे सर यांनी घटेश्वर अमरधाम भूमीमध्ये फळाफुलांची झाडे लावा येथील वातावरण व परिसर सुगंधित करा असे आवाहन यावेळी बोलताना केले

यावेळी हभप बाबासाहेब महाराज जाधव,पांडुरंग काळे,बी के चव्हाण,मुरलीधर पुलाटे,उद्योजक दिनकरराव कदम,सुखदेव देवरे,ईश्वरभाऊ देवरे,कैलासभाऊ देवरे उपस्थित होते.यावेळी घटेश्वर मंदिर परिसर विकसित करण्यासाठी दात्यांनी बीके चव्हाण प्रवरा संगम 79 72 56 87 12 या भ्रमणध्वनीवर संपर्क करण्यात यावा व आर्थिक मदतीसाठी पुढे यावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.





# काकासाहेब विद्यालयाचे उज्ज्वल यश

## शासकीय रेखा रंग कला परीक्षेचा निकाल शंभर टक्के

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे शासकीय रेखा रंग कला परीक्षा महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने सप्टेंबर 2023 मध्ये घेण्यात आलेल्या चित्रकला परीक्षा इलेमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेसाठी काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय कन्नड या विद्यालयातून एकूण 87 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

या परीक्षेत अ श्रेणीत 11 विद्यार्थी बी श्रेणीत 42 विद्यार्थी सी श्रेणीत 34 विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे

अ श्रेणीत पूर्वा काशिनाथ कवडे, मोहिते वैष्णवी उमेश, पवार कनिष्क भाईदास पवार ,श्रद्धा संदीप पवार,

समर्थ उमेश शिंदे ,सायली राजेंद्र सूर्यवंशी ,अनुष्का अनिल दापके, अनुष्का मुकेश जाधव, वेदिका भगवान पवार, *बी श्रेणीत* वैष्णवी आढाव ,योगेश अंभोरे, ज्ञानेश्वरी धोत्रे, वरद जाधव, हर्षदा कोतकर, गौरी काळे, ज्ञानेश्वरी खरे, योगिता शिंदे ,जोया शेख, प्रीती ठोकळ, एलिमेंट्री ग्रेड परीक्षेत कीर्ती अकोलकर, पूजा अकोलकर, अनुष्का बनसोडे, करपुरा बिडवे, पूर्वा बिडवे, आनंद चव्हाण, सोहम दापके, अनुराधा धोत्रे, श्रुती गायकवाड, वेदिका गायकवाड, अमृता गिलबिले, कार्तिकी घुले, आदित्य जाधव, रोहित जाधव, साक्षी जाधव, सृष्टी जाधव, कविता केवट, तृप्ती कुऱ्हाडे, अक्षरा मुट्ठे, स्नेहल निकम, अनविष पठाण, भाग्यश्री पाटील, संस्कृती पवार, राधिका रोडगे, दीपिका सातदिवे, श्रुती शहरवाले, झरीन शेख, श्रावणी शिंदे, अरशान शेख, वैष्णवी शिंदे, रोशनी विधाते, या विद्यार्थिनींनी यश संपादन केले असून विशेष श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रदीप सनंसेसर यांनी मार्गदर्शन केले मार्गदर्शक शिक्षक व विद्यार्थ्यांचा संस्थेचे सचिव सागरजी जाधवसर संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती ताराबाई जाधवताई मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण पर्यवेक्षक रावसाहेब निकम वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले आहे.



# वाळूउपसा करणारी बोट खडकपूर्णात बुडवली; महसूलच्या कारवाईची धास्ती

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** खडकपूर्णा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करणारी बोट महसूल विभागाच्या पथकाने जेसीबीच्या साह्याने फोडून नष्ट केली. सदर कारवाई गुरुवारी रात्री दरम्यान करण्यात आली असून नदीपात्रातून अवैध रेती करणाऱ्या बोट मालकांनी सदर कारवाईनंतर धास्ती घेतली आहे.

तालुक्यातील खडकपूर्णा नदीपात्रातून पाण्यातील बोटीद्वारे अवैध वाळूचा उपसा नेहमीच सुरू असतो. वाळू माफियांमार्फत रात्रीच्या वेळी खडकपूर्णा नदी पात्रातून एका रात्री दरम्यान शेकडो ब्रास रेतीचा उपसा करून शासनाच्या महसुलाला चुना लावला जातो. ह्या गैरप्रकारावर प्रतिबंध घालण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या वाळूउपसा प्रतिबंधक पथकाच्या डोळ्यात धुळफेक करून वाळू माफिया रेतीचे अवैध उत्खनन करीत असल्याने महसूल विभागाच्या अधिकारी क्रमचाऱ्यांनी गुरुवारी रात्रीकारवाई केली. सिंदखेड राजा उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांच्या मार्गदर्शनात मंडळ अधिकारी तलाठी यांच्या पथकाने अवैध रेती उपसा करणारी एक बोट पकडून जेसीबीच्या साह्याने फोडून नष्ट केली. महसूल विभागाच्या या कारवाईत एसडीओ समाधान गायकवाड, तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, नायब तहसीलदार अस्मा मुजावर, मंडळाधिकारी विजय हिरवे, तलाठी रामदास मांटे, राजू तागवाले, सागर देशपांडे, विनोद डोईफोडे, सुरेश डोईफोडे, विलास नागरे, संदीप वायाळ, संजय हांडे, मधुकर उदार, संजय बरांडे,पंढरी जायभाये, कोतवाल मारुती बंगाळे, पवन देठे, काकडे यांनी सहभाग घेतला.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर